पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ अंक १५ वा मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ एप्रिल २०२३

मी हिंदू धर्मात जन्माला आलो
असलो तरीही
मी हिंदू धर्मात मरणार नाही!

- येवला १९३५

बाबासाहेबांनी लाखो अनुयायांसह
हिंदू धर्माचा त्याग करून
बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.

- नागपूर १९५६



## कथनी आणि करणीत
## सातत्य राखलेला राष्ट्रनिर्माता

# बापमाणूस

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक १५ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ एप्रिल २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट 8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
  ९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाइन पमटसाठी यथ स्कन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय** : लोकशाहीवर बोलू काही... – ३ / भारतीय संसद आणि डॉ. आंबेडकर – **अनंत बागाईतकर** – ५ /डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धर्मविचार – **डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी** – ८ / !! नाते भीमरायाशी, जयभीम हाच श्वास नि ध्यास !! – **सतीश कुलकर्णी** – १२ / डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ – **प्रा. आनंद मेणसे** – १६ / समाजवादी बाबासाहेब – **प्रा. सुभाष वारे** – २१ / काँग्रेस नेत्याने लिहिलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र – **प्रा. अविनाश कोल्हे** – २३ / बहुजनांनी संघाच्या षड्यंत्रापासून सावध राहावे – **उल्का महाजन** – २६ / डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आदिवासी – **प्रभू राजगडगर** – २९ / डॉ. आंबेडकर आणि समाजवाद – **प्रसाद माधव कुलकर्णी** – ३२ / डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुनर्वसन धोरण – **डॉ. भारत पाटणकर** – ३६ / **दिल्ली दरबार** : फायदा मोदींना, की राहुलला? – **विचक्षण बोधे** – ४० / राहुल गांधी एकटे थोडेच आहेत? – **सुरेश भटेवरा** – ४३ /

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

# लोकशाहीवर बोलू काही....

दिल्लीतला आपला थोरला, मोठा आणि दांडगा कारभारी २०१४ पासून एक मोठी घोषणा करत आलाय आणि ती म्हणजे, या देशाला काँग्रेसमुक्त, विरोधी पक्षमुक्त करायचं आहे. खरं तर, हा काही लोकांच्या जगण्या-मरण्याचा प्रश्न नव्हता. पण जणू काही तो तसा बनवण्यात आला. एखाद्या लोकशाही व्यवस्थेतून जेव्हा विरोधी पक्ष संपतो, तेव्हा स्वाभाविकच लोकशाहीलाही घरघर लागते. विरोधक क्षीण झाले, की लोकशाही क्षीण होते. लोकशाहीचे अस्तित्व विरोधकांच्या अस्तित्वाशी, लोकशाहीचा श्वास विरोधकांच्या श्वासाशी जोडलेला असतो. हे दोन्ही घटक परस्परांचा आवाज असतात, लोकांचा आवाज असतात. तोच बंद झाला की लोकशाही मुकी होते. विरोधक आंधळे-पांगळे बनवले, की लोकशाहीही त्याच अवस्थेत जाते. प्रचंड बहुमत घेऊन सत्तेवर येणारा पक्ष म्हणजेच लोकशाही नसते. तर या सत्ताधाऱ्यांवर, त्यातून येऊ पाहणाऱ्या मस्तीवर जनअंकुश ठेवणारा विरोधी पक्ष असतो. तोच संपला तर? उत्तर वेगळे देण्याचे काही एक कारण नाही. तर २०१४ पासून टप्प्याटप्प्याने विरोधी पक्ष क्षीण करण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यासाठीही काही मार्ग निवडण्यात आले. एक म्हणजे त्यांना शुद्ध करून आपल्यातच ओढायचे. दोन - जे येत नसतील तर त्यांच्यामागे ईडीसारखी भुते सोडायची. मग ते आश्रयासाठी आपोआप येतात आणि तीन - प्रत्येकाच्या नावावर लाखो रुपये फुकटात जमा करण्याचे आश्वासन देऊन विरोधकांकडे जाणारी सगळी मते पळवायची आणि विरोधकांचा लोकशाहीच्या मार्गाने म्हणजेच निवडणुकीत पराभव करायचा. त्यांच्यात फूट पाडायची. त्यांचे तत्त्वज्ञान भ्रष्ट करायचे, त्यांना सळो की पळो करायचे वगैरे ते मार्ग आहेत. सर्वात महत्त्वाचा मार्ग म्हणजे लोकांना धर्मवान, श्रद्धावान बनवायचे. त्यांच्यासमोर परधर्माचा एक शत्रू सतत उभा करायचा आणि त्याला आपलेसे करायचे. खरे म्हणजे भ्रम उभा करायचा, नसलेल्या शत्रूंशी गर्दी करायची आणि त्यांना जगण्या-मरण्याच्या प्रश्नापासून दूर करायचे. महागाईवर ते मोर्चा काढणार नाहीत, तर लव जिहादवरून मोर्चा काढतील, अशी रणनिती आखून ती यशस्वी करायची. आपल्या विरोधी आवाज कोठूनच येणार नाही याची काळजी घ्यायची आणि काढलाच तर त्याच्या मागे तपास खटला लावायचा. तर आपली लोकशाही जी जगातील सर्वात मोठी आहे, ती अशी प्रत्यक्षात छोटी होताना आपण पाहतो आहोत. कृतीहीन, विचारहीन होऊ पाहतो आहोत.



येणाऱ्या निवडणुकीत पाचशे जागा आपणच जिंकू, असा संकल्प कारभाऱ्यांनी सोडला आहे. म्हणजे लोकसभेत पंचवीसच विरोधक असतील. त्यातीलही काही सत्ताधाऱ्यांशी जोडलेले असतील. इथे सारे काही लोकशाही आणि संविधानाच्या मार्गाने करण्याचा प्रयत्न होत असल्याचे सांगण्यात येते. पण प्रत्यक्षात मात्र या साऱ्या गोष्टींना कायम ठेऊन स्वतःच्या सोयीप्रमाणे वापरले जाते. काँग्रेस म्हणजे दीडशेहून अधिक वर्षांची परंपरा लाभलेली आणि स्वातंत्र्याची लढाई लढत आलेली संघटना. पण कारभाऱ्यांनी तिला भ्रष्टाचारी, राष्ट्रद्रोही आणि देशाला गुलाम बनवणारी असे ठरवले. दहा-पंधरा वर्षे हे काम सातत्याने करत शेवटी या पक्षाच्या तरुण नेत्याला म्हणजे राहुल गांधींना गाठले. काँग्रेसवर सातत्याने घराणेशाहीचा आरोप केला. विशेष म्हणजे, आरोप करणाऱ्यांचीही घराणीच झाली आहेत. तर गांधी घराण्याची लढाऊ परंपरा चालवणाऱ्या राहुल गांधींवर अब्रूनुकसान भरपाईचा खटला दाखल झाला आणि दोन वर्षांची शिक्षा झाली. त्यांचे लोकसभा सदस्यत्व सहा वर्षांसाठी रद्द झाले. त्यांचे निवास काढून घेण्यात आले. अजूनही बरेच काही घडत जाईल. हे सारे एकीकडे घडत असताना, गांधी घराण्यातील लढाऊ परंपरेचा पाचव्या पिढीचा योद्धा माफी मागण्याच्या विरोधात आहे. मी गांधी आहे, सावरकर नाही, असे त्यांनी सांगून टाकले आहे.

आता मूळ मुद्दा अब्रूनुकसानीचा आणि ओबीसी असलेल्या मोदी समाजाचा आहे. ज्यात नीरव मोदीसारखे आर्थिक गुन्हेगार आहेत. ज्यांच्याविषयी साशंकता आहे अशांनाच त्यांच्या नावाने गांधी यांनी अपशब्द म्हणजे 'चोर' असा शब्द वापरला. तो आक्षेपार्ह असेल, तर या चौघांनी अब्रूनुकसान भरपाईचा खटला दाखल करायला हवा होता. पण कर्नाटकात घडलेल्या घटनेचा खटला गुजरातमध्ये एका

वेगळ्याच मोदीने; पण ओबीसी समाजाच्या नावाने दाखल केला. इतर मागास हा शब्द मला अस्पृश्यांप्रमाणे क्लेषदायक वाटतो, असे खुद्द राहुल गांधींनीच 'भारत जोडो यात्रे'त अनेकदा आणि तेही ओबीसी शिष्टमंडळालाच सांगितले होते. आता तेच गांधी ओबीसीमधील एका जातीचा अपमान कसे करतील, असा तार्कीक प्रश्न उपस्थित होतो. तरीही संपत्ती घेऊन परदेशात गेलेल्या एका मोदीच्याही बाजूने आणि समाजाच्या बाजूने हा खटला दाखल झाला. त्याचा निकाल जो काही लागला, तो आपल्या सर्वांनाही ठाऊक आहे. बदनामीच्या गुन्ह्यात दोन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा आहे. जास्तीत जास्त शिक्षा दोनच वर्षे आहे. आपल्या न्यायव्यवस्थेत अशा जास्तीत जास्त शिक्षेचा वापर अपवादानेच होतो. कायद्यात फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे म्हणून कोणीही ही टोकाची शिक्षा सरसकट देत नाही. पण इथे प्रश्न वेगळा आहे. शिक्षा दोन वर्षांची झाली तरच खासदारकी रद्द होऊन सहा वर्षे निवडणूक लढवायला बंदी येते. शिक्षा कमी झाली असती, तर हे घडणार नव्हते. न्यायालयाच्या निर्णयावर टीका करता येत नाही. ते चुकीचे आहे, असे म्हणता येत नाही. निवृत्तीनंतर सर्वोच्च न्यायालयाचे अनेक न्यायाधीश दुसऱ्याच आठवड्यात खासदार, राज्यपाल कसे बनतात, यावरही कोणी चर्चा करत नाही. हे जरी खरे असले, तरी लोकशाहीवादी अशा निकालांविषयी असहमती दर्शवू शकतो. वरच्या न्यायालयात दाद मागू शकतो. तसे राहुल प्रकरणात होईल. निकाल काय लागेल अद्याप गुलदस्त्यातच आहे.

अब्रूनुकसानीचा विचार केल्यास दोन प्रकारचे न्याय दिसून येतात. देशाच्या विरोधी नेत्याला सातत्याने पप्पू म्हटल्यामुळे त्यांचे प्रतिमाहनन झाले नसेल काय? काँग्रेसची विधवा सोनिया गांधी असे म्हटल्यामुळे अब्रूनुकसान झाले नसेल काय? राष्ट्रपिता महात्मा गांधींनाच देशद्रोही, फाळणीला जबाबदार ठरवत त्यांच्या पुतळ्याची तोडफोड करत गोडसे मिरवण्याने अब्रूनुकसान भरपाई झाली नसेल काय, शरद पवारांना महाराष्ट्राची कीड म्हटल्याने प्रतिमाहनन झाले नसेल काय, असे अनेक प्रश्न पुढे येत राहतात. त्यावर कारभाऱ्यांचा पक्ष मौन पाळतो. पंचायत भरवून माणसाचे बळी घेणाऱ्यांना कधी शिक्षा झाली काय? सावरकरांविषयी एखादा शब्द उच्चारल्यावर देशभर आंदोलन होते, तसे गांधींचा पुतळा फोडला गेल्यावर झाले आहे काय? राष्ट्रपित्याचा अपमान म्हणजे राष्ट्राचा अपमान असे कोणी सांगितले आहे काय? एकेकाळी राखीव जागा घेणाऱ्यांना सरकारचे जावई म्हटले जात असे. त्याबद्दल कोणाला शिक्षा झाली आहे काय? आमच्या तरी ऐकीवात नाही. मुद्दा न्यायाच्या कल्पनेचा. आपण कोणतीही गोष्ट केली, की ती राष्ट्र आणि धर्मप्रेमी आणि दुसऱ्याने केली की राष्ट्रद्रोही, समाजद्रोही असा न्याय असू शकत नाही. लोकशाहीत सारेच कायद्यासमोर समान असतील, तर ही कोणती लोकशाही आपण पाहतो आहोत. कारभाऱ्याने म्हणायचे, मी विरोधी पक्षांना संपवणार आणि अगदी तसेच घडू लागते. हा योगायोग आहे, चमत्कार आहे, की एक खोलवर पसरत चाललेल्या नितीचा भाग आहे?

इथे प्रश्न राहुल गांधींचा नाहीच नाही. उद्या ते जे करायचे ते करतील. सर्वोच्च न्यायालयात जातील. पुन्हा 'भारत जोडो यात्रे'त जातील. जे काही व्हायचे ते होईल. पण इथे प्रश्न लोकशाहीचा आहे. इथे कुणाला एकाधिकारशाही किंवा हिंदू राष्ट्रही नको आहे. हिंदू राष्ट्र पाहिजे म्हणून कोणी सामान्य माणसाने नागपूरच्या सनातन विद्यापीठात किंवा गुजरातच्या प्रयोगशाळेत किंवा लाल किल्ल्यावर बोलणाऱ्या कारभाऱ्याकडे कधी निवेदन दिलेले नाही. देशातला एक घटक स्वतःच्या मनातील जीर्ण स्वप्ने लोकांच्या नावावर खपवतो आहे. लोकशाही, तिची मूल्ये किंवा तिने तयार केलेल्या स्वायत्त संस्था यांचा नेहमी एकाधिकारशाहीत अडसर असतो, धर्माधिष्ठित माणसाला अडसर असतो. तो नको असेल, तर मग लोकशाहीचा संकोच करावा लागतो किंवा स्वतःच्या स्वप्नांना प्रतिसाद देणाऱ्या लोकशाहीचे मॉडेल तयार करावे लागते. तसे तर घडत नसेल काय?

लोकशाही शासनप्रकार भारताला तसा नवा आहे. लोकशाही वाढण्यासाठी तिला समतेने भरलेले मैदान लागते. तसे ते मिळाले, तर तिचा विकास होतो. म्हणजे स्वाभाविकच लोकांचाही विकास होतो. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे, आपण विषम परिस्थितीत लोकशाही स्वीकारली आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विषमता असताना आपण लोकशाही स्वीकारली आहे. ती यशस्वी करायची असेल, तर बाकीच्या सर्व विषमता तातडीने संपवून टाकल्या पाहिजेत. त्या तशाच टिकून राहिल्या किंवा काहींनी वेगवेगळ्या नावाने टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला, तर लोक राजकीय लोकशाही उधळून लावतील. शेवटी लोकशाही चांगली असून चालत नाही, तर ते राबवणारे कोण आहेत, कोणाच्या हातात ती आहे यावर बरेच काही अवलंबून आहे. बायबल चांगले असून चालत नाही, तर ते कोणाच्या हातात आहे हेही महत्त्वाचे आहे. ज्यांच्या पणजोबा आणि आजोबांनी स्वातंत्र्यासाठी प्रचंड तुरुंगवास भोगला, ज्यांच्या आजीने स्वतःचे बलिदान देशासाठी दिले, ज्यांच्या वडिलांनीही तेच केले, ज्यांच्या आईनेही सत्तात्याग केला, ज्यांच्या कारकीर्दीत ओबीसी आयोगाची स्थापना झाली ते राहुल गांधी ओबीसींची सामाजिक-जातीय पातळीवर बदनामी करतील काय? हा प्रश्न आपल्या कुणाच्याच मनाला कसा शिवला नाही. त्यागाची परंपरा असलेला कोणीही शहाणा माणूस आणि ओबीसीच्या मतांवर डोळा ठेवणारा अन्य कोणी राजकीय माणूस एवढ्या मोठ्या समूहावर टीका करून राजकारणात तग धरणार नाही. व्यक्तीवर अगदी पंतप्रधानांवर टीका करण्याचा अधिकार सामान्य माणसाला आहे. दारूसम्राट मल्ल्यावर टीका केल्यास त्याच्या समाजावर टीका होणार आहे का? गोडसेवरची टीका म्हणजे त्याच्या जातीवरची टीका असणार आहे काय? या अनेक प्रश्नांची गर्दी आपल्या लोकशाहीभोवती जमा होते आहे. एखादा गुंड जामिनावर सुटला, की बाहेर फटाके उडवून त्याचे स्वागत होते आणि एखाद्या संघर्षशील नेत्याचे सदस्यत्व रद्द होते तेव्हा? आपली मानसिकता कुठे निघाली आहे? हनुमानाची वेशभूषा करण्यासाठी आपल्याला ७५ हजार मुले मिळतात; पण शिक्षणाचे बाजारीकरण थांबवा या मागणीसाठी ७५ मुले मिळत नाहीत. हा सारा प्रकार आपणच आपल्याकडे बोट करावा असा आहे. म्हणून मुद्दा राहुल गांधींचा नाही, तर तो आपल्या सर्वांचा आणि लोकशाहीचा आहे. लोकशाहीवर बोलण्याचे आपण शिकले पाहिजे. भोंग्याला आरती उत्तर म्हणत असतानाच आपले कवचकुंडल असलेल्या लोकशाहीचा विचारही आणि स्वभावधर्म बनला पाहिजे. ●●●

# भारतीय संसद आणि डॉ. आंबेडकर



अनंत बागाईतकर

**मूलतः लोकशाही आणि त्यातही संसदीय लोकशाही यावर असलेला नितांत विश्वास किंवा श्रद्धा ही डॉ. आंबेडकरांच्या विविध प्रसंगी केलेल्या विचारांमधून प्रकट झालेली आहे. किंबहुना भारताच्या विविधतेचा उल्लेख त्यांनी अनेक प्रसंगी करून ती विविधता सामावून घेण्यासाठी संसदीय लोकशाहीची प्रणाली कशी उचित आणि योग्य ठरेल याचे विवेचन केलेले आढळते.**

भारतासाठी संसदीय लोकशाही प्रणालीचा प्रस्ताव करताना राज्यघटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काही मूलभूत संकल्पनांचा ऊहापोह केला होता. मुख्यतः जगातले दोन प्रमुख लोकशाही देश असलेल्या ब्रिटन आणि अमेरिका यांच्या प्रणालींची चर्चा त्यांनी केली होती. हे दोन्ही देश लोकशाहीचे अनुसरण करणारे आहेत; परंतु तेथील राज्यपध्दती भिन्न आहे. अमेरिकेत सत्ताविभाजनावर आधारित अध्यक्षीय पध्दती किंवा व्यवस्था आहे. तर ब्रिटनमध्ये संसदीय प्रणाली किंवा व्यवस्था आहे. दोन्ही देशांत या व्यवस्था आपापल्या पद्धतीने प्रदीर्घकाळ सुरू आहेत. त्या खंडित झालेल्या नाहीत. भारतात अध्यक्षीय पद्धतीपेक्षा संसदीय प्रणाली अधिक संयुक्तिक का ठरेल याची चर्चा करताना डॉ. आंबेडकरांनी जबाबदारी किंवा उत्तरदायित्वाचे तत्त्व मूलभूत किंवा आधारभूत मानलेले आढळते. त्यांच्या मते, अमेरिकेतील अध्यक्षीय प्रणालीत जबाबदारी किंवा उत्तरदायित्वाचे तत्त्व जवळपास अस्तित्वात नसल्यासारखे आहे. कारण तेथे अध्यक्ष आणि त्याच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ हे संसदेला म्हणजेच लोकप्रतिनिधींना जबाबदार ठेवण्याचे तत्त्व राखण्यात आलेले नाही. तेथील राज्यघटनेनुसार, सत्तविभाजनाच्या सिध्दांताप्रमाणे संसद किंवा कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ किंवा सरकार आणि न्यायमंडळ किंवा न्यायपालिका हे लोकशाहीचे तिन्ही स्तंभ हे परस्परांपासून स्वतंत्र व स्वायत्त मानण्यात आले आहेत. सरकार हे तेथील संसदेला जबाबदार ठेवण्यात आलेले नाही; परंतु संसदीय लोकशाही प्रणालीत सरकार हे संसदेला जबाबदार धरण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सरकारच्या कारभारावर देखरेखीचे, त्यांच्या कारभाराचे मूल्यमापन, छाननी करण्याचे अधिकार संसदेला देण्यात आलेले आहेत.

**संसदीय लोकशाही प्रणालीचा प्रस्ताव**

डॉ. आंबेडकर यांनी यासंदर्भात ४ नोव्हेंबर १९४८ रोजी केलेल्या भाषणात वरील संकल्पनेची चर्चा केली आहे. स्थिरता विरुद्ध जबाबदारी (उत्तरदायित्व) ही त्या भाषणाची मध्यवर्ती कल्पना होती. भारतीय राज्यघटनेच्या दृष्टीने हा अतिमहत्त्वाचा दिवस होता. कारण याच दिवशी त्यांनी राज्यघटनेचा मसुदा किंवा कच्चा आराखडा घटना परिषदेला सादर केला होता. त्यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी संसदीय प्रणालीचा स्वीकार करण्यामागील भूमिकेची मांडणी



सादर केली होती. अर्थात, या भाषणात त्यांच्या डोळ्यासमोर एक आदर्श संसद, तेवढेच आदरणीय संसदसदस्य आणि नियम व कायद्यांचे प्रामाणिक पालन करणारे नागरिक व त्यांचे लोकप्रतिनिधी होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशप्रेमी नागरिक आणि त्यांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी मिळालेल्या स्वांत्र्याची बूज राखून संसदीय लोकशाही प्रणाली यशस्वी करतील आणि मताधिकार मिळालेले सर्वसामान्य नागरिकदेखील दर पाच वर्षांनी या लोकप्रतिनिधींच्या कामाचे मूल्यमापन करून त्यांना पुन्हा निवडून द्यावयाचे की नाही, हे ठरवतील. सर्वसामान्य नागरिकांना देण्यात आलेला मताधिकार हाच या प्रणालीतील सर्वात महत्त्वाचा अंकुश राहील, अशी त्यांची धारणा होती. थोडक्यात, लोकप्रतिनिधी, सरकार यांच्या पाच वर्षातील कामगिरीच्या छाननीवर आधारित मतदान होईल, असा विश्वास डॉ.

आंबेडकर यांना होता. त्याच भावनेतून त्यांनी संसदीय लोकशाही प्रणालीचा प्रस्ताव केला होता.

यासंदर्भात त्यांच्या भाषणाचे प्रत्यक्ष संदर्भ देणे संयुक्तिक ठरेल. डॉ. आंबेडकर या दोन्ही लोकशाही प्रणालींबद्दल बोलताना म्हणाले होते, ‘‘सरकारच्या या दोन्ही पद्धती अर्थातच लोकशाही स्वरुपाच्या आहेत. त्यामधील एकाची निवड करणे अवघड आहे. अमेरिकन आणि स्विस व्यवस्थांमध्ये स्थिरता अधिक आहे; परंतु जबाबदारी किंवा उत्तरदायित्व कमी आहे. या उलट ब्रिटिश (संसदीय) व्यवस्थेत उत्तरदायित्व अधिक आणि स्थिरता कमी आहे. याचे कारण स्पष्ट आहे. अमेरिकन संसद म्हणजेच काँग्रेस राष्ट्राध्यक्षाला काढून टाकू शकत नाही; परंतु संसदीय लोकशाहीत सरकारने संसदेतील बहुमताचा विश्वास गमावल्यास त्या सरकारला तत्काळ राजीनामा द्यावा लागतो.’’



**स्वतंत्र भारताच्या संविधानाचा मसुदा राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर**

आपल्या युक्तिवादात डॉ. आंबेडकर यांनी पुढे म्हटले, ‘‘बिगर संसदीय व्यवस्थेत सरकारच्या जबाबदारीचे मूल्यमापन नियमित होत असते. दोन वर्षातून एकदा ते होत असते. ते मतदारांकडून केले जाते. इंग्लंडमध्ये सरकारचे मूल्यमापन नियमित म्हणजेच विशिष्ट कालावधीनुसार आणि दररोज केले जाते. दैनंदिन मूल्यमापन संसद सदस्यांकडून होते. प्रश्न, ठराव, अविश्वास प्रस्ताव, स्थगन प्रस्ताव आणि विविध चर्चांच्या माध्यमातून ते केले जाते. मतदारांकडून दर पाच वर्षांनी किंवा कमी काळातही निवडणुकीच्या माध्यमातून सरकारचे मूल्यमापन केले जाते.’’ डॉ. आंबेडकरांच्या युक्तिवादातील मूलभूत मुद्दा हा (सरकारच्या) जबाबदारी किंवा उत्तरदायित्वासाठीच्या यंत्रणेचा होता. त्यामुळेच ते पुढे म्हटतात, ‘‘सरकारच्या उत्तरदायित्वाच्या दैनंदिन मूल्यमापनाची पद्धत अमेरिकन प्रणालीत उपलब्ध नाही; परंतु भारतासारख्या देशात विशिष्ट कालावधी किंवा मुदतीपेक्षा दैनंदिन मूल्यमापनाची आवश्यकता मोठी आहे. याचे कारण संसदीय प्रणालीतील सरकारे दैनंदिन मूल्यमापनाच्या आधारे केव्हाही बरखास्त केली जाऊ शकतात.’’

**संसदीय लोकशाही प्रणाली स्वीकारण्यामागील भूमिका**

राज्यघटनेचा मसुदा किंवा कच्चा आराखडा घटना परिषदेला सादर करताना केलेल्या भाषणात डॉ. आंबेडकर यांनी, संसदीय लोकशाही प्रणाली स्वीकारण्यामागील भूमिका तपशीलाने मांडली. यानंतर घटना परिषदेत या मसुद्यावर तपशीलाने चर्चा करण्यात आली. या भाषणानंतर एक वर्षाने या मसुद्याला राज्यघटना म्हणून मान्यता देण्यात आली. घटना परिषदेत करण्यात आलेल्या सखोल चर्चेनंतर आणि त्या चर्चेदरम्यान व्यक्त झालेल्या मतमतांतरांचा आढाव घेणारे अंतिम भाषण त्यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी केले. त्या भाषणाचा संदर्भ देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण एवढ्या सखोल चर्चे नंतरदेखील डॉ. आंबेडकर यांचा संसदीय लोकशाही प्रणालीवरील विश्वास किंवा श्रद्धा कमी झालेली नव्हती. किंबहुना, राज्यघटना आणि त्या माध्यमातून स्वीकारण्यात आलेल्या संसदीय लोकशाही प्रणालीची यशस्वी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी उदयोन्मुख देश म्हणून प्रत्येक भारतीयाची कशी आहे, याचे दर्शन त्यांच्या या अंतिम भाषणात घडते. त्यामुळेच त्यांची ही दोन भाषणे ऐतिहासिक मानावी लागतील. या भाषणात त्यांनी उच्चारलेल्या शब्दांना भविष्याचा स्पर्श झाल्याचे जाणवते. कारण मिळालेले स्वातंत्र्य गृहीत धरू नका, असा इशारा देतानाच त्यांनी राज्यघटना, लोकशाही, संसदीय प्रणाली यांची अंमलबजावणी उचित आणि योग्यप्रकारे न केल्यास त्यातून येणाऱ्या अपयशाची जबाबदारी सर्वस्वी आपणा सर्वांवर असेल आणि त्यासाठी इतरांना किंवा ब्रिटिशांना किंवा त्यांच्या राजवटीला दोषी धरण्याचा अधिकार आपल्याला नसेल असे त्यांनी ठामपणे आणि अत्यंत सडेतोडपणे सांगितले होते.

संसदीय लोकशाही प्रणालीच्या कामकाजाच्या महत्त्वाबाबत त्यांनी थेट चर्चा केलेली नसली, तरी त्यांनी केलेली मांडणी व मुद्दे यांच्या माध्यमातून ते महत्त्व पुरेशा स्वरुपात प्रकट झाले होते. राज्यघटना मसुदा समिती (ड्राफ्टिंग कमिटी) आणि त्या मसुद्यावर चर्चा करणारी सर्वसाधारण सभा किंवा घटना परिषद (कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली) यांच्यातील परस्परसंबंधांबाबत बोलताना ते म्हणाले होते, ‘‘घटना परिषद हा बहुविध मते असलेल्या म्हणजेच विषम स्वरुपाचा एखादा समूह असता सिमेंट न लावता केवळ एकावर एक दगड लावण्याच्या प्रकारासारखे ते झाले असते, की ज्यामध्ये प्रत्येक सदस्य किंवा गट हा मनमानी करणारा ठरला असता आणि त्यातून केवळ गोंधळ झाला असता.’’

‘‘....................त्याच प्रमाणे केवळ पक्षशिस्तीच्या नावाखाली सर्वच सदस्यांनी केवळ पक्षाच्या सुरात सूर मिसळला असता, तर कामकाज अत्यंत नीरस झाले असते. पक्षशिस्तीच्या नावाखाली किंवा त्यामध्ये अंतर्भूत ताठरपणामुळे ही सभा केवळ होयबा मंडळींची सभा ठरली असती.’’

वर उल्लेखित भावना व्यक्त करुन डॉ. आंबेडकर यांनी मसुद्याबाबत भिन्न मते प्रकट करणाऱ्या सर्व सदस्यांचे मनापासून आभार मानले आणि त्यांनी भिन्न विचार व मते व्यक्त केल्याने चर्चा

अत्यंत समृद्ध झाल्याचा उल्लेख केला. यासंदर्भात त्यांनी ह.वि. कामथ, डॉ. पी.एस. देशमुख, श्री. सिधवा, प्रा. सक्सेना, पं. ठाकूर, दास भार्गव यांची नावे घेतली. त्याचबरोबर के.टी. शहा आणि हृदयनाथ कुंझरू यांचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. या सर्वांनी वैचारिक मुद्दे उपस्थित केले, असे ते म्हणाले. मात्र संसदीय लोकशाही प्रणालीतील विरोधी मतांचा आदर करण्याची भूमिका अधोरेखित करताना त्यांनी व्यक्त केलेले विचार अत्यंत महत्त्वाचे होते. ''त्यांच्या सूचना मान्य केल्या नसल्या तरी त्यांच्या सूचनांचे मूल्य कमी होत नाही, तसेच या परिषदेतील चर्चा जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी सादर केलेल्या सूचनांचे महत्त्वही कमी होत नाही. उलट त्यांनी व्यक्त केलेल्या भिन्न मतांमुळे मला राज्यघटनेच्या मूलभूत-आधारभूत तत्त्वांचे स्पष्टीकरण करण्याची संधी मिळाली आणि माझ्या दृष्टीने निव्वळ तांत्रिक चर्चेने (राज्यघटना) संमत करण्यापेक्षा ही बाब अधिक महत्वाची होती.''

**असंख्य-हजारो जातींमध्ये विखुरलेले**
**लोक एक राष्ट्र कसे होऊ शकतात?**

मूलतः लोकशाही आणि त्यातही संसदीय लोकशाही यावर असलेला नितांत विश्वास किंवा श्रद्धा ही डॉ. आंबेडकरांच्या विविध प्रसंगी केलेल्या विचारांमधून प्रकट झालेली आहे. किंबहुना भारताच्या विविधतेचा उल्लेख त्यांनी अनेक प्रसंगी करून ती विविधता सामावून घेण्यासाठी संसदीय लोकशाहीची प्रणाली कशी उचित आणि योग्य ठरेल याचे विवेचन केलेले आढळते. यासंदर्भात त्यांनी व्यक्त केलेले मतही अतिशय उल्लेखनीय होते. ''भारताला स्वातंत्र्य मिळाले म्हणून रातोरात या देशाचे (कंट्री) रुपांतर ''राष्ट्र'' (नेशन) या संकल्पनेत होईल, अशी अपेक्षा करणे उचित ठरणार नाही'' असे मत व्यक्त करून त्यांनी अमेरिकेचे उदाहरण दिले होते. ''अमेरिकेच्या निर्मितीनंतर तेथील नागरिकांनी हेतुपूर्वक युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका हे देशाचे नाव स्वीकारले होते, युनायटेड नेशन्स नव्हे'', याकडे त्यांनी लक्ष वेधले होते. यासंदर्भातील त्यांचे विवेचनही तर्कावर आधारित होते. ते म्हणाले, ''अमेरिकेतील लोकांना ते (एक) राष्ट्र नसल्याची भावना असेल, तर भारतीयांनादेखील ते एक राष्ट्र असल्याची भावना त्वरित मानणे किती अवघड असेल. मला स्मरण आहे, की काही राजकीयदृष्ट्या प्रेरित भारतीयांनी 'पीपल ऑफ इंडिया' म्हणजेच 'भारतीय लोक' या शब्दांना आक्षेप घेतला होता. त्यांनी 'इंडियन नेशन' या संज्ञेला पसंती दिली होती; परंतु माझे मत असे आहे, की आपण एक राष्ट्र आहोत असे मानणे हे भ्रामकपणा पाळण्यासारखे असेल. असंख्य-हजारो जातींमध्ये विखुरलेले हे लोक एक राष्ट्र कसे होऊ शकतात?'' याच ओघात त्यांनी केवळ राजकीय लोकशाही व्यवस्था स्वीकारणे पुरेसे नाही, तर सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने वाटचाल करणे हे अधिक महत्त्वाचे असेल आणि अवघडही असेल, असे मत व्यक्त केले. देश या संकल्पनेपासून राष्ट्र या संकल्पनेपर्यंतचा प्रवास अवघड असेल, असे नमूद करताना त्यांनी त्यासाठी राज्यघटनेत समाविष्ट तत्त्वांच्या प्रामाणिक अंमलबजावणीवर भर दिला होता.

**...तर ती राज्यघटनादेखील वाईट होऊ शकते**

राज्यघटना आणि त्यामध्ये समाविष्ट तत्त्वे व उद्दिष्टे यांची पूर्तता करण्याच्या संदर्भात त्यांनी इशारेवजा केलेल्या टिप्पण्याही अत्यंत महत्त्वाच्या होत्या. राज्यघटनेनुसार काम करणे किंवा तिची अंमलबजावणी करणे हे केवळ त्या दस्तऐवजावर अवलंबून नाही. अंतिमतः तिची अंमलबजावणी कशी केली जाते म्हणजेच त्यावरच तिची परिणामकारकता अवलंबून राहील, असे त्यांनी म्हटले होते. यामध्ये त्यांचा रोख राज्यघटनेची अंमलबजावणी करणाऱ्यांवर म्हणजेच राज्यकर्त्यांकडेदेखील होता. ''........ राज्यघटना कितीही चांगली असली तरी तिची अंमलबजावणी करणारी मंडळी वाईट असतील, तर ती राज्यघटनादेखील वाईट होऊ शकते. त्याचप्रमाणे एखादी राज्यघटना वाईट असली, तरी तिची अंमलबजावणी करणारे चांगले असतील तर ती चांगली ठरू शकते.''

याच मालिकेत डॉ. आंबेडकर यांनी नायक-पूजा (हीरो वर्शिप) किंवा व्यक्तिपूजा या बाबी लोकशाहीला कशा घातक आहेत, याचेही विवेचन केलेले आढळते. सध्याच्या कालखंडात त्यांचे हे विवेचनही प्रासंगिक व समयोचित ठरल्याखेरीज राहणार नाही. देशाची आयुष्यभर सेवा करणाऱ्या महान व्यक्तींबद्दल कृतज्ञता बाळगणे गैर नाही; परंतु त्याला काही मर्यादा असणे गरजेचे असते. आपल्या स्वातंत्र्याची किंमत देऊन व्यक्तिपूजा करणे देशाला परवडणारे नाही, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले होते. भारताच्या दृष्टीने ही बाब अधिक गंभीर व सावधगिरी बाळगण्याची आहे. कारण भारतीय राजकारणात ही भक्ती किंवा व्यक्तिपूजा अत्यंत मोठ्या प्रमाणात प्रचलित आहे आणि जगात इतरत्र कुठेही तिचे एवढे मोठे प्रमाण आढळत नाही. धर्मातील भक्ती हा आत्म्याच्या मुक्तीचा किंवा मोक्षाचा मार्ग असू शकतो; परंतु राजकारणातील व्यक्तिपूजा किंवा भक्ती हा अधःपतन आणि त्यातूनच हुकुमशाहीकडे जाणारा मार्ग ठरतो.

**व्यक्तिपूजा आणि व्यक्तिस्तोम**
**हा हुकुमशाहीकडे जाणारा मार्ग**

सध्याच्या प्रचलित राजकारणालाही समर्पक ठरेल असे डॉ. आंबेडकरांचे हे शब्द आहेत. त्यांनी इंग्रजीत बोलतानादेखील भक्ती हा शब्द वापरलेला होता. व्यक्तिपूजा आणि व्यक्तिस्तोम हा हुकुमशाहीकडे जाणारा मार्ग आहे, असा इशारा त्यांनी राज्यघटना लागू करताना दिलेला होता. ते त्यांचे शब्द १९७५ मध्ये खरे ठरले होते आणि सध्या देशाची वाटचाल ज्या अंधभक्तीने सुरू आहे त्याची परिणितीदेखील त्याच्या पुनरावृत्तीत न होवो, एवढीच अपेक्षा आहे. एकव्यक्तिकेंद्रित किंवा नायककेंद्रित राजकारणाला विरोध करताना त्यांच्या वाणीला प्रेषिताचा स्पर्श झालेला आढळतो. याचे कारण ते मूलतः लोकशाहीवर श्रद्धा ठेवणारे होते. लोकशाहीवरील त्यांचा विश्वास आणि श्रद्धा अनेक प्रसंगी आदर्शवादाकडे झुकलेली आढळते, असे मत काही अभ्यासकांनी व्यक्त केले आहे; परंतु जोपर्यंत समाजापुढे आदर्श निर्माण केले जात नाहीत, तोपर्यंत समाजाला योग्य दिशा मिळत नसते. कारण आदर्श हे दीपस्तंभासारखे असतात आणि त्याची अनिवार्यता प्रत्येक समाजाला असते. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी या देशाला दिलेली लोकशाहीची जीवनदृष्टी ही अनन्यसाधारण आहे. तिची प्रासंगिकता, समयोचितता आजही टिकून आहे आणि त्याचे अनुसरण केल्यास व्यवस्थेची होत असलेली घसरणही थांबविण्याची क्षमता त्यामध्ये आजही आहे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धर्मविचार



डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

**डॉ. आंबेडकरांचा धर्मविचार हा मुळातच एकूण धर्म या संकल्पनेचाच पुनर्विचार असून तो धर्माला अधिक न्याय्य आणि सुयोग्य पायावर उभा करणारा धर्मविचार ठरलेला आहे.सामाजिक परिवर्तनाला बांधलेला तो विचार आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या सुरुवातीपासूनच्या लेखनात धर्म विषयक विचारांची मांडणी करतांना धर्माची गरज ही सततच प्रतिपादन केलेली आहे. धर्माबाबत विचार मांडताना 'धर्म ही अफूची गोळी आहे' एवढेच मार्क्स म्हणाल्याचे प्रचारित करून मार्क्सबद्दल भ्रम निर्माण केला जातो. मुळात मार्क्सचे धर्माबाबतचे ते पूर्ण मूळ विधान हे Religion is the opium of the people. It is the sigh of the oppressed creature, the soul of our soulelless conditions असे आहे. म्हणजे आत्मा गमावून बसलेल्या आपल्या परिस्थितीचा धर्म हा आत्मा असून दबलेल्या, पिचलेल्या लोकांचा तो उसासा आहे. म्हणजेच मानवी समाजातले धर्माचे महत्त्व मार्क्स नाकारत नाही, तर ते अधोरेखित करतो. त्याचे धर्माबाबतचे मतही नकारात्मक वा धर्मविरोधी नाही.

मुळात मार्क्स जर्मन भाषेत लिहीत असे. Volk असा जो जर्मन शब्द मार्क्सने वापरला त्याचा अर्थही 'मासेस' पेक्षा 'लोक' असाच असल्याचे सांगितले जाते. मार्क्सने हे विचार मांडले त्या काळात अफू ही फक्त मादक, गुंगी आणणारी वस्तू म्हणून बघितली जात नव्हती. त्यावर बंदीही नव्हती अथवा तिचा वापरही करणे बेकायदेशीर नव्हते. उलट अफूचा मोठ्या प्रमाणावर वापर हा औषधी स्वरूपाचा होता. मार्क्सने धर्माला अफू त्या औषधी उपयोगाच्या अर्थाने म्हटले होते.

**माणूस हा धर्माचे साधन नव्हे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही धर्माचे मानवी समाजातले स्थान नाकारलेले नाही.त्यांना धर्म हवाच आहे, मात्र तो विषमतामूलक नको आहे. धर्माच्या नावावर ढोंग त्यांना नको आहे. धर्माला ते माणसाची प्रेरक शक्तीही मानतात. धर्म माणसात आशा निर्माण करतो आणि माणसाला कृतिप्रवण करतो, असेही ते मानतात. त्यांच्या मते, धर्म हा माणसाची सेवा करण्यासाठी आहे. माणूस हा धर्माचे साधन नव्हे, असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. धर्म माणसासाठी आहे, माणूस धर्मासाठी नाही, असे ते सांगतात. आज तर त्यांचे हे म्हणणे अधिक मोठ्याने व ठसठशीतपणे मांडण्याची गरज आहे. कारण साऱ्या जगभरच मूठभरांच्या हातीच तेवढी संपत्ती संचय करून घेण्यासाठी व त्याकरता सत्ता आणि वर्चस्व टिकवून धरण्यासाठी, माणसांना धर्मयुद्धात गुंतून पडण्याची दीक्षाच दिली जाते आहे. धर्मद्वेष व धर्मभेद अधिक टोकाचे करणारे राजकीय, आर्थिक आणि वर्चस्व हितासाठीचे धार्मिक ध्रुवीकरण करत सत्ता, वर्चस्व टिकवले जाते आहे.



मार्क्स असो, विवेकानंद वा डॉ. बाबासाहेब आंबेडकर अथवा डॉ. पंजाबराव देशमुख हे महापुरुष मुळातच मानवतावादी आणि मानवाधिकाराची प्रतिष्ठापना करणारे आहेत. धर्माला विघातक आणि विकृत वळण दिले जाण्याच्या विरोधातच ते उभे असून धर्म ही माणसाच्या व समाजाच्या जीवनातली विधायक शक्ती या स्वरूपातील धर्मविचार हे त्यांच्यातले साम्य आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवितकार्यच मुळी हिंदू धर्म सुधारणा व त्या धर्माला विधायक, तार्किक वळण लावणे हे होते.

धर्माचे तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, विविध धर्म, त्यांचे स्वरूप या साऱ्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय सखोल, चिकित्सक आणि तुलनात्मक अध्ययन केले होते. त्यांच्या धर्मविषयक शास्त्रीय, पद्धतशीर आणि सर्वांगीण अध्ययनाचा हेतू ज्या धर्मात ते जन्माला आले होते, त्या हिंदू धर्माची समग्र चिकित्सा करून त्यात बदल घडवण्याचाच होता. धर्म ही संज्ञा बाबासाहेब धर्मशास्त्र या अर्थाने वापरतात. सकारात्मक धर्माची वैशिष्ट्ये मांडतांना बाबासाहेब म्हणतात, की सकारात्मक धर्माची वाढ ही आदिम धर्माप्रमाणे झालेली नाही. त्याचे मूळ हे महान धार्मिक नवकल्पकांच्या शिकवणुकीत असते, असे ते सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्माचा अर्थ अशी आदर्श व्यवस्था, जिचे उद्दिष्ट लोक एका नैतिक व्यवस्थेत जगतील, अशी समाजव्यवस्था निर्माण करणे, हा घेतात. त्यांच्या सर्व धर्मविषयक विचारांचा पायाही तोच आहे.

कोणत्याही धर्मातला निश्चित, स्थायी आणि प्रभावी भाग म्हणजे काय हे विशद करणे हे नेहमीच कठीण काम असते, असे ते सांगतात. त्याचप्रमाणे धर्माची आवश्यक वैशिष्ट्ये त्यातल्या अनावश्यक भागापासून वेगळी करणे हेदेखील सोपे काम नसल्याचे ते सांगतात. त्यांचा धर्मविचार हे काम करत होता आणि ते करून खरा धर्म ते मांडत होते. प्रोफेसर रॉबर्टसन स्मिथ यांचे, धर्माचे जुने आणि नवे स्वरूप दोन्हीही सोबतच टिकवले जाते हे म्हणणे उद्‌धृत करत भारतात तर हेच झाले आहे, हे डॉ. बाबासाहेब सांगतात.

एकेकाळी जीवनविषयक साऱ्याच बाबी, शास्त्र, विज्ञाने, सर्वच प्रकारच्या ज्ञानाचे स्त्रोत या स्वरूपात असलेले धर्माचे हे विशाल, व्यापक साम्राज्य बाबासाहेबांच्या मते, कोपर्निकस, डार्विन यांच्या वैज्ञानिक, सैद्धांतिक मांडणीनंतर उद्ध्वस्त होत गेले. ही ते मोठीच क्रांती मानतात. सुमारे चारशे वर्षे विज्ञान आणि धर्मशास्त्र यांच्या सुरू असलेल्या संघर्षाचा तो परिणाम होता, असे ते म्हणतात. या क्रांतीमुळेच विचारस्वातंत्र्याची प्रतिष्ठापना झाली, इहवादीकरणाच्या या प्रक्रियेचे केवळ वैज्ञानिकांनीच तेवढे स्वागत केले असे नाही, तर धार्मिक असलेल्यांनाही त्यामुळे धर्मशास्त्र म्हणून शिकवल्या गेलेल्या कितीतरी बाबी या अनावश्यक आणि त्यांच्या धार्मिक जीवनात अडथळे आणणाऱ्या असल्याचे जाणवत गेले आणि त्यांनाही ही प्रक्रिया स्वागतार्ह वाटली, असे बाबासाहेब म्हणतात.

ईश्वर ही संकल्पना धर्माचा अविभाज्य भाग नाही, ती धर्मात कशी शिरली हे सांगणे कठीण आहे, असे सांगत बाबासाहेब म्हणतात, की धर्म आणि नैतिकता यांचा संबंध मात्र अविभाज्य स्वरूपाचा आहे. मानवी अस्तित्वाशी तो संबंधित आहे. जन्म, मृत्यू, जीवन, लग्न यांसंदर्भात धर्म आणि नैतिकता या परस्परसंबद्ध बाबी आहेत. धर्म या बाबींच्या पवित्रीकरणाशी, तर नैतिकता त्यांचे रक्षण करणाऱ्या नियमांशी संबंधित असते. हे नाते धर्म आणि ईश्वर यांच्या संबंधांपेक्षा अधिक नैसर्गिक होते. मात्र या बाबी परस्परसंबद्ध केव्हा झाल्या असतील, हे सांगता येणे सोपे नाही. बाबासाहेबांनी माणसाच्या आदिम अवस्थेपासून तो आधुनिक अवस्थेपर्यंत बदलत गेलेल्या धर्मस्वरूपाची तपशीलवार चर्चा केलेली आहे. तसेच धर्मबदलाचेदेखील स्वरूप ओल्ड टेस्टामेंटमधील दाखला देत त्यांनी स्पष्ट केले आहे. प्राचीन जगात राष्ट्रीयत्वाचा बदल म्हणजे संप्रदाय बदल असे, तर सामाजिक संलयन म्हणजे धार्मिकच असे, असे ते म्हणतात. आधुनिक समाजात सामाजिक अभिसरणासाठी धर्म गुंडाळून ठेवण्याची वा दुसरा धर्म स्वीकारण्याची गरज नाही.

**हिंदूंची समाजव्यवस्था बंधुतेच्या विरोधात आहे**

बाबासाहेब प्राचीन काळापासूनच्या धर्म संकल्पनेची विविध अंगाने तपासणी करत धम्म विचारापर्यंत आले होते. हिंदू जीवनाचे तर क्षणोक्षणी नियमन धर्म करत असतो, अशी कोणतीही बाब नाही, की जी हिंदू धर्मात धर्माने नियंत्रित केली जात नाही. बाबासाहेबांनी आपण हिंदू धर्माची चिकित्सा ही न्याय्य वागणुकीच्या निकषावर करतो आहोत, कारण स्वातंत्र्य, समता, बंधुता याचेच दुसरे नाव न्याय आहे, असे म्हटले होते. हिंदूंची समाजव्यवस्था ही समता आणि बंधुता यावर आधारलेली नसून ती श्रेणीबद्ध विषमता, स्थायी आणि अपरिवर्तनीय वंशपरंपरागत व्यवसाय, वर्णव्यवस्था या पायावर उभी आहे आणि ती बंधुतेच्या विरोधात आहे. समतेचे तत्त्व ती मान्य करत नाही, तर विषमतेला ती अधिकृत तत्त्वज्ञान मानते. व्यवसाय हे जन्मजात जातीने निश्चित झालेले म्हणून त्याचेही स्वातंत्र्य नाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे; पण ते त्या समाजव्यवस्थेच्या बाजूनेच बोलणाऱ्यांसाठी, ते व्होल्टेअरच्या संकल्पनेप्रमाणे दुसऱ्याचे म्हणणे मान्य करणारे व त्यासाठी झगडणारे नाही, अशी मांडणी बाबासाहेब हिंदू धर्माची चिकित्सा करताना करतात.

ही सामाजिक व्यवस्था व्यक्तीधिष्ठित नसून वर्णाधिष्ठित आहे. पहिल्या वर्णाची व्यक्ती शेवटच्या वर्णाची आणि शेवटच्या वर्णाची ही पहिल्या वर्णाची कधीच होऊ शकत नाही, अशी कप्पेबंद सामाजिक व्यवस्था हे हिंदू धर्माचे ते व्यवच्छेदक लक्षण सांगतात. नित्शेचा सुपरमॅन आणि मनूने कल्पिलेला श्रेष्ठ मानव हे एकच असल्याचे बाबासाहेब म्हणतात. नित्शेचे 'दस स्पेक झरतृष्ट' ही दुसरी मनुस्मृतीच ते मानतात. मात्र नित्शे आणि मनू यांच्यातला फरकही त्यांनी स्पष्ट केला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी 'वैदिक वाङ्मयातील धर्माचा उद्‌गम आणि विकास' हा त्यांचा विद्वत्तापूर्ण प्रबंध मांडून केलेल्या धर्मचिकित्सेअगोदर बाबासाहेबांनी आर्यांचे सखोल अध्ययन सुरू केले होते. त्याचा संदर्भ बुद्धाने नेमकी कोणती धम्म क्रांती केली तिचे स्वरूप जाणून घेण्यासाठीचा होता. मात्र, 'The Ancient Regime: The State of Aryan Society ' हा त्यांचा महाराष्ट्र शासन प्रकाशित त्यांचे लेखन व भाषणे, खंड ३ मध्ये समाविष्ट मूळ निबंध हा अपूर्णच राहिलेला आहे.

मात्र याच खंडात पुढे प्रकरण ८ मध्ये समाविष्ट 'Reformers and Their Fate' हा जो निबंध दोन भागात आहे, त्याचा पहिला भाग हा Aryan Society असा आहे. त्यात त्यांनी आर्य धर्माचे यज्ञ स्वरूप व त्यात द्यायच्या २१ प्रकारच्या आहुत्या, बळी याचे वर्णन केले आहे. त्याचा हेतू या धरातलावर चांगल्या गोष्टी मिळवण्याचा सांगितला आहे. धर्माचे हे स्वरूप वैदिक धर्माचे रूपांतर पुरोहित धर्मात झाल्यानंतरचे आहे. यज्ञसंस्थेच्या त्या पार्श्वभूमीवर बुद्ध विचारांचा उदय कसा झाला, हे सांगण्यासाठी त्यांनी ते मांडले आहे.

**तो धर्म नसून ती थट्टा आहे**

धर्म इतर धर्मियांसोबत मानवतेचे वर्तन शिकवत नसेल, तो अन्य काहीही नसून शक्ती प्रदर्शन आहे, असे ते म्हणत. जो धर्म पशूचा स्पर्श सहन करतो; पण माणसाचा सहन करत नाही, तो धर्म नसून ती थट्टा आहे, असे मत ते मांडतात. जो धर्म विशिष्टच वर्गाला शिक्षणापासून, संपत्तीपासून, शस्त्र धारण करण्यापासून वंचित राखतो, तो धर्म नसून थट्टा आहे, असे ते मानतात. जो धर्म दरिद्री आणि अज्ञानी लोकांना दरिद्रीच राहायला बाध्य करतो, तो धर्म नसून संकट असल्याचे ते सांगतात. माणसाचे स्वत्व जपणे हे जो धर्म पाप मानतो, तो धर्म नसून तो ते आजार मानतात.

आचार्य अत्रे यांनी बाबासाहेबांच्या बाबतीत लिहितांना असे म्हटले होते, की मनुष्याच्या शरीराचा, बुद्धीचा आणि आत्म्याचा कोणत्या धर्मामध्ये जास्तीत जास्त विकास होईल याची त्यांना चिंता लागून राहिलेली आहे. त्यांना हिंदू धर्म पाहिजे आहे; पण चातुर्वर्ण्य नको आहे. त्यांची धर्मांतराची चळवळ ही हिंदू धर्माच्या विध्वंसाची नसून ती हिंदू धर्माच्या सुधारणेची चळवळ होती.चातुर्वर्ण्याची हुकुमशाही नष्ट करून हिंदू धर्माची रचना समतेच्या आणि लोकशाहीच्या पायावर करा, असे टाहो फोडून ते सांगत आहेत.

**तत्सम कार्य करणाऱ्यांना आजही जीवे मारण्याच्या धमक्या!**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्मविचार हा मुळात हिंदू धर्मसुधारकाचा. तो धर्म परिष्कृत करण्यासाठी समता, बंधुता,

मानवता, स्वातंत्र्य या पायावर तो उभा करण्यासाठीचा धर्मविचार होता व हे विवेकी विद्वानांनाही पटले होते. त्यांच्या धर्मविचारांचे सार म्हणजे डॉ. गंगाधर पानतावणे यांनी म्हटल्याप्रमाणे, धर्म आणि समाज यांचे पृथकत्व त्यांना अभिप्रेत आहे. १५ मार्च १९२९ च्या ‘बहिष्कृत भारत’च्या अंकात बाबासाहेबांनी हेच ठामपणे सांगितले, की हिंदू समाजात धार्मिक सुधारणेखेरीज सामाजिक सुधारणा होणे शक्य नाही. त्यांचे हे भाकित आज सुमारे शंभर वर्षानंतरही खरेच ठरलेले आहे.

सुधारणांचे कायदे झाले मात्र मनाने ते पूर्णपणे स्वीकारले गेले का? हा प्रश्न शिल्लकच आहे. तसे नसते तर महाराष्ट्रात झालेला अंधश्रद्धा निर्मूलन कायदा परत घेण्याची मागणी करणारे कशाला उभे झाले असते? पानसरे, दाभोळकर, कलबुर्गी, गौरी लंकेश अशा सुधारकांच्या हत्या का झाल्या असत्या? तत्सम कार्य करणाऱ्यांना आजही जीवे मारण्याच्या धमक्या कशाला दिल्या गेल्या असत्या?

खरे तर १९२७ पासूनच बाबासाहेबांनी त्यांच्या धर्मविचारांच्या आणि धर्मसंकल्पनेच्या आधारावर हिंदूधर्मीय समाजाची पुनर्रचना ही एकवर्ण व समता या पायावर करण्याची जाहीररीत्या जबाबदारी स्वीकारली होती. त्या दृष्टीने सर्व हिंदूधर्मीय लोक हे एकवर्णीय समजण्यात यावेत. हिंदू या संज्ञेने हा वर्ग ओळखण्यात व संबोधण्यात यावा. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र वगैरे वर्णविषयक संज्ञांनी अगर महार, मांग वगैरे जातीविषयक संज्ञांनी स्वतःला अगर दुसऱ्याला संबोधण्याची कायदेशीर मनाई करण्यात यावी, असे या परिषदेचे मत आहे, असा ठराव करून समाजाचे स्वरूप त्यात दर्शविण्यात आल्याचे ‘विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत भारतीय समाज पुनर्रचना’ या ‘Dr. Babasaheb Ambedkar : The Architect of Modern India’ या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्रकाशित शताब्दी ग्रंथातील, एन.जी. कांबळे यांच्या लेखात म्हटलेले आहे.

याचा अर्थ डॉ. आंबेडकर यांचा धर्मविचार हा आधुनिक भारतीय समाजाचे नीलचित्र तयार करण्यासाठी, मोठ्या संख्येच्या असलेल्या हिंदू धर्मातच अंतर्बाह्य बदल घडवण्यासाठी जन्माला आलेला विचार होता. धर्म हा वैयक्तिक असून ज्याने त्याने तो स्वतःपुरताच मर्यादित ठेवावा. सार्वजनिक जीवनात त्याला स्थान नाही, असे बाबासाहेब सांगतात.

**धर्म हे अन्याय करणाऱ्या व्यवस्थेचे नाव**

प्रत्येक धर्म नीती शिकवतो. पण नीती हे धर्माचे मूळ नाही, ती धम्मात आहे. कारण तो सार्वजनिक आहे. धम्माचे बाबासाहेबांनी जीवनशुचिता, पूर्णता साधणे, निब्बाण, तृष्णात्याग, सर्व संस्कारित गोष्टींची अनित्यता आणि कर्म हे नैतिक व्यवस्थेचा आधार असे सहा भाग केले आहेत. तर दैवी चमत्कृतीवर विश्वास, ईश्वरावर विश्वास, ब्रह्मसायुज्य, धर्मग्रंथांचे केवळ पठण, धर्म पुस्तके प्रमादित मानणे याला त्यांनी त्यांच्या धर्मविचारात अधम्म ठरवले आहे.

या उलट मनाची मलिनता दूर करणे, जग हे धम्मराज्य बनवणे, सर्वांना ज्ञानाचा मार्ग खुला असणे, प्रज्ञेला उत्तेजन, सोबतच शील, मैत्री, करूणा यांचे महत्त्व जपणे याला ते सद्धम्म म्हणतात. त्यांच्या धर्मविचारांचे उद्दिष्ट हे अखिल मानवजातीला सामाजिक विषमतेकडून सामाजिक समतेकडे नेण्याचे आहे. त्यांच्या मते, जोपर्यंत समाजव्यवस्थेकडे धर्म म्हणून बघण्यात येते तोवर त्यात परिवर्तन शक्य नसते. कायद्यात मात्र बदल करता येतात. जो धर्म दोन अनुयायांमध्ये भेदभाव करतो आणि कोट्यवधींना यातनाच देतो तो ते मुळात धर्मच मानत नाहीत. धर्म हे अन्याय करणाऱ्या व्यवस्थेचे नाव नव्हे, असे ते सांगतात.

**डॉ. आंबेडकरांचा धर्मविचार**

**माणसाच्या ऐक्याची मांडणी करणारा**

बाबासाहेबांच्या मते, धर्म हा सामाजिक नितीमत्तेवर आधारलेला असायला हवा, तसेच तो सामाजिक निकषांवरच तपासायला हवा. धर्माची नाळ ते लोककल्याणाशी जोडतात. धर्म, सामाजिक दर्जा आणि संपत्ती ही सत्ता, वर्चस्व आणि अधिकार यांचे स्त्रोत राहिली असल्याचे ते सांगतात. त्यांची धर्मसंकल्पना ही वैश्विक धर्माचीच आहे. विवेकानंदांनीदेखील ‘वैश्विक धर्म’ हीच संकल्पना मांडली आहे. हिंदू धर्माचे पारंपारिक स्वरूप मांडतांना डॉ. आंबेडकरांनी त्याचे स्वरूप हे नियम, कायद्याचे असून ती कायदेशीर वर्ग-नैतिकता असल्याचे म्हटले आहे. डॉ. आंबेडकरांचा धर्मविचार हा सामाजिक आणि माणसाच्या ऐक्याची मांडणी करणारा भौतिक, इहवादी धर्माचा आहे, आधिभौतिक नव्हे. धर्मात नैतिकता असणे, तीच समाज चालवण्याचे नियंत्रक तत्त्व असणे, धर्म तर्काधिष्ठित असणे, धर्माच्या नैतिक संहितेने स्वातंत्र्य, समता, बंधुता मान्य करणे हे बाबासाहेबांच्या मते आवश्यक आहे. अन्यथा धर्म लयाला जाईल, असे त्यांचा धर्मविचार सांगतो.

त्यांच्या मते, धर्म हा आत्म्याच्या व्यक्तिगत मुक्तीच्या अवस्थेतून नंतरच्या नैतिक आचरणासाठी बंधुभाव जोपासनावस्थेत, त्यानंतर जीवनगरजांची पूर्तता केलेल्यांचे पूजन अशा अवस्थांमधून गेलेला आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, असे मत डॉ. आंबेडकरांचा चिकित्सक अभ्यास करणाऱ्या वामन नारायण कुबेर यांनी नोंदवले आहे. डॉ. आंबेडकरांचा धर्मविचार हा धर्माचे आधिभौतिक स्वरूप नाकारणारा विचार आहे. बुद्धानेही धर्माचे आधिभौतिक स्वरूप आणि कर्मविपाक सिद्धांत नाकारलेलाच होता.

**अस्पृशांच्या मुक्तीसाठी राजकीय आधारांचीच गरज**

अस्पृश्यांची मुक्ती ही तीर्थयात्रा आणि उपासतापास करून होणार नाही, तर त्यासाठी राजकीय अधिकारांचीच गरज आहे. ईश्वरोपासनेपेक्षा रोजची भाकरी महत्त्वाची असल्याचे बिंबवण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मोठे यश लाभले होते. लोकशाहीत राज्यसंस्था ही धर्म नियंत्रित करणार नाही, तर धर्मावरही राज्यसंस्थेचे नियंत्रण असेल, अशी जी तरतूद भारतीय राज्यघटनेत केली गेली, तिचा आधारच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मसंकल्पना हा होता. हीच धारणा घटना समितीत त्यांचे सहकारी असणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख यांचीही होती. दोघेही विवेकानंदांप्रमाणे खऱ्या धर्माचे स्वरूप विशद करणारी धर्मचिकित्सा करीत होते. खऱ्या धर्माला कर्मकांडाधारित पुरोहित धर्माचे रूप हे नंतर प्राप्त झाले. त्यामुळे खरा व मूळ धर्म हा पुरोहित धर्म नसल्याचेच विवेचन ते करत होते. त्यायोगे कोणत्याही अज्ञात, अदृश्य शक्ती आणि असहाय्य माणूस यांच्यात निर्माण झालेली व त्यावर उपजीविका करणारी मध्यस्थ यंत्रणा ही खऱ्या धर्मापासून त्यांनी वेगळी केली.

**एकट्या माणसाला धम्माची गरज नसून ती सामाजिक गरज**

जातिविहीन समाजरचना आणि समता मान्य करणारा हिंदू धर्म त्यांना स्वराज्यासाठी हवा होता, त्याशिवाय जातिव्यवस्थेची गुलामगिरी संपणार नव्हती. डॉ. बाबासाहेब यांची धर्मसंकल्पना ही व्यक्तीच्या उन्नतीबरोबरच तर्क आणि नैतिकता यावर आधारलेली

व इहलोकनिष्ठ अशी आहे. ती पूर्णपणे इहवादी धर्मसंकल्पना आहे. ती धर्मालाच सेक्युलर स्वरूप देणारी आहे. सेक्युलर शब्दाचा अर्थ ऐहिक असाच आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेत ऐहिकता हाच मानवाच्या सामाजिक कल्याणाचा आधार आहे. बाबासाहेब धर्म आणि धम्म यात भेद करतात. धर्म हा व्यक्तिगत तर धम्म हा सामाजिक, सार्वजनिक असल्याचे ते स्पष्ट करतात. त्यांच्या धम्मामध्ये प्रार्थना, तीर्थयात्रा, कर्मकांड, बळी अशा बाबींना स्थान नाही. त्याचे स्वरूप माणसामाणसातल्या योग्य नैतिकतेचे आहे. एकट्या माणसाला धम्माची गरज नसून ती सामाजिक गरज आहे, असे त्यांचे मत आहे. त्यांचा धम्मविचार हा ईश्वरश्रद्धा, आत्म्याचे अस्तित्व, पूजा, आत्म्याची शुद्धी या सर्व बाबी नाकारणारा, त्या धर्मबाह्य ठरवणारा विचार आहे.

कुबेरांनी त्यांच्या प्रबंध ग्रंथात म्हटल्याप्रमाणे, नव्वद टक्के ख्रिश्चन धर्म हा बौद्ध धर्मापासून घेतलेला आहे, असे बाबासाहेब म्हणत. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे श्रीकृष्ण, बुद्ध, ख्रिस्त आणि मोहम्मद पैगंबर बाबासाहेबांना यासाठी आवडत, की त्यांनी त्यांच्या आज्ञा नव्हे, तर माणसाने त्याच्या विवेकाच्या आज्ञा पाळाव्यात असे ते सांगतात, असे बाबासाहेब म्हणतात. बौद्ध धर्मात ईश्वराची जागा नैतिकतेला देण्यात आली आहे. बाबासाहेबांना म्हणूनच बौद्धविचार अधिकच प्रिय वाटला. लोकशाहीत पुरोहित धर्माचा पुरस्कार करणारी दैवते उपयोगाची नाहीत. ईश्वराची जागा नैतिकतेला देणारा धर्मविचार हा लोकशाहीला सुसंगत त्यांना वाटत होता. चातुर्वर्ण्य घालवायला बुद्धाशिवाय दुसरा मार्ग नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मचिकित्सा ही समाजशास्त्रीय पद्धतीची होती. विठ्ठल रामजी शिंदे, भांडारकर, राजारामशास्त्री भागवत, न्या. रानडे, डॉ. भाऊजी दप्तरी, डॉ. पंजाबराव देशमुख हे सारेच समाजशास्त्रीय अंगानेच धर्मचिकित्सा करीत होते. गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तिघेही राजकारणाच्या शुद्धीकरणासाठी खऱ्या धर्माचा आधार उभा करत होते. मात्र बाबासाहेबांना त्यासाठी सर्वाधिक उपयोगी धर्मविचार हा बुद्धाचाच दिसत होता.

### बाबासाहेबांचा धर्मविचार हा कायदा आणि धर्माची मूलतत्त्वे यांच्यात सुसंवादित्व स्थापणारा

संसदेत हिंदू कोड बिलावर बोलतांना त्यांनी धर्मनिरपेक्ष वा इहवादी राज्याचा अर्थ लोकांच्या धर्मभावनांचा राज्य आदर करणार नाही वा ती विचारातच घेणार नाही, असा नसून त्याचा अर्थ संसद कोणताही विशिष्टच धर्म लोकांवर लादू शकणार नाही, असा सांगितला आहे.त्यांच्या मते, धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे लोकांचे आपापले धर्म गुंडाळून ठेवणारे राज्य नव्हे. बाबासाहेबांचा धर्मविचार हा देशाचा कायदा आणि धर्माची मूलतत्त्वे यांच्यात सुसंवादित्व स्थापणारा धर्मविचार आहे. धर्म आणि कायदा यात तो विसंगती निर्माण करीत नाही. ईश्वराचे अस्तित्व, ईश्वराचे कल्याणकारी वैश्विक शासन आणि ईश्वराचे नैतिक शासन यापैकी धर्माचा अर्थ हा अशी आदर्श व्यवस्था, जिथे लोक नैतिक आचरणाच्या व्यवस्थेत असतील, तीच त्यांची धर्मसंकल्पना आहे.

### विषमता हा हिंदू धर्माचा आत्मा

मनू आणि नित्शे यांची तुलना करताना बाबासाहेबांनी मनू हा विशिष्ट वर्गाचे विशेषाधिकार सुरक्षित राखतो, तर नित्शे हा विद्यमान मानववंशापेक्षा अधिक उन्नत अशा श्रेष्ठ मानवाचा वंश निर्माण करू इच्छितो, जो तर्काधिष्ठित असेल. मनूचा सुपरमॅन हा जन्मजात जातिश्रेष्ठत्वाने ठरतो, असा भेद बाबासाहेबांनी दाखवून दिला आहे. कर्तृत्वाने नव्हे, तर जन्माने माणसाचे श्रेष्ठत्व ठरवणाऱ्या धर्माला डॉ. आंबेडकरांचा धर्मविचार हा मानवताधर्म मानत नाही. हिंदू धर्माविषयी त्यांची टीका यामुळेच असून त्याला ते मानवतावादी धर्म मानत नाहीत. विषमता हा त्यामुळे हिंदू धर्माचा आत्मा असल्याचे ते सांगतात. वर्गविशिष्टांची नैतिकता सामान्य माणसांच्या कामाची नाही. हिंदुत्वाला ते त्यामुळे Superman's heaven and the common man's damnation, श्रेष्ठांचा स्वर्ग तर सामान्यांचा शाप मानतात.

विनायक दामोदर सावरकरांनी बुद्ध धर्मातील अहिंसेवर चढवलेल्या हल्ल्यांबाबत उत्तरे देताना बाबासाहेबांनी हिंदू धर्मात ईश्वर आहे, बुद्ध धर्मात तो नाही. हिंदू धर्मात आत्मा आहे, बौद्ध धर्मात त्याला स्थान नाही. हिंदू धर्मात चातुर्वर्ण्य आणि जातिव्यवस्थेला महत्त्व आहे, बौद्ध धर्मात ते नाही, हे स्पष्ट केले होते. बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे धर्मांतर करताना या देशाचा इतिहास आणि सांस्कृतिक परंपरा यांना हानी पोहोचणार नाही, याची काळजी घेतली गेल्याचेही ते सांगतात. हिंदू धर्मासह कोणत्याही धर्माचे ते विरोधक नव्हते, तर ज्या धर्मात जन्माला आले त्यातला धर्मविचार शास्त्रीय, तार्किक, मानवीय पातळीवर आधुनिक करण्याच्या दृष्टीने त्याची परखड चिकित्सा ते आयुष्यभर करत राहिले. त्यांच्या धर्मविचारात धर्माचा महत्त्वाचा निकष हा धर्माची व्यक्तिगत उपयुक्तता नसून मानवाची प्रतिष्ठा व मानव अधिकार जपणारी त्याची सामाजिक उपयुक्तता असणे, हा आहे. हा धर्मविचार मांडण्यासाठी त्यांनी सर्व प्रमुख धर्मांचा तौलनिक अभ्यासही केला होता. त्यांच्या धर्मसंकल्पनेत कोणत्याही धर्मात तो नाकारण्याचे वा कोणताही स्वीकारण्याचे स्वातंत्र्य असणे महत्त्वाचे आहे. व्यक्तीची सर्व बंधनातून मुक्तता, धर्माची सामाजिक उपयुक्तता आणि वैयक्तिक नीतिमत्ता हे त्यांचे धर्मासाठीचे निकष होते.

### धर्म ही तत्त्व आहेत, नियम नव्हे

बौद्ध धर्मदेखील पारंपरिक, जसाच्या तसा त्यांनी स्वीकारलेला नाही, तर त्याचीही चिकित्सा करून, परिष्कृत करूनच तो आधुनिक जीवनार्थाच्या संदर्भात त्यांनी त्यांच्या Buddha and his Dhamma या ग्रंथात मांडलेला आहे. धर्मविचारामागील त्यांची मूळ प्रेरणा मुळात तळागाळातील प्रचंड मोठ्या लोकसंख्येला धर्मातील विषमतेमुळे लाभलेले गौणत्व आणि मानवाधिकाराच्या, मानवी प्रतिष्ठेच्या संदर्भात कुठे स्थानच नसल्याने त्यांना समानत्वच धर्मात लाभत नव्हते, अशा धर्माचे स्वरूप बदलण्याची होती. त्यांचा धर्मविचार हा बुद्धीनिष्ठ, शास्त्रीय आणि सामाजिक उपयुक्ततेचा असून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यत्रयींवर आधारलेला विचार आहे. धार्मिक कलहाला मूर्खपणा मानणारा हा विचार आहे. विवेक, तर्क आणि स्वतंत्र बुद्धीने विचार यांचा विकास धर्माने अवरूद्ध करायला नको, अशी त्यांची धारणा आहे. त्यांच्या मते धर्म ही तत्त्व आहेत, नियम नव्हे.

डॉ. आंबेडकरांचा धर्मविचार हा मुळातच एकूण धर्म या संकल्पनेचाच पुनर्विचार असून तो धर्माला अधिक न्याय्य आणि सुयोग्य पायावर उभा करणारा धर्मविचार ठरलेला आहे.सामजिक परिवर्तनाला बांधलेला तो विचार आहे. ●●●

**(लेखक अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष आहेत.)**

# !! नाते भीमरायाशी,
# जयभीम हाच श्वास नि ध्यास !!



सतीश कुलकर्णी

**बाबासाहेबांच्या विचारस्पर्शामुळे जीवनाला प्रेरणा मिळाली, मरगळ दूर गेली. विचार कसा करावा याचे मार्गदर्शन घडले. नवे जग मिळाले. बाबासाहेब अभ्यासल्यामुळे ज्ञानकक्षा रुंदावल्या. अहंकाराची पिसे गळून पडली. चारित्र्य नि निर्व्यसनीपणा यांचा संस्कार घडला. अलीकडे तर पत्नी सांगते, ‘‘कोणाचे ऐकून वा पाहून किंवा थोडा बदल म्हणून दुसऱ्या कोणालाही डोक्यात घेऊ नका. त्याची गरज नाही. आपले डोके बाबासाहेबांसाठीच, डोळे बाबासाहेब वाचण्यासाठी आहेत, याचे भान ठेवा व त्या अनुषंगाने उचित वागा.’’ असा उपदेश मिळणेही भाग्याचेच.**




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणींशिवाय आपण जगू शकत नाही, याची जाणीव मला फार लहानपणीच झाली होती. एकदा आई म्हणाली, ‘‘हे बघ. तुझा जन्म बुद्धिमान माणसांच्या घराण्यात झाला आहे. घराण्याला विद्वतेची परंपरा आहे. या सर्वांत तुला टिकायचे असेल, वेगळेपण जपायचे असेल, उठावदार व्हायचे असेल, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उपासक हो. बुद्धीच्या जोरावर कोणापुढे न वाकता, भल्याभल्यांना त्यांनी आव्हान दिले आहे. असे तेज हवे, तरच ध्रुवासारखे अढळस्थान मिळेल...’’ स्वयंपाकघरात मातीच्या चुलीपुढे फुंकणी फुंकत फुंकत स्वयंपाक करताना ती अधूनमधून असेच काहीतरी सांगे. बाबासाहेब आंबेडकर बेडकीहाळ-निपाणीला येणार आहेत, असे ‘पेशंट’ लोक ‘ह्यांना’ सांगत होते, असे म्हणे. बेडकीहाळला त्या भागात बाबासाहेब आल्यावर त्यांच्या पायावर घालण्याचे तिचे स्वप्न होते. ते तिने जिद्दीने पूर्ण केले. रत्नाप्पा सूर्यवंशी हे दलित समाजातले. बाबासाहेबांचे ते निष्ठावंत अनुयायी, कार्यकर्ते होते. आमच्या परिवाराशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. आज बेळगावला स्थायिक झालेल्या त्यांच्या घराण्यातील मंडळीही या आठवणींना उजाळा देतात. फोनवर बोलतानाही सद्गदित होतात. बेडकीहाळ, ता. चिकोडी, जि. बेळगाव येथील बहुजन समाजाच्या मराठी शाळा क्रमांक चार या प्राथमिक शाळेत माझे सातवीपर्यंत शिक्षण झाले. आईने जाणिवपूर्वक याच शाळेत मला घातले. सर्व समाजातील मुलांशी संबंध यावा, हा तिचा हेतू होता.

**माझे दैवत माझ्याशी**

प्राथमिक शाळेत असतानाच एक दिवस अचानक बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाची दुःखद वार्ता येऊन धडकली. त्यावेळी दलित समाजाने केलेला आक्रोश आजही आठवतो. सारा दलित समाज धाय मोकलून रडत होता. बाबा, आता आम्ही कोठे जायचे, आमच्याकडे कोण बघणार, असे मराठी नि कन्नडमध्ये बोलून टाहो फोडत होता. माझा चेहरा रडवेला झाला. त्या दुःखी समुदायाबरोबर वाट फुटेल तिकडे सैरभैर होऊन मी जात होतो.

दुसऱ्या दिवशी आलेल्या सर्व वृत्तपत्रांचे पहिले पान बाबासाहेबांच्या छायाचित्राने पूर्ण भरलेले होते. त्याच क्षणी मी बाबासाहेबांकडे अधिक वळलो, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्याच्या आधी दीड महिन्यांपूर्वी बाबासाहेबांचा नागपूर येथे धम्मदीक्षेचा सोहळा पार पडला होता. बाबासाहेब व माईसाहेब धम्मदीक्षा घेत आहेत, हा वृत्तपत्रातील संपूर्ण पानभरचा फोटो आजही माझ्या डोळ्यासमोर आहे. त्या फोटोचाही माझ्या जीवनाला कलाटणी देण्यात मोठा वाटा आहे. प्राथमिक शाळेत शिकत असतानाच मी माझ्या अभ्यासाच्या स्वतंत्र खोलीत बाबासाहेबांचे एका वृत्तपत्राच्या अंकातील चित्र कापून पुस्तकाच्या लाकडी कपाटावर चिकटविले होते. माझे दैवत माझ्याशी. बाकीच्यांचा विचार करण्याचे कारण काय, ही त्यामागील भूमिका. माझे वडील बेडकीहाळमधील नामांकित डॉक्टर होते. दलित समाजाची त्यांच्यावर अपार श्रद्धा. दलित वस्तीतूनच आमच्या मळ्याची वाट जाते. त्यामुळे रोज त्यांच्याशी येता-जाता बोलणे असे. दलित समाजातील पेशंट आले, की वडील त्यांना अभिमानाने सांगायचे, ‘‘बघा रे. सतीशने त्याच्या खोलीत कोणाचा फोटो लावला आहे ते.’’ पेशंट माझ्या खोलीत डोकावत व अत्यंत भक्तिभावाने, दोन्ही हात जोडून बाबासाहेबांना वंदन करून मूकपणाने निघून जात. हे प्रसंग मी पाहिले आहेत. माझ्या श्रद्धास्थानाला काही तोड नाही. मी करतोय ते बरोबर आहे, अशा प्रकारच्या भावनेने मी आनंदून जाई.

**हत्तीवर बसण्याचे भाग्य हा केवळ बाबासाहेबांचा प्रसाद**

चिकोडी राखीव मतदारसंघ (लोकसभा) हा आमचा मतदारसंघ. त्याचाही माझ्या मनोभूमिकेला आधार मिळाला. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे उमेदवार ॲड. दत्ताआप्पा कट्टी हे लोकसभेचे उमेदवार म्हणून उभे होते (१९५७). बाबासाहेबांचे ते कर्नाटकातील निष्ठावंत सहकारी होते. त्यांची खूण होती हत्ती. शालेय वयात त्यांच्या प्रचारसभेतही अगदी उन्हातान्हात घोषणा देत मी हिरीरिने भाग घेतला होता. जवळजवळ महिनाभर प्रचार केला. माझे कौतुक वाटून एका कार्यकर्त्याने मला एके दिवशी हत्तीवर बसविले होते. हत्तीवर बसण्याचे भाग्य हा केवळ बाबासाहेबांचा प्रसाद. दत्ता कट्टी प्रचंड मतांनी निवडून आले. त्या सुमारास त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांसाठी काय केले' हे पुस्तक प्रसिद्ध केले. वडिलांमार्फत ते माझ्यापर्यंत आले. मला मिळालेले हे पहिले भेटपुस्तक. त्यामुळे त्याला माझ्या जीवनात फार महत्त्व आहे. ते आजही माझ्या संग्रही आहे.

दत्ता कट्टी यांनी बाबासाहेबांचे पहिल्या पानावर केलेले वर्णन, बाबासाहेबांना दिलेल्या उपमा मुखोद्गत कराव्यात अशा आहेत. बाबासाहेबांवर त्यावेळी फार साहित्य उपलब्ध होत नव्हते. मिळेल तिथून मी मिळवी. प्रसंगी रस्त्यात उभे राहूनही मिळालेला मजकूर लिहून काढून ज्याचा त्याला अंक परत करी. ग्रामपंचायतीच्या लायब्ररीत जाई. तेथील सेवकाला पुस्तकाची यादी रजिस्टरवर लिहिण्यास, शिक्के मारण्यास मदत करी. त्याला मराठीचा सराव नव्हता. डॉक्टरांचा मुलगा मदत करतोय याचे त्याला अप्रूप वाटे. पण माझा अंतस्थ हेतू वेगळा असे. मला पाहिजे ते पुस्तक तो देई व पाहिजे ते पुस्तक खरेदी करी. बेडकीहाळच्या ग्रामपंचायतीत बाबासाहेबांचा फार सुरेख फोटो ठेवलेला होता.

**'जागृतीचा विस्तव विझू देऊ नका...'**

बेडकीहाळचे आमदार एस.एस. (शिंदगोंडा) पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आमच्या मळ्याकडे जाणाऱ्या दलित वस्तीत डॉ. आंबेडकर जयंती साजरी होणार आहे, याची मला काणकूण लागली. प्रमुख वक्ते होते कोडणीचे बॅरिस्टर एस.एन. माने आणि कोल्हापूरचे सत्यशोधक विचारवंत डी.एस. नार्वेकर. माझा घसा बसला आहे, त्यामुळे मी फार बोलणार नाही असे बॅरिस्टर माने चहापानाच्या वेळी म्हणाले. त्यावेळी कार्यकर्त्यांनी मला भाषण करायला सांगितले. मी उत्स्फूर्तपणे बोललो. रात्रीचे साडेबारा-एक वाजले होते. घरातील सगळे उन्हामुळे अंगणात झोपले होते. मी कोणालाही न सांगता गेलो होतो. थोरला भाऊ जागा होता. त्याने विचारले, 'कोठे गेला होतास रे?' मी म्हणालो, 'तू झोप. सकाळी सांगतो.' मी त्यावेळी बेडकीहाळच्या बी.एस. हायस्कूलमध्ये शिकत होतो. दुसऱ्या दिवशी आमदारांनी माझ्या वडिलांना सभेचा सगळा वृत्तांत सांगितला. आज बेडकीहाळला बाबासाहेबांचा भव्यदिव्य पुतळा उभारण्यात आला आहे. मोठे उद्यान आहे. 'जागृतीचा विस्तव विझू देऊ नका. जागृतीची लाट निर्माण करा' असे बाबासाहेब सांगून गेले. निष्ठावंत बाबासाहेबांची अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

पुढील शिक्षणासाठी अर्जुननगरच्या (निपाणी) देवचंद कॉलेजला गेलो. वसतिगृहात राहिलो. वसतिगृहात विविध भागांतील दलित विद्यार्थ्यांचा सहवास लाभला. मला घडविण्यात त्यांचा वाटा आहे. माझ्या रुमवर रात्री ते चर्चेसाठी जमत. फार छान वातावरण होते. अनुभवसमृद्ध झालो. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान' या विषयावरील निबंध स्पर्धेत, वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिके मिळाली. पद्मभूषण श्रीमान देवचंदजी शाह यांचे अपार प्रेम मिळाले. प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी मित्र यांनी अलोट माया केली. कॉलेज निवडणुकीत निवडून आलो. त्या काळात बाबासाहेबांवर वृत्तपत्रांत लेख लिहिण्यात मी आघाडीवर होतो.

**रोज नवे बाबासाहेब समजत आहेत**

बाबासाहेबांच्या विचारस्पर्शामुळे जीवनाला प्रेरणा मिळाली, मरगळ दूर गेली. विचार कसा करावा याचे मार्गदर्शन घडले. नवे जग मिळाले. बाबासाहेब अभ्यासल्यामुळे ज्ञानकक्षा रुंदावल्या. अहंकाराची पिसे गळून पडली. चारित्र्य नि निर्व्यसनीपणा यांचा संस्कार घडला. अलीकडे तर पत्नी सांगते, "कोणाचे ऐकून वा पाहून किंवा थोडा बदल म्हणून दुसऱ्या कोणालाही डोक्यात घेऊ नका. त्याची गरज नाही. आपले डोके बाबासाहेबांसाठीच, डोळे बाबासाहेब वाचण्यासाठी आहेत, याचे भान ठेवा व त्या अनुषंगाने उचित वागा." असा उपदेश मिळणेही भाग्याचेच. वाईत स्वतःचा बंगला झाला. बंगल्याला 'शिल्पकार' हे नाव तिनेच सुचविले. २६ जानेवारी (१९८७)ला राहायला आलो. बाबासाहेबांचा मोठा फोटो तिनेच आपल्या पगारातून आणला. बंगल्याचा वरचा संपूर्ण मजला भीममय आहे. बाबासाहेबांचे फोटो, पुतळे, मला मिळालेले पुरस्कार यांनी तो संपन्न आहे. बाबासाहेबांनी लिहिलेले संपूर्ण वाङ्मय, बाबासाहेबांवर इतरांनी लिहिलेले साहित्य, स्मृतिग्रंथ, गौरव अंक, स्मरणिका, वृत्तपत्रांचे अंक, हजारो कात्रणे आदी प्रचंड साहित्यसंसार मला जगण्याची ताकद देतो. कशासाठी जगायचे नि कोणासाठी जगायचे, हे सांगतो. अजूनही संपूर्ण बाबासाहेब वाचून झालेले नाहीत. ते एका जन्मात शक्यही नाही. ते अथांग आहेत, ते विस्तृत आहेत. रोज नवे बाबासाहेब समजत आहेत. ते समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. जिथे तिथे बाबासाहेब दिसतील ते ते टिपण्याचा सराव कायम ठेवला आहे. वयाच्या ७४ व्या वर्षीही तो उत्साह अजून टिकून आहे. अशा टिपणांनीच ५० ते ६० वह्या भरगच्च भरल्या आहेत. सकाळी ६ वाजल्यापासून वाचतच असतो. वाचन थांबविले, की अंग दुखायला लागते हा अलीकडचा अनुभव. 'चष्म्याचा नंबर वाढला तरी चालेल; पण बाबासाहेब वाचण्याचे सोडू नका' हा डॉ. गंगाधर पानतावणे यांनी मला दिलेला आदेश मी शिरोधार्ह मानला आहे.

**'प्रिय बाबा. प्रेमाची भेट'**

संग्रहात बाबासाहेबांवरील दुर्मीळ चांगली किमती पुस्तके पाहून अभ्यासक विचारतात, 'ही पुस्तके तुम्हाला कोठे मिळाली?' मी म्हणतो, पुस्तकाचे पहिले पान वाचा. त्यावर लिहिलेले असते, 'प्रिय बाबा. प्रेमाची भेट' कन्या व चिरंजीव अशी पुस्तके मला आवर्जून पाठवितात. आई, वडील, काका, बहीण, भाऊ, वहिनी, पत्नी, मुलगा, कन्या, सून, जावई या घटकांनी सहकार्य केले. एकदा तर रस्त्यात फिरताना बाबासाहेबांवरील दुर्मीळ पुस्तके दृष्टीस पडली. खिशात पैसे नव्हते. जीव कळवळला. तेव्हा थोरल्या वहिनींनी आपली पर्स उघडली व पैसे दिले. पुण्यातील एका मावस बहिणीने

फूटपाथवर मला न मिळालेले पुस्तक शोधून काढून, जपून ठेऊन मला दिले. ज्यांना माझे पसंत नव्हते त्यांनी उघड विरोध केला नाही; वा तिरस्कारही केला नाही. अपरोक्ष काय म्हणतात, याची कधी पर्वा केली नाही. बाबासाहेब मोठे आहेत हे त्यांना आतून तरी कबूल आहे, याचे मला समाधान असे.

माझे थोरले चुलते (काका) ॲड. व्ही.एन. कुलकर्णी, बेडकीहाळकर वकील (चिकोडी) हे बाबासाहेबांचे समकालीन. बाबासाहेब कोर्टकामासाठी चिकोडीच्या कोर्टात आले होते, असे त्यांनी आपल्या एका लेखात नमूद केले आहे.

धाकटे चुलते प्रा. पां.ना. कुलकर्णी (कोल्हापूर) हे राजाराम कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक होते. बाबासाहेब राजाराम कॉलेजच्या स्नेहसंमेलनाला आले होते (१९५२). काकांच्या खांद्यावर हात टाकून त्या आधारे बाबासाहेब त्या वेळच्या राजाराम कॉलेजचा गोल जिना उतरत होते, अशी आठवण काकांनी सांगितली आहे.

**त्यामुळे माझे नाव महाराष्ट्र पातळीवर गेले**

नोकरीच्या निमित्ताने १९६८ साली वाई (जि. सातारा) येथे आलो. जयंतीच्या निमंत्रणाची वाट पाहत होतो. विचार कधी सांगणार? तशी संधी आली. आचार्य अत्रे यांच्या कन्या व माझ्या सदैव हितचिंतक दैनिक 'मराठा'च्या संपादिका शिरीष पै यांनी 'मराठा'च्या रविवार पुरवणीत पहिल्या पानावर बाबासाहेबांचा सुरेख फोटो देऊन माझा मोठा लेख छापला (७ डिसेंबर १९६९). बाबासाहेबांवर, दलित चळवळीवर अनेक लेख लिहिण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे माझे नाव महाराष्ट्र पातळीवर गेले. व्याख्यानांची निमंत्रणे येऊ लागली. सातारा जिल्ह्यात, वाई तालुक्यात असंख्य ठिकाणी गेलो. मिळेल त्या वाहनाने गेलो. कधी ट्रक, रिक्षा, टॅक्सी, सायकल वा बैलगाडी. मोठेपणाची, मानपानाची हाव ठेवली नाही. आपण कोणासाठी जातो याचे भान ठेवले.

**दादासाहेब रुपवतेंच्या संदेशाने मन भारावून गेले...**

समाजकल्याण मंत्री असताना दादासाहेब रुपवते यांनी ''गावात राहणारे; पण ज्यांचे मन सतत गावकुसाबाहेर असते अशा सतीश कुलकर्णी यांना जपा. आपल्या कार्यक्रमांना त्यांना हक्काने बोलवा,'' असा दलितांना संदेश दिला होता. मन भारावून गेले. गेल्या पन्नास वर्षांत बहुतेक सर्व आंबेडकरवादी नेते, लेखक, विचारवंत, संपादक, अभ्यासक यांच्याशी संपर्क आला. संवाद झाले. 'शिल्पकार'ला त्यांनी भेट दिली. भावनिक नाते निर्माण झाले. हे सर्व घडले ते केवळ बाबासाहेबांमुळे. मुखात बाबासाहेबांचे नाव असले, की कोणाला भेटायची अडचण येत नाही. लोकांना आपण कोण आहोत, कोण नाही हे चांगले कळते.

**भय्यासाहेब आंबेडकरांचे निर्व्याज प्रेम मिळाले**

आमदार शांताबाई दाणी आजारी असतानाही त्यांनी आम्हा उभयतांचे स्वागत केले. दोन पुस्तके भेट दिली, सत्कार केला, मनसोक्त बोलल्या, खाऊ घातले. वामनराव कर्डकांनी तर खर्डा-भाकरी खाण्याचा आग्रह केला. चांगदेव भवानराव खैरमोडे यांनी भोजनासाठी थांबवून धरले. दया पवार यांनी महाडमध्ये पाठीवरून हात फिरवून काळजी घेतली. डॉ. रावसाहेब कसबे यांनी बऱ्याच दिवसांनी भेट झाल्यावर 'बार्टी'मध्ये कडकडून मिठी मारली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. श्रावणकुमार बनसोडे तर व्यासपीठावरच मला तपासत, काळजी घेत. बेळगावला तर बी. शंकरानंद यांनी ते स्नान करीत असताना आपल्या स्नानगृहातूनच 'मी आलोच, थांबा.' असा निरोप दिला. भय्यासाहेब आंबेडकर यांचे निर्व्याज प्रेम मिळाले. आर.आर. पाटील (क्रांतिपर्व), डॉ. यशवंत मनोहर, प्रा. अरूण कांबळे, डॉ. ज्योती लांजेवार, विलास वाघ, उत्तम कांबळे, लक्ष्मण माने, डॉ. विनायकराव मोरे, राजा ढाले, दिनकर झिंब्रे, डॉ. संभाजीराव बिरांजे, लक्ष्मणराव ढोबले, रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, शंकरराव खरात, वामन होवाळ, भास्करराव भोसले, प्रा. केशव मेश्राम, नारायण सुर्वे, एन.एम. कांबळे, प्रा. जोगेंद्र कवाडे, पां.ना. राजभोज, शशिकांत दैठणकर, एकनाथराव गायकवाड, ॲड. जी.बी. माने, प्रा. एम.डी. नलावडे, प्रा. रमेश ढावरे, प्रा. रतनलाल सोनाग्रा, डॉ. रोहिदास जाधव, प्रा. मनोहर जाधव, डॉ. डी.टी. माने, सुहास सोनावणे, धनःश्याम (के.बी.) तळवटकर, बाबूराव बागुल, हरिभाऊ पगारे यांच्याशी झालेल्या सुसंवादामुळे, भेटीमुळे बाबासाहेब वाचण्यात मला आनंद घेता आला.

**वराळे घराण्याचा सार्थ अभिमान वाटतो**

आमच्या चिकोडी-निपाणी तालुक्याच्या भाग्याची गोष्ट अशी, की ज्या घराण्याच्या उल्लेखाशिवाय आंबेडकर चरित्र पूर्ण होऊच शकत नाही, ते भाग्यवान घराणे आमच्या भागातील आहे, याचा सार्थ अभिमान वाटतो. ऊर आनंदाने भरून येतो. कर्नाटकसिंह आमदार बळवंतराव हणमंतराव वराळे हे बाबासाहेबांचे अत्यंत निकटचे व विश्वासू सहकारी होते. दलित साहित्य संमेलनाच्या वेळी (१९७२) महाडमध्ये गाडीतून फिरताना त्यांनी मला मोठ्या प्रेमाने आपल्या मांडीवर घेतले होते. राधाताई वराळे यांना तर आम्ही कायम स्मरणात ठेवू. संपूर्ण वराळे घराण्याचा माझ्यावर गेली ५० वर्षे मोठा प्रभाव आहे. त्यांचा आदर्श घ्या, असे मुलांना सांगतो.

**लोकच आपल्याला अभ्यासाला लावतात**

'ज्योत से ज्योत जगाते चलो' या उक्तीनुसार बाबासाहेबांचा प्रभाव एकाकडून दुसऱ्याकडे जातो याचा आमच्या घरातच प्रत्यय आला. बी.एड. करीत असताना सौ. प्रज्ञा यांनी स्वतःच्या निवडीनुसार 'दलित कविता : एक दर्शन' या विषयावर प्रकल्प सादर केला. त्याची खूप प्रशंसा झाली. कन्येने (सौ. प्रतिष्ठा सोनटक्के) एम.जे.सी. ला असताना लघुप्रबंध तयार केला आणि तो मातोश्री सौ. रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृतीस अर्पण केला. एकमेकांत मतभेद असणारे, एकमेकांचे तोंडही न बघणारे दलित नेते व विचारवंत हे निःसंकोच एकत्र येतात, ते 'शिल्पकार' बंगल्यावर. खूप अभ्यासाने, व्यासंगाने विषयात तशी तज्ज्ञता येते. रात्री-अपरात्रीदेखील मग खूप दुरून शंकांचे निरसन करून घेण्यासाठी फोन येतात. त्यासाठी आपण तत्पर असायला हवे. कंटाळून चालत नाही. हक्काने फोन करतात. यातच आपल्या अभ्यासाची सार्थकता मानावी लागते. पुन्हा अभ्यासासाठी बैठक मारावी लागते. आपण अभ्यास करतो म्हणण्यापेक्षा लोकच आपल्याला अभ्यासाला लावतात. त्यामुळे आपण नित्यनूतन राहतो हा फायदा आहे. ते त्यांचे आपल्यावर उपकार आहेत.

**चुका सांगाव्यात तर ते आपलेच लोक असतात**

लेखात, भाषणात कोणी बाबासाहेबांबद्दल चुकीची माहिती

दिली, चुकीचा संदर्भ दिला, की खूप त्रास होतो. चुका सांगाव्यात तर ते आपलेच लोक असतात. त्यांना दुखावल्यासारखे होते. सांगू नयेत, तर आपल्याला हे मान्य आहे असा समज होतो. अशा कात्रीत आपण सापडतो. चुकीचे लिहिण्याचा पायंडा पडू नये, कोण काय करतंय ही बेफिकीर वृत्ती लेखकात, वक्त्यात वाढू नये, अशी आपली तळमळ असते. अशा वेळी मी मार्ग काढतो. लेखक हौशी असेल, उमेदीचा असेल व मुख्य म्हणजे त्याचा हेतू शुद्ध असेल, तर त्याला खाजगीत सांगतो. आडदांड, माझेच खरे असा आविर्भाव असणारा अहंभावी असेल, तर मग त्याला जाहीरपणे उत्तर देतो. तोच तोच मजकूर, तीच तीच माहिती, पण शीर्षक वेगळे, अशा पद्धतीने ज्यावेळी भारंभार साहित्य पुढे आणण्यात येते त्यावेळी फसगत होते. वाचक संभ्रमित होतो. शीर्षकाला लागू पडेल अशी माहिती त्यात असेल याचीही खात्री वाटत नाही. अशा वेळी काय जवळ ठेवावे व काय जवळ ठेवू नये, याचे तारतम्य बाळगावे लागते. बाबासाहेबांना आदर्श मानणाऱ्या आंबेडकरवादी साहित्यिकांनी अचूकच लिहिले पाहिजे, ही आम्ही अपेक्षा ठेवणे चूक होईल का? बाबासाहेबांबद्दल गैरसमज पसरविणाऱ्यांना त्यांच्या समाजातील स्थानाबद्दल आदर बाळगून प्रसंगी मी धाडसाने, पुराव्यानिशी सडेतोड उत्तरे दिली आहेत. हे करावेच लागते. माझ्या निर्हेतूक भूमिकेमुळे त्यांनीही माझा मान राखला. हे कृतज्ञतापूर्वक कबूल करावे लागेल.

**हे घडले ते फक्त बाबासाहेबांमुळे**

जयभीम या शब्दात मोठी ताकद आहे. बाबासाहेबांबद्दलची चर्चा ऐकून एकदा एका रिक्षावाल्याने (औरंगाबाद) मजकडून पैसेच घेतले नाहीत. सातारा ग्रंथमहोत्सवाला जाताना एका रिक्षावाल्याने अर्धेच पैसे घेतले. मुंबईत रेल्वेने प्रवास करताना उभ्याने पुस्तक वाचताना मुखपृष्ठावरील बाबासाहेब पाहून एकाने सरकून आपणहून मला जागा दिली. एकदा पटांगणात बाबासाहेबांवर माझे भाषण चालू असताना एका गरीब, गलितगात्र माणसाने अचानक माझ्या गळ्यात हार घालून पलायन केले. व्यासपीठावर भर्रकन चढून निघून गेला. तो एका खेड्यातील होता. त्याच्या गाडीची वेळ झाली होती. फिरतीवर असताना एक मोठे अधिकारी व्याख्यान ऐकण्यासाठी लांब श्रोत्यात बसले. व्याख्यान संपल्यावर माझी चर्चा ऐकून ते 'शिल्पकार'वर आले. रत्नागिरीचे हापूस आंबे घेऊन भेटायला आले. हे घडले ते फक्त बाबासाहेबांमुळे. एका उपजिल्हाधिकारी साहेबांनी तर आपल्या आईवडिलांच्या स्मृतीदिनाला भाषणासाठी आपल्या गावी बोलाविले. मी सहकुटुंब, सहपरिवार गेलो.

कन्येला पोचवायला एकदा एस.टी. स्टँडवर गेलो. तिला ठाण्याला जायचे होते. स्टँडवर प्रचंड गर्दी. गाडीची वाट पाहत बाकड्यावर बसलो. शेजारी नातू (वय ८) त्याने स्टँडवरच विचारले, 'आबूजी, आज बाबासाहेब आंबेडकर असते, तर तुम्ही काय केले असते?' त्याला चटकन म्हणालो, ''आजा बाबासाहेब असते, तर तुला सोडवायला स्टँडवर कशाला आलो असतो? त्यांच्याबरोबर राहिलो असतो.'' मला वाटते हा संवाद काहींनी ऐकला असावा. गाडी आली त्यावेळी एका प्रवाशाने नातवाला म्हटले, 'गडबड करू नको. मी तुझी जागा धरीन...' असे जिकडे तिकडे बाबासाहेब आपल्या मदतीला धावून येतात, असा साक्षात्कार घडतो.

प्रसिद्ध हिंदी साहित्यिक, विचारवंत कालिचरण स्नेही यांचा एके रात्री १० वाजता अचानक फोन आला. ख्यालीखुशाली विचारली आणि म्हणाले, ''आप जैसे लोगों की लखनौ में बहुत जरूरत है। यहाँ के लोगों को बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर अच्छी तरीकेसे समझना चाहिए।''

**'आपके समाज में आप जैसे लोगों की संख्या क्यों नही बढती?'**

यावर्षी वाढदिवसाला आपण औरंगाबादच्या मिलिंद कॉलेज परिसरात असायला हवे, या तीव्र भावनेने तेथे गेलो. तेथे गेलो, की बाबासाहेबांनी लावलेल्या बोधिवृक्षाचे दर्शन घेतो. सकाळी सकाळी तेथे गेलो. मिलिंदचे विद्यार्थी भेटतात. त्यांच्याबरोबर बोधिवृक्षाला वंदन केले. योगायोगाने चार भिक्खू तेथे होते. त्यांच्याशी संवाद घडला. त्यांनी आशीर्वाद दिले. त्यांनी मला विचारलेला प्रश्न आजही कानात घुमतो, 'आपके समाज में आप जैसे लोगों की संख्या क्यों नही बढती?'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेजला गेलो. झाडाखाली अनेक विद्यार्थिनी बसल्या होत्या. त्यांच्याशी चर्चा केली. त्या म्हणल्या, ''आम्ही लांबून लांबून आलो आहोत. आम्हाला दुसरीकडे कोठेही जायचे नव्हते. बाबासाहेबांच्याच कॉलेजमध्ये शिकायचे, या जिद्दीने येथे आलो.'' त्यांनी बाबासाहेबांबद्दल मला काही प्रश्न विचारले. त्यांचा निरोप घेतना त्या म्हणाल्या, ''बाबासाहेबांबद्दल अनेकजण सांगतात. पण पाच मिनिटात तुम्ही त्यांचे जे मोठेपण सांगितले त्याने डोळे पाणावले. त्याने प्रेरणा मिळाली.'' भेटलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला मी सांगितले, ''खूप मोठे व्हा. कोणामुळे मोठे झालात ते विसरू नका. मोठे झाल्याचे मला कळवा. भेटीचा संदर्भ द्या.''

बाबासाहेबांवर माझे प्रेम आहे. एवढ्या कारणासाठी माझ्यासारख्या सामान्य माणसावर आंबेडकरी समाज जर एवढे प्रेम करीत असेल, तर प्रत्यक्ष बाबासाहेबांसाठी त्याकाळी किती जीव टाकत असेल, याची कल्पना करा. त्यातून बाबासाहेब काय होते याचा अधिक उलगडा होईल, असे मला वाटते.

काही माणसे, अभ्यासक ठराविक काळात काही विचारांनी झपाटलेली असतात. ३०-४० वर्षे झपाटून काम करतात. त्या विचारांचे समर्थन करतात. प्रचार, प्रसार करतात व नंतर तेथून सरकतात, सटकतात. दुसरीकडेच कोठेतरी जातात. असे का होते वा असे का करतात, कळत नाही. पण तसे दृष्टोत्पतीस येते, हे मात्र खरे. पण मी निश्चयाने सांगतो, अखेरच्या क्षणापर्यंत मला बाबासाहेबांचा आणि फक्त बाबासाहेबांचाच लळा असेल. एकवेळ पाण्यावाचून मासा राहू शकेल. पण मी बाबासाहेबांपासून दूर राहू शकणार नाही. हे लादलेले नाते नाही, स्वीकारलेले नाते आहे.

एकदा एका जाहीर व्याख्यानात एका ख्यातनाम व लोकप्रिय दलित विचारवंत, संपादकाने म्हटले, ''यांचे नाव मी अनेक वर्षे ऐकतो आहे. पण आज त्यांना बघतोय. अरे हे तर अगदी आमच्यासारखं दिसतंय. आमच्यासारखं बोलतंय.'' रात्री अंथरूणावर पडल्यावर साऱ्या स्मृती जागृत होतात. किती किती माणसं भेटली. आगदी

(उर्वरित पान ३७ वर...)



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ



प्रा. आनंद मेणसे

**संघटित कामगार वर्ग आपल्या संघटनेतील दलित बांधवांशी चांगले वागत नाही. अस्पृश्य म्हणून त्यांना दूर ठेवतो. त्यांचा पिण्याच्या पाण्याचा माठदेखील वेगळाच असतो. सवर्ण कामगारांना त्यांच्या कामाप्रमाणे बढत्या मिळतात. ते अगदी मुकादम, जॉबर होऊ शकतात. पण दलित कामगारांना मात्र कसलीच बढती मिळत नाही. ते एकदा का एका कनिष्ठ दर्जाच्या खात्यात कामाला लागले, की निवृत्त होईपर्यंत तेच काम करीत राहतात. त्यांच्यावर ते लादले जाते. यामुळे दलित कामगारांचा ना आर्थिक विकास होतो ना सांस्कृतिक. ते कायम कनिष्ठ दर्जाचेच राहतात. त्यांच्या जीवनात बदल घडवून आणायचा असेल तर आपण कामगार चळवळीत लक्ष घातले पाहिजे. तसेच या कामगारांची बाजू सरकार दरबारात मांडण्यासाठी त्यांचा पक्षही असायला पाहिजे, याची जाणीव बाबासाहेबांना झाल्यामुळे त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.**

आ भारतात कामगार वर्ग निर्माण झाला तो ब्रिटिश भारतात आल्यानंतर. कारण त्यांनी औद्योगिकीकरणाला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी संपूर्ण भारताचे सर्वेक्षण केले. कोठे काय पिकते, जमीन कोणकोणत्या प्रकारची आहे, देशात कोणकोणती खनिजे आहेत जेणेकरून ती औद्योगिकीकरणासाठी उपयोगात आणली जाऊ शकतात, पाण्याचे स्त्रोत कोठे आणि कसे आहेत इत्यादी. देशातील जवळजवळ सर्व धबधबे त्यांनीच शोधून काढले आणि त्यावर विद्युतनिर्मिती प्रकल्प उभे केले. त्यामुळे औद्योगिकीकरणाला चालना मिळाली. ब्रिटिश भूगर्भ शास्त्रज्ञांनी संपूर्ण भारताचे सर्वेक्षण केले. त्यांनी ते इतक्या चांगल्या पद्धतीने केले आहे, की आजही त्याचा उपयोग होतो. ब्रिटिश भूगर्भशास्त्रज्ञ किती सचोटीने काम करीत असत, हे त्यांनी केलेल्या कामावरून दिसून येते. त्या काळात आजच्यासारख्या कसल्याच सुविधा नव्हत्या. कधी घोड्यावरून तर कधी घोडागाडीने, तर कधी बैलगाडीतून प्रवास करत त्यांनी सर्वेक्षण केलेले आहे. संपूर्ण हिमालयाचे आणि देशातील इतर पर्वतांचेही सर्वेक्षण त्यांनी केलेले होते. जेव्हा त्यांना कळले, की भारतात कोळसा आणि लोह खनिज मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे, तेव्हा त्यांनी भारतात रेल्वे उद्योग सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि तो यशस्वीपणे अंमलातही आणला.

**देशाचे एकत्रीकरणात रेल्वेची फार मोठी भूमिका**

भारतात रेल्वे सुरू झाली ती दि. १६ एप्रिल १८९३ रोजी. मुंबईतील छ. शिवाजी टर्मिनस ते ठाणे या मार्गावरून ती धावली. ही

रेल्वे सुरू व्हावी यासाठी तत्कालीन समाजसुधारक आणि उद्योजक नाना शंकरशेठ यांचेही महत्त्वपूर्ण योगदान लाभले. भारतात रेल्वे सुरू करण्यात ब्रिटिशांचे दोन उद्देश होते. देशाचे औद्योगिकीकरण करणे हा एक उद्देश आणि दुसरा, सैन्य एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात चटकन हलविता येण्यासाठी त्यांना रेल्वेचा उपयोग होणार होता.

वाफेच्या इंजिनावर रेल्वे धावू लागली, तेव्हा सर्वांनाच आश्चर्य वाटले. आनंदही झाला. सुरुवातीस भीतीपोटी रेल्वेत बसायला लोक तयार नसत. पण हळूहळू ते तयार झाले आणि आज तर ही रेल्वेलाईन मुंबईची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाते. देशभर रेल्वेने आपले जाळे विणले आहे. भारताचे औद्योगिकीकरण होण्यात आणि देशाचे एकत्रीकरण होण्यात रेल्वेने फार मोठी भूमिका बजावली आहे.

**सर्वात वाईट परिस्थिती होती ती दलित बांधवांची**

रेल्वेमुळे कामगार वर्ग तयार झाला. रेल्वेचे रूळ तयार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पोलादाच्या भट्ट्या, रेल्वेची बोगी तयार करण्यासाठी लागणारे कारखाने, इंजिन चालविण्यासाठी हवा असलेला दगडी कोळसा काढण्यासाठी खाणी, पाण्याचा उपसा करण्यासाठी विहिरी, स्टेशनची बांधणी यासाठी कामगार हवे होते. ते कामगार त्यावेळी अनायासे मिळाले. भारतातील त्या वेळच्या खेड्यातून वर्षभरासाठी रोजगार मिळणे कठीण असायचे. जमिनी प्रामुख्याने जमीनदारांच्या हातात होत्या. इतर सर्वजण त्या जमिनीवर मजूर म्हणून राबायचे. जमीनदारांनी आपल्या शेतामध्ये राबणाऱ्याला किती वेतन द्यावे याचे कसलेच नियम नव्हते. त्यामुळे शेतमजुरांचे शोषण होत राहिले. सर्वात वाईट परिस्थिती होती ती दलित बांधवांची. त्यांना सवर्णांची कामे करावी लागत आणि सवर्णांनी दिलेल्या भाकरी-तुकड्यावर जगावे लागे. याच काळात साधारणपणे १८६० ते १८९० मध्ये देशात दुष्काळ पडला. लोकांना रोजगारासाठी गाव सोडणे अपरिहार्य ठरले. प्रचंड संख्येने ग्रामीण भागातून माणसे शहराकडे येऊ लागली. कामाच्या शोधात असलेला गरीब शेतमजूर शहराकडे येऊ लागला. या भूमिहीन शेतकऱ्याचे आता कामगारात रूपांतर झाले. कार्ल मार्क्सला अभिप्रेत असलेला हाच सर्वहारा कामगार वर्ग. ब्रिटिशांनी जसा रेल्वेचा विस्तार केला, तसा कामगार वर्गाची संख्या वाढू लागली. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रेल्वे कामगारात दलितांची संख्या फार मोठी होती. आजही ती मोठी आहे.

**सत्यशोधक कामगार नेत्यांना लाभलेले मोठे यश**

सन् १८५४ साली मुंबईत कापड गिरणी उद्योगाला सुरुवात झाली. बॉम्बे स्पिनींग अँड विव्हींग मिल सुरू झाली. त्यानंतर अनेक कापड गिरण्या सुरू झाल्या. यातील काही गिरण्या या स्थानिक व्यापाऱ्यांच्या होत्या, तर काही ब्रिटिशांच्या मालकीच्या होत्या. आपले हितरक्षण करण्यासाठी पहिल्यांदा मुंबईत मालक वर्ग संघटित झाला. सन् १८७५ साली मिल ओनर्स असोसिएशनची मिल मालकांनी स्थापना केली. मालक वर्गाचे हितरक्षण व्हावे आणि सरकारकडून सुविधा मिळाव्यात हा यामागचा मुख्य हेतू होता. चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना करण्यात आली. त्यानंतर दि. २३ सप्टेंबर १८८३ साली पहिली गिरणी कामगारांची संघटना स्थापन झाली. ही संघटना स्थापन करण्यात सत्यशोधक चळवळीतील नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी पुढाकार घेतला. ते स्वतः गिरणीत स्टोअरकीपर होते. त्यामुळे त्यांना गिरणी कामगारांचे जीवन अगदी जवळून पाहता आले. त्यांची दुःखे त्यांनी जाणून घेतली. ते स्वतः सत्यशोधक चळवळीत सक्रिय होते व म. फुले यांचे सहकारी होते. त्यांनी गिरणी कामगारांची संघटना बांधण्याचा निर्णय घेतला. 'बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन' असे त्या संघटनेचे नामकरण त्यांनी केले. लोखंडे यांच्याबरोबर गिरणी कामगार चळवळीत त्यावेळी सक्रिय असलेले दुसरे नेते म्हणून गुरूवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांच्याकडे पाहता येईल. त्यांचे योगदानही खूप मोठे आहे. केळूसकर हे इतिहास संशोधक म्हणूनही ओळखले जातात. छ. शिवाजी महाराजांचे चरित्र त्यांनी लिहिले आहे. एक इतिहास संशोधक कामगार चळवळीत आल्यामुळे चळवळीचे बळ वाढले. या सत्यशोधक नेत्यांनी गिरणी कामगारांना न्याय मिळवून देण्यात चांगले यश मिळविले. सत्यशोधकांची कामगार चळवळ हा एक स्वतंत्र विषय आहे. यांचे यश नोंदवताना एवढेच नमूद करता येईल की, दर रविवारी कामगाराला सुट्टी मिळावी हा हक्क या सत्यशोधकांनी लढून मिळविला. दि. १० जून १८९० रोजी रविवारच्या सुटीचा कायदा करण्यात आला. सत्यशोधक कामगार नेत्यांना लाभलेले हे मोठे यश होते. पुढे इतरही अनेक हक्क त्यांनी मिळविले. पुढे म. फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळ थोडीशी मागे पडल्याचे दिसते.

**ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची (आयटक) स्थापना**

रशियात क्रांती झाल्यानंतर जगभरातील अनेक देशांतून क्रांतीचे विचार पुढे येऊ लागले. अनेक देशांतून कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाले. त्या देशातील कामगार वर्ग हा त्यांचा आधार होता. कामगार वर्गाला बरोबर घेऊन परिवर्तन घडवून आणायचे या विचारातून ती माणसे काम करीत होती. भारत याला अपवाद नव्हता. सत्यशोधकांच्या नंतर कामगार वर्गावर कम्युनिस्टांनी लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. आपापल्या परीने ही मंडळी ठिकठिकाणी काम करीत होती. मुंबई, चेन्नई, अहमदाबाद, कानपूर ही त्या काळातील औद्योगिक केंद्रे मानली जात. तेथील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी कामगार संघटना बांधल्या होत्या. कामगार संघटित करून ब्रिटिशांच्या विरोधात लढा द्यायचा आणि ब्रिटिशांना बाहेर घालून देशाची सत्ता ही देशातील श्रमजीवी जनतेकडे सोपावयची या ध्येयाने हे कार्यकर्ते आपापल्या क्षेत्रात काम करीत होते. कामगारांची देशव्यापी संघटना असावी असा विचार नंतर पुढे आला. असा विचार करणाऱ्यात बाळ गंगाधर टिळक, लाला लजपत राय यांचा समावेश होता. यांच्या पुढाकाराने ऑक्टोबर १९२० मध्ये ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची (आयटक) स्थापना करण्यात आली. कामगार चळवळीचे केंद्र असलेल्या मुंबई शहरात पहिले अधिवेशन भरवावे असा निर्णय या कार्यकर्त्यांनी घेतला. मुंबईत झालेल्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद टिळकांनी भूषवावे असे ठरले होते. हे अधिवेशन ऑक्टोबर महिन्यात घ्यावे असाही निर्णय झाला. पण त्या आधीच दि. १ ऑगस्ट रोजी टिळकांचे निधन झाल्याने लाला लजपत राय यांनी अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले. अशा प्रकारे कामगारांची देशव्यापी संघटना अस्तित्वात आली. आता कामगार वर्ग एक संघटित शक्ती म्हणून पुढे येऊ लागला.

**कम्युनिस्टांचा कामगार क्षेत्रातील दबदबा वाढला**

कामगार वर्गात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी २६ डिसेंबर

१९२५ रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. या पक्षाचा आधार कामगार वर्ग होता. मुंबईतील गिरणी कामगार या पक्षाच्या पाठीशी होते. मुंबईप्रमाणेच इतरही औद्योगिक शहरांतून कामगार संघटना बांधण्यात कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना चांगले यश लाभले. १९२८ साली मुंबई येथील गिरणी कामगार युनियनने जो संप पुकारला, त्याला कामगार वर्गाने संपूर्ण पाठिंबा दिला. हा संप तब्बल ६ महिने चालला. कामगारांनी आपले ऐक्य टिकविले. या संपातून कामगारांनी मागण्या मिळविल्या. पण संपाची धास्ती घेतलेल्या ब्रिटिश सरकारने संप पुकारणाऱ्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांवर राजद्रोहाचा आरोप ठेवत अटक केली. त्यांचा खटला मिरत येथील कोर्टात चालविण्यात आला. मुंबईत खटला चालविण्याची हिंमत ब्रिटिशांना झाली नाही. हा खटला इतिहासात मिरत कटाचा खटला म्हणून ओळखला जातो. या खटल्यात कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या. मात्र, मुंबईतील संपाने कम्युनिस्टांचा कामगार क्षेत्रातील दबदबा वाढला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात जेव्हा कामाला सुरुवात केली. तेव्हा इतर प्रश्नांबरोबरच त्यांचे लक्ष देशात सुरू असलेल्या कामगार चळवळीकडे गेले. या चळवळीचा अभ्यास करून त्यांनी आपले मत नोंदविले आहे. त्यांनी असे म्हटले आहे, की कामगार संघटनांनी केवळ कामगारांचे हित जपले पाहिजे. कामगारांच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. संघटित कामगार वर्गातसुद्धा स्पृश्यास्पृश्यता पाळली जाते याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले होते. कम्युनिस्टांच्या कार्यपद्धतीवर त्यांनी आक्षेप घेतला. आपल्या राजकीय उद्दिष्टांसाठी ते कामगार वर्गाला वापरून घेतात, असे त्यांचे म्हणणे होते.

**स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना**

चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, नाशिकमधील काळाराम मंदिरापुढे झालेला सत्याग्रह अशी मोठी आंदोलने त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. यामुळे त्यांचा केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर राष्ट्रीय स्तरावर मोठा दबदबा निर्माण झाला. या तीन आंदोलनांनंतर त्यांनी जो मोठा निर्णय घेतला तो स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करण्याचा. कामगार वर्गात काम करणे त्यांना आवश्यक वाटल्याने त्यांनी ऑगस्ट १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आणि या पक्षात सर्व जाती-धर्माच्या लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

बाबासाहेबांना कामगार चळवळीत लक्ष घालावे व मजूर पक्षाची स्थापना करावी असे का वाटले असावे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रचलित कामगार चळवळीचा अभ्यास करता, त्यांना काही गोष्टी स्पष्टपणे जाणवल्या. त्यातील पहिली गोष्ट म्हणजे प्रचलित कामगार चळवळ ही प्रामुख्याने कामगार वर्गाच्या आर्थिक प्रश्नावर आंदोलन उभे करते. पगारवाढ, सुट्ट्या, इतर सवलती. पण सांस्कृतिक आणि सामाजिक प्रश्न ती आपल्या विषय पत्रिकेवर घेत नाहीत. उदाहरणार्थ, संघटित कामगार वर्ग आपल्या संघटनेतील दलित बांधवांशी चांगले वागत नाही. अस्पृश्य म्हणून त्यांना दूर ठेवतो. त्यांचा पिण्याच्या पाण्याचा माठदेखील वेगळाच असतो. सवर्ण कामगारांना त्यांच्या कामाप्रमाणे बढत्या मिळतात. ते अगदी मुकादम, जॉबर होऊ शकतात. पण दलित कामगारांना मात्र कसलीच बढती मिळत नाही. ते एकदा का एका कनिष्ठ दर्जाच्या खात्यात कामाला लागले, की निवृत्त होईपर्यंत तेच काम करीत राहतात. त्यांच्यावर ते लादले जाते. यामुळे दलित कामगारांचा ना आर्थिक विकास होतो ना सांस्कृतिक. ते कायम कनिष्ठ दर्जाचेच राहतात. त्यांच्या जीवनात बदल घडवून आणायचा असेल तर आपण कामगार चळवळीत लक्ष घातले पाहिजे. तसेच या कामगारांची बाजू सरकार दरबारात मांडण्यासाठी त्यांचा पक्षही असायला पाहिजे, याची जाणीव बाबासाहेबांना झाल्यामुळे त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.

**स्वतंत्र मजूर पक्षाची धोरणे**

आपल्या पक्षात केवळ दलितांनीच सहभागी व्हावे असे नाही तर आमची भूमिका मान्य असणाऱ्या सवर्ण बांधवांनीदेखील आमच्या पक्षात यावे, असे आवाहन बाबासाहेबांनी केले. त्यांच्या आवाहनाला सवर्ण मंडळींनी काही प्रमाणात प्रतिसादही दिला. पण प्रामुख्याने दलित समाजातील कार्यकर्ते पक्षात सहभागी झाले. पुढे कम्युनिस्ट नेते म्हणून गाजलेले कॉ. शामराव परूळेकर हे त्या काळात डॉ. बाबासाहेबांचे सहकारी होते, हे आवर्जून ध्यानात घेण्यासारखे आहे.

स्वतंत्र मजूर पक्षाची धोरणे खालीलप्रमाणे होती.

१) कामगारांचे वेतन ठरविण्यात यावे.
२) कामाचे तास कमी करण्यात यावेत.
३) कामगारांना कामाची शाश्वती, बढती याबद्दल कायदे असावेत.
४) पगारी रजा, आजारपणाची रजा मिळावी. वृद्धापकाळात निवृत्तीवेतन मिळावे.
५) कामगारांना त्यांच्या हक्काची घरे मिळावीत.
६) कामगारांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी.
७) कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा मिळाव्यात.

त्या काळात दलित कामगारांना वरच्या श्रेणीतील कामासाठी घेतले जात नसे. त्यांच्यावर कायम कनिष्ठ दर्जाची कामे लादली जायची. याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध दर्शविला. पुढे वेळोवेळी त्यांनी आपले जे कामगारविषयक धोरण जाहीर केले, त्यामध्ये कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी आपला पक्ष प्रयत्नशील असेल, असे आश्वासन त्यांनी दिले होते.

**त्यामुळे कामगार वर्गात चैतन्य निर्माण झाले**

त्या काळात मिल मालक मनमानी करीत. कामगारांना बारा बारा तास राबवून घेत. वेतन तुटपुंजे असे. त्यात कामगाराला जगता येणे कठीण असे. मिलच्या सभोवताली झोपड्या उभारून त्यात तो राहात असे. आरोग्य, शिक्षण या गोष्टी खूप दूर होत्या. सांस्कृतिक प्रश्नांचा विचारदेखील फारसा होत नसे. अशा काळात बाबासाहेबांनी उपस्थित केलेले मुद्दे किती महत्त्वाचे होते हे समजून येईल.

सन् १९३८ मध्ये मनमाड येथे रेल्वे कामगारांची भव्य परिषद आयोजित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. या परिषदेला २० हजार रेल्वे कामगार उपस्थित होते. यामध्ये दलित कामगारांचा सहभाग मोठा होता. त्या काळात रेल्वे विभागात काम करणाऱ्या दलित कामगारांना बढती देण्यात येत नसे. गँगमन, सफाई कामगार म्हणून ते काम करीत. हेच काम करत ते निवृत्तही होत. सवर्ण कामगार त्यांना आपल्यात सामावून घेण्यास तयार नसत. या प्रश्नाकडे बाबासाहेबांनी कामगारांचे लक्ष वेधले. चतुर्थ श्रेणीमध्ये काम करणाऱ्या दलित कमगारांना सरकारने बढती दिली पाहिजे. त्यासाठी त्यांना आवश्यक ते प्रशिक्षणही दिले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे कामगार वर्गात चैतन्य निर्माण झाले.

त्या काळात स्वातंत्र्य चळवळ जोशात होती. सर्वत्र लढ्याचे वातावरण होते. ब्रिटिशांनी तात्काळ देशातून निघून जावे आणि सत्ता भारतीयांच्या हातात द्यावी, अशी मागणी होत होती. बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने स्वातंत्र्य चळवळीला जाहीर पाठिंबा दिला.

**स्वतंत्र मजूर पक्ष व कम्युनिस्ट यांच्यात ऐक्य**

सप्टेंबर १९३८ मध्ये सरकारने कामगार कलह कायदा तयार केला. हा कायदा मालक वर्गाचे हित डोळ्यापुढे ठेवून करण्यात आलेला कायदा होता, हे लवकरच स्पष्ट झाले. या कायद्यानुसार संप बेकायदेशीर ठरविण्याचा अधिकार मालक वर्गाला देण्यात आला होता. या कायद्याचा आधार घेत मालक वर्ग कामगारांवर दहशत बसवू शकत होता. या कायद्यात अशी एक तरतूद होती, की मालक आपल्या मर्जीनुसार कारखान्यात टाळेबंदी करू शकत होते किंवा कारखानाच बंद करू शकत होते. त्यांच्यावर कोणतेही निर्बंध नव्हते. या कायद्याचे वर्णन काळा कायदा असे त्यावेळी करण्यात आले होते. बाबासाहेबांनी आणि त्यावेळच्या गिरणी कामगार युनियनने या कायद्याला कसून विरोध केला. गिरणी कामगार युनियन ही कामगारांची बलाढ्य संघटना कम्युनिस्टांच्या नियंत्रणाखाली होती. या कायद्याला विरोध करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष आणि कम्युनिस्ट पक्ष व त्यांच्या कामगार संघटना एकत्र आल्या. यांनी कृती समिती स्थापन केली आणि या काळ्या कायद्याला विरोध करण्यासाठी एक दिवसाचा सार्वत्रिक संप करण्याचा निर्णय घेतला. ७ नोव्हेंबर हा संपाचा दिवस ठरविण्यात आला. हाच दिवस का निवडण्यात आला, हेसुद्धा ध्यानात घेणे आवश्यक आहे. याच दिवशी १९१७ साली रशियात क्रांती झाली. जगातील पहिले श्रमजीवी वर्गाचे राज्य स्थापन झाले. ज्यांना पूर्वी सत्तेवर येण्याचा अधिकारच नव्हता, असे श्रमजीवी लोक क्रांती करून सत्तेवर आले. असा हा ऐतिहासिक दिवस संपासाठी निवडण्यात आला. संपाच्या तयारीसाठी पुढाऱ्यांची जी बैठक झाली, त्या बैठकीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कॉ. डांगे, कॉ. मिरजकर, कॉ. परुळेकर हे उपस्थित होते. सभेचे अध्यक्षस्थान जमनादास मेथा यांनी स्वीकारले होते. या पुढारी मंडळींनी आपल्या कार्यकर्त्यांसह मुंबईतील औद्योगिक शहरात संपाचा जोरदार प्रचार केला असल्याने संप १०० टक्के यशस्वी झाला. संप होऊ नये म्हणून शासनाने आणि मालक वर्गाने केलेल्या प्रयत्नांना कामगार बळी पडले नाहीत. ते संपावर गेले. डिलाईल रोड हा कामगार चळवळीचा बालेकिल्ला समजला जाई. या भागात कामगार वस्ती मोठ्या प्रमाणावर होती. कामगार जागृत होते. त्यामुळे तेथील वातावरण नेहमीच तंग असे. या भागात कामगार आणि पोलीस यांच्यात चकमक उडाली. पोलिसांनी प्रथम लाठीमार केला आणि नंतर गोळीबारही केला. या गोळीबारात ७२ कामगार जखमी झाले. ३५ कामगारांना अटक करून तुरूंगात पाठवण्यात आले. संपाच्या दिवशी जेव्हा कामगारावर पोलिसांनी लाठीमार, गोळीबार केला, त्याच दरम्यान एका संतप्त कामगाराने समोरून येणाऱ्या कारवर दगडफेक केली. त्यामुळे गाडीच्या काचांचा चक्काचूर झाला. नंतर कळले, की या गाडीत सरदार पटेल, मथुरादास त्रिकमजी, भवानजी अर्जुन खिमजी आणि कन्हैय्यालाल मुन्शी होते. सुदैवाने यातील कोणालाही दुखापत झाली नाही.

सायंकाळी मुंबईतील कामगार मैदानावर प्रचंड जाहीर सभा झाली. या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कॉ. डांगे यांची व इतर नेत्यांची जोरदार भाषणे झाली. यांनी कामगार वर्गाच्या ऐक्यावर भर दिला. ब्रिटिश आणि मालक वर्गाच्या विरोधात लढा उभारण्यासाठी कामगार संघटनांनी एकत्र येऊन आंदोलन करण्याची गरज असल्याचे स्पष्टपणे जाहीर केले. सभेच्या शेवटी दोन पुतळे जाळण्यात आले. यातील एक होता काळ्या कायद्याचे प्रतीक आणि दुसरा होता गृहमंत्र्यांचे प्रतीक. पुतळ्यांचे दहन करून या प्रचंड सभेची सांगता झाली. या संपामुळे दोन गोष्टी घडल्या पहिली म्हणजे, बाबासाहेबांच्या नेतृत्त्वाखालील संघटना आणि कम्युनिस्टांच्या नेतृत्त्वाखालील संघटना आंदोलनासाठी एकत्र आल्या आणि त्यांनी संप यशस्वी करून दाखविला. दुसरी म्हणजे, या संपानंतर कामगार वर्गातील वातावरण बदलून गेले. कामगार वर्गात उत्साह संचारला.

मुंबईप्रमाणेच मुंबई प्रांतातील अहमदाबाद, अमळनेर, जळगाव, चाळीसगाव, पुणे, धुळे येथील कामगारही उत्स्फूर्तपणे संपावर गेले.

या एकदिवसीय संपावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे बाबासाहेबांनी कम्युनिस्टांच्या कार्यपद्धतीविषयी, तत्त्वज्ञानाविषयी आपले वेगळे मत जरी व्यक्त केले असले, तरी ते त्यांचे विरोधक किंवा शत्रू नव्हते. त्यांच्याबरोबर हातात हात घालून ब्रिटिशांच्या विरोधात आणि मालक वर्गाच्या विरोधात लढा उभारण्यासाठी ते तयार होते.

**मजूर मंत्रीपदी बाबासाहेब**

तत्कालीन महाराज्यपालांनी बाबासाहेबांना आपल्या मंत्रिमंडळात सामावून घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २० जुलै १९४२ रोजी त्यांची मजूरमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली. मंत्रीपदावर त्यांची नेमणूक झाल्यानंतर 'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राने असे लिहिले, की 'एका अस्पृश्य हिंदूची भारतीय सरकारच्या कार्यकारी मंडळात नेमणूक झाली हे या देशाच्या इतिहासातले पहिलेच उदाहरण होय.' त्यांची नेमणूक झाल्यानंतर दलित समाजात, कामगार वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यांच्या कार्यकर्त्यांत उत्साह संचारला. आता त्यांच्यावरची जबाबदारी आणखी वाढली. न्याय्य हक्कांसाठी आंदोलन करणे वेगळे आणि जबाबदारी अंगावर घेऊन न्याय मागणाऱ्यांना न्याय देणे वेगळे. या दोन वेगळ्या आणि महत्त्वाच्या गोष्टी असतात. कामगार नेत्याला मंत्रीपदाची जबाबदारी झेपेलच असे सांगता येत नाही. पण बाबासाहेबांनी मिळालेल्या या संधीचे सोने केले. कामगार वर्गाच्या हिताचे कायदे करण्याची एकही संधी त्यांनी सोडली नाही. सर फिरोज खान नूर यांच्या कारकीर्दीत कामगार, मालक आणि सरकार यांच्या प्रतिनिधींची एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीची बैठक बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली ७ मे १९४३ रोजी झाली. या बैठकीत एक महत्त्वपूर्ण मुद्दा विचारात घेण्यात आला होता. तो म्हणजे युद्ध साहित्य निर्माण करणाऱ्या कारखान्यात संयुक्त कामगार नियामक समिती असली पाहिजे. मजूरमंत्री असताना त्यांनी १० मे १९४३ रोजी 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' या मुंबई शाखेच्या सभेत भाषण करताना असे म्हटले की, भारतात कामगारांनी आपले मंत्रिमंडळ स्थापन केले पाहिजे. ते पुढे असे म्हणतात, भारतास स्वातंत्र्य मिळणे एवढीच गोष्ट पुरेशी नाही. ते स्वराज्य कोणाच्या हातात असणार याला जास्त महत्त्व आहे. बाबासाहेबांनी हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. मिळणारे स्वातंत्र्य हे श्रमिकांच्या हातात आले पाहिजे, असा विचार त्यावेळी मांडला जात होता. बाबासाहेब त्याच विचारांचे होते.

त्रिपक्ष कामगार परिषदेचे दुसरे अधिवेशन बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे दि. ६ व ७ ऑगस्ट रोजी भरले होते. त्यामध्ये त्यांनी आपल्या भाषणात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य याबरोबरच सांस्कृतिक प्रश्नावर भर दिलेला होता. भारतातील कामगारांची आर्थिक परिस्थिती कशी आहे व त्यांची स्थिती कशी आहे, हे जाणून घेण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी असा ठरावही या अधिवेशनात मंजूर करण्यात आला होता.

मजूरमंत्री म्हणून काम करताना त्यांनी अतिशय जाणीवपूर्वक महिला कामगारांकडे लक्ष दिले. स्त्रियांना रात्रपाळीसाठी बोलावले जाऊ नये या मताचे ते होते. तसा त्यांनी कायदाही करून घेतला. ज्यामुळे स्त्रियांना रात्री कामावर येण्याची जबरदस्ती कुणालाही करता आली नाही. प्रसूतीच्या काळात महिलांना पगारी रजा देण्यात यावी, असा कायदाही त्यांनी केला. सर्व कामगारांना पगारी रजा मिळावी तसेच महागाई निर्देशांकानुसार कामगारांना महागाई भत्ता मिळावा अशी शिफारस त्यांनी केली. त्या काळात खाण उद्योगातील कामगारांची परिस्थिती फार गंभीर असे. विशेषतः भूगर्भात जाऊन जे खाण कामगार काम करीत त्यांना धोकादायक परिस्थितीत काम करावे लागे. अशा कामगारांना पुरेशी सुरक्षा देण्यात यावी, अशी शिफारस त्यांनी केली होती. खाणीत अपघातांचे प्रमाण मोठे असायचे. अपघातग्रस्त कामगाराला मालकाने नुकसानभरपाई द्यावी, अशी शिफारस त्यांनी केली होती. औद्योगिक कामगारांना त्यांच्या हक्काची घरे मिळावीत या मताचे ते होते आणि तशी शिफारसही त्यांनी केली. बाबासाहेबांना नेहमी चिंता वाटे ती कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची. त्यांच्या मुलांना उत्तम शिक्षण मिळाले पाहिजे. असा आग्रह त्यांनी धरल्याचे दिसते. यावरून बाबासाहेबांनी कामगारांच्या विविध प्रश्नांकडे कसे पाहिले, ते सोडविण्यासाठी त्यांची बाजू कशी मांडली, विशेषतः महिला आणि लहान मुले यांचे प्रश्न त्यांनी कसे आग्रहाने मांडले, हे दिसून येते. म्हणूनच असे म्हणता येते, की त्यांना जे मंत्रीपद मिळाले त्याचे त्यांनी सोने केले.

बाबासाहेबांनी भारतातील कामगार चळवळीला जे योगदान दिले आहे, ते सर्वार्थाने महत्त्वाचे आहे. त्यांनी कामगारांचे केवळ लढेच केले नाहीत, तर त्यांच्यासाठी महत्त्वपूर्ण असे कायदेही करून त्यांना न्याय दिला.

आज देशातील कामगारांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. कामगारांसाठी जे नवे 'लेबर कोड' तयार करण्यात आले आहे, त्याची अंमलबजावणी झाली तर कामगाराला संघटनाच करता येणार नाही. हंगामी तत्त्वावर कामगारांची नेमणूक करण्यास सरकार मालकांना परवानगी देत आहे. सार्वजनिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध असतात, जेथे दलित बांधवांनाही रोजगार मिळायचा. आता सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करण्यास सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर विचार करता, बाबासाहेबांनी केलेले काम किती महत्त्वपूर्ण होते याची कल्पना येते.

**संदर्भ :**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचा धम्म.
– लेखक : प्रभाकर वैद्य

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र
– लेखक : धनंजय कीर

३) डॉ. बाबासाहेब गौरव ग्रंथ – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारविषयक धोरण – एक बोध
– लेखक : राम बसाखेत्रे

४) मिरत कटाचा खटला
– लेखक : एम. जी. देसाई.


**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# समाजवादी बाबासाहेब



प्रा. सुभाष वारे

**केवळ दलितांचे नेते ही प्रतिमा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाला न्याय देणारी नाही. बाबासाहेबांनी केलेलं लिखाण, त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका, हाती घेतलेली आंदोलने हे जर आपण नीट समजून घेतले तर आपल्या असं लक्षात येईल, की त्यांनी सतत संपूर्ण समाजाच्या भल्याची मांडणी केली आहे. तसा आग्रह धरला आहे.**

१९२० नंतर म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारताचा स्वातंत्र्यलढा अधिक व्यापक बनत गेला. इंग्रज निघून गेल्यानंतरचा भारत कसा असेल, तो भारत कोणाचा असेल, त्या भारतात कोणाचं भलं होईल अशा आशयाचा संवाद स्वातंत्र्यलढ्याचे नेते आणि जनता यांच्यात १९२० नंतर सुरू झालेला आपल्याला दिसतो. असा संवाद १९२० च्या आधीच्या स्वातंत्र्यलढ्यात फारसा झालेला दिसत नाही. इंग्रजांच्या आधीच्या आणि बऱ्याच प्रमाणात इंग्रजांच्या काळातीलही भारतावर संस्थानिकांचे, वतनदारांचे आणि अर्थातच पुरोहितशाहीचे वर्चस्व होते. १९२० नंतरचा भारताचा स्वातंत्र्यलढा इथल्या सामान्य माणसांना शब्द देत होता, की इंग्रज निघून गेल्यानंतरचा भारत सर्वांचा असेल, सर्वांसाठी असेल. म. गांधीजी आणि तत्कालीन काँग्रेस पक्ष या लढ्याचं नेतृत्व करत होते. त्याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म. गांधीजींना आणि काँग्रेसला काही टोकदार प्रश्न विचारत होते. स्वातंत्र्य कोणापासून आणि स्वातंत्र्य कोणासाठी अशा आशयाचे प्रश्न विचारून बाबासाहेब स्वातंत्र्यलढ्याचे उद्दिष्ट आणखी व्यापक बनवण्याचा प्रयत्न करत होते. इंग्रजांच्या साम्राज्यवादाबरोबरच माणूसपण नाकारणाऱ्या जातीव्यवस्थेपासूनही आम्हाला मुक्ती हवी आहे. मनमाड येथे झालेल्या एका कामगार मेळाव्यात बाबासाहेब म्हणाले होते, आमचे दोन शत्रू आहेत, ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही. म. गांधी आणि काँग्रेसही बाबासाहेबांना प्रतिसाद देत शक्य ते बदल आपल्या भूमिकांमधे करत होते. या घटनाक्रमाकडे बाबासाहेबांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान अशा अर्थाने पाहिले पाहिजे.



THE CONSTITUTION OF INDIA

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity;
and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

**बाबासाहेबांचा संघर्ष एकूण भारतीय समाजाच्या भल्यासाठी**

अमानवीय अशा जातीप्रथेच्या विरोधात बाबासाहेब सतत संघर्ष करीत होते. हा संघर्ष जसा अस्पृश्यांना माणूस म्हणून सन्मानाने जगता यावे यासाठी होता, तसाच तो जातीप्रथेने एकूण भारतीय समाजाचे जे प्रचंड नुकसान केले होते ते दुरूस्त करण्यासाठीपण महत्त्वाचा होता. जातीप्रथेने फार मोठ्या समूहाला शिक्षण नाकारले होते. अंगी काहीही क्षमता, कौशल्य, हुनर असले तरी जन्माने मिळालेल्या जातीचा व्यवसाय करणे व्यक्तीला बंधनकारक होते. समाजाची प्रगती व्हायची असेल, तर समाजातील सर्वांना आपल्या अंगभूत कौशल्यांना विकसित करण्याची समान संधी शिक्षणाद्वारे मिळायला हवी. समाजाला जर चौफेर विकास साधायचा असेल, तर समाजातील उपलब्ध असलेल्या सर्व मनुष्यबळाचा योग्य वापर होणे गरजेचे असते. जातीप्रथेमुळे अंगी निर्मितीची कौशल्ये असणाऱ्या अनेकांना जाणीवपूर्वक शिक्षण नाकारून समाजाच्या विकास प्रक्रियेत योगदानाची संधी नाकारली जात होती. समाजाचं राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक नेतृत्व करण्यासाठी फार छोट्या समूहातून माणसे निवडली जात होती आणि फार मोठ्या समूहातील हुनर, क्षमता जातीप्रथेच्या जाचक बंधनांनी कुजवल्या जात होत्या. यात एकूण भारतीय समाजाचेही नुकसान होत होते. जातीप्रथेचा निषेध आणि जातीप्रथेने घातलेली बंधने यासाठी तोडणे आवश्यक होते, की त्यामुळे संपूर्ण समाजाच्या रोखलेल्या, तुंबलेल्या विकासाच्या वाटा मोकळ्या होणार होत्या. म्हणूनच मी असं म्हणतोय, की बाबासाहेब जातीप्रथेच्या, चातुर्वर्ण्याच्या विरोधात संघर्ष करत होते, ते केवळ पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजासाठी किंवा शूद्र मानल्या गेलेल्या जातीसमूहांसाठी नव्हे, तर एकूण भारतीय समाजाच्या भल्यासाठी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत जो पहिला राजकीय पक्ष स्थापन केला त्याचे नाव होते, स्वतंत्र मजूर पक्ष. १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्थापन झालेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने सर्व जातीधर्मातील कामगार, भूमिहीन शेतमजूर, शेतकरी यांच्या न्याय्य हक्काची लढाई लढण्याचे उद्दिष्ट होते. स्वतंत्र मजूर पक्षाला १९३७ साली झालेल्या निवडणुकांमध्ये चांगले यश मिळाले. पंधरा ठिकाणी त्यांचे उमेदवार निवडून आले होते. मुंबई प्रांताच्या विधानसभेत तत्कालीन काँग्रेस सरकारने आणलेले कामगार धोरण हे कामगारविरोधी आहे असे जाहीर करत बाबासाहेबांनी त्या धोरणाला अभ्यासपूर्ण विरोध केला. इंडस्ट्रियल डिस्प्युटस् ॲक्टमधील कामगारविरोधी तरतुदी रद्द कराव्यात यासाठी १९३७ साली बाबासाहेबांच्या नेतृत्वात स्वतंत्र मजूर पक्षाने आंदोलन केले होते.

**कामगार चळवळीने बाबासाहेबांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घ्यायला हवी**

१९४२ साली ब्रिटिश सरकारच्या गव्हर्नर्स कौन्सिलमधे बाबासाहेबांनी मजूरमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९४२ ते १९४६ या काळात मजूरमंत्री या नात्याने बाबासाहेबांनी भारतातील कामगार वर्गाच्या अनेक मूलभूत अधिकारांची पायाभरणी केली. चौदा तासांऐवजी कामगारांना दररोज आठच तास काम करावे लागेल, जादा कामाचा अतिरिक्त मोबदला मिळेल, कामगारांना नियमित वेतनवाढ मिळेल, राज्य कामगार विमा धोरण ठरवले व राबवले जाईल याबरोबरच भविष्य निर्वाह निधी, महिला कामगार कल्याण मंडळ, महिलांसाठी प्रसूती रजेची तरतूद, कामगारांना कारखान्याच्या व्यवस्थापनात प्रतिनिधित्व, कामगार संघटनांना मान्यतेची तरतूद अशा अनेक अर्थांनी कामगारहिताची धोरणात्मक पायाभरणी या चार वर्षात बाबासाहेबांच्या नेतृत्वात झाली. भारतातील कामगार चळवळीने बाबासाहेबांच्या या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घ्यायला हवी.

**...तरीही कायदेमंडळाने कायदे करताना हे मुद्दे मूलभूतच मानावेत**

स्वातंत्र्य चळवळीच्या एका टप्प्यावर ब्रिटिश सत्तेबरोबर भारताच्या स्वातंत्र्याची तपशीलवार चर्चा सुरू झाली. त्याअंतर्गत भारतीयांच्या संविधानिक अधिकारांचीही चर्चा सुरू झाली. तेव्हा पूर्वाश्रमीचे अस्पृश्य किंवा अनुसूचित जाती समूहांच्या अधिकारांची मागणी जोरकसपणे नोंदवण्यासाठी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या नव्या राजकीय पक्षाची स्थापना बाबासाहेबांना करावी लागली. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाने बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली भारताच्या संविधान सभेला जे निवेदन दिले होते, त्यात उद्योग, विमाक्षेत्र आणि शेतीच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी केली होती. या क्षेत्रातील खाजगी मालकी संपविण्यासाठी संबंधितांना त्यांच्या मालकी हिश्श्याप्रमाणे कर्जरोखे (डिबेंचर्स) उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव होता. उत्पादनक्षम अशा आकारातील शेतजमिनीचे तुकडे गटशेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कसण्यासाठी द्यावेत, अशी मागणी शे.का.फे ने केली होती. शेतीची उत्पादकता वाढून शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढेल याबाबतची मूलभूत मांडणी बाबासाहेबांनी त्यावेळी केली होती. शासनाने शेतीसाठी पाणी, खते, बी-बियाणे उपलब्ध करून दिले पाहिजेत, हेही त्या प्रस्तावात नोंदवले होते. देशाचा जलद विकास व्हायचा असेल, तर खाजगी क्षेत्राच्या मर्यादा ठरवून देत राज्य नियंत्रित आणि राज्याच्या मदतीने उद्योग, विमा, शेतीक्षेत्र विकसित झाले पाहिजे, अशी भूमिका शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने घेतली होती. भारतातील शोषित जातीसमूहांना, महिलांना न्याय द्यायचा असेल, तर विकास प्रक्रियेत राज्याचीच भूमिका अधिक सक्रियतेची असली पाहिजे, या बाबासाहेबांच्या भूमिकेचे राज्य समाजवाद असे वर्णन केले जाते. संविधान सभेचे बहुमत मात्र बाबासाहेबांच्या या भूमिकेसोबत आले नाही. त्यावेळी संविधानसभेने बहुमताने खाजगी संपत्तीचा अधिकार हा मूलभूत अधिकार मानला. उद्योग, विमा, शेती यातील खाजगी मालकी संपवण्याच्या भूमिकेला संविधान सभेचे समर्थन मिळू शकले नाही. बाबासाहेबांना बहुमताचा निर्णय स्वीकारावा लागला. संविधान सभेतील त्यानंतरच्या चर्चांमधे बाबासाहेब संविधान सभेला समजावून देत होते, की 'एक व्यक्ती एक मत आणि प्रत्येकाच्या मताला समान मूल्य' ही राजकीय लोकशाहीची भूमिका स्वीकारल्यानंतर आता आपल्याला या देशात खोलवर रुजलेल्या आर्थिक विषमतेचा गंभीर विचार करायला पाहिजे. संसदीय लोकशाहीत गरीब आणि श्रीमंतांमधील वाढती दरी कमी करण्याचे काम दर पाच वर्षांनी बदलणाऱ्या सरकारच्या इच्छाशक्तीवर सोडून चालणार नाही. गरीब आणि श्रीमंतांमधील दरी मिटवण्यासाठी सर्व नागरिकांना शिक्षणाचा अधिकार, रोजगाराचा अधिकार आणि जगण्याची साधने मिळवण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून बहाल करण्याची भूमिका संविधान सभेने घ्यावी, असा बाबासाहेबांचा आग्रह होता. इंग्रजांनी अनेक वर्षे आर्थिक लूट केलेल्या भारतात, हिंदू-मुस्लिम दंग्याच्या पार्श्वभूमीवर नव्याने सत्तेवर येत असलेल्या भारत सरकारसाठी ही अवघड जबाबदारी ठरेल, अशी भूमिका संविधान सभेतील बहुसंख्य सदस्यांनी त्याही वेळी घेतली. शेवटी वरील तीनही महत्त्वाच्या अधिकारांची नोंद संविधानाच्या चौथ्या प्रकरणात म्हणजेच राज्यव्यवस्थेसाठीच्या निदेशक तत्त्वात झाली. तरीही बाबासाहेबांनी राज्यघटनेतील अनुच्छेद सदतीसमध्ये आवर्जून नोंदवले, की या प्रकरणातील मुद्दे जरी मूलभूत नसले, ते जरी न्यायालयाद्वारे अंमलबजावणीयोग्य नसले तरीही कायदेमंडळाने कायदे करताना हे मुद्दे मूलभूतच मानावेत.

**बाबासाहेबांच्या समाजवादी भूमिकांचा जोरकसपणे आग्रह धरला पाहिजे**

बाबासाहेबांनी आयुष्यभर ज्या भूमिका घेतल्या त्या गरिबांच्या कल्याणाच्या होत्या, विकास प्रक्रियेत गरिबांना पुढे जाण्यासाठी समान संधी असली पाहिजे, असा आग्रह धरणाऱ्या होत्या. पण भारतात गरिबांची ओळख जातीव्यवस्थेच्या उतरंडीमध्येच शोधावी लागेल, हा बाबासाहेबांचा आग्रहही महत्त्वाचाच होता. बाबासाहेबांच्या या समाजवादी भूमिका आजही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. संविधान सभेत आपले शेवटचे भाषण देताना बाबासाहेबांनी भविष्यासाठी अनेक महत्त्वाचे इशारे आपल्याला दिले होते. त्यातल्या एका इशाऱ्यात ते म्हणतात, आपण राजकीय समानतेचे धोरण स्वीकारले असले तरी भारतीय समाजात खोलवर रुजलेल्या आर्थिक आणि सामाजिक विषमतेची गंभीर दखल आपल्याला घ्यावी लागेल. राजकीय लोकशाहीचे रुपांतर वेगाने आर्थिक व सामाजिक लोकशाहीत आपण करू शकलो नाहीत, तर भारतीय संविधान सभेने मोठ्या कष्टाने उभारलेला हा इमला उद्ध्वस्त करण्याचे काम आर्थिक आणि सामाजिक विषमतेचे जे बळी आहेत ते केल्याशिवाय राहणार नाहीत. बाबासाहेबांनी इशारा दिलेले हे गंभीर संकट वास्तवात येऊ द्यायचे नसेल, तर संविधानाच्या अडतिसाव्या कलमाने दाखवलेल्या रस्त्याने वेगाने वाटचाल करावी लागेल. भारतीय नागरिकांच्या उत्पन्नामधील तफावत कमी कमी करत राहणारी धोरणे आणण्यासाठी सरकारवर जनमताचा दबाव आणावा लागेल. शिक्षणाचा अधिकार, रोजगाराचा अधिकार, जगण्याची साधने मिळवण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत आर्थिक विषमतेला सुरूंग लावण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकणार नाही. बाबासाहेबांचे स्मरण करताना बाबासाहेबांच्या या इशाऱ्याची दखल घेतली पाहिजे, बाबासाहेबांच्या समाजवादी भूमिकांचा जोरकसपणे आग्रह धरला पाहिजे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते आहेत.)**

# काँग्रेस नेत्याने लिहिलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र



प्रा. अविनाश कोल्हे

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी अलीकडेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'आंबेडकर: ए लाईफ' हे इंग्रजीत चरित्र लिहिले आहे. या वाक्यातील 'काँग्रेसचे ज्येष्ठ नेते' हा उल्लेख महत्त्वाचा आहे. याचे कारण बाबासाहेबांनी हयातभर काँग्रेसच्या विरोधात राजकीय भूमिका घेतल्या होत्या.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाला त्यांच्या हयातीत जेवढा मानसन्मान मिळाला नाही त्यापेक्षा कितीतरी जास्त मानसन्मान त्यांना मरणोत्तर, खास करून एकविसाव्या शतकात मिळत आहे. १९९० साली त्यांना भारत सरकारने 'भारतरत्न' हा बहुमान प्रदान केला. २०१६ साली तर संयुक्त राष्ट्रसंघाने १४ एप्रिल म्हणजे बाबासाहेबांचा जन्मदिवस जागतिक पातळीवर साजरा केला होता. याचे साधे कारण म्हणजे अलीकडे बाबासाहेबांच्या कार्याचे खरे स्वरूप जगासमोर उलगडत आहे. भारताच्या आणि महाराष्ट्राच्या संदर्भात बाबासाहेबांनी दलितोद्धाराचे अलौकिक कार्य केले, हे जरी खरे असले तरी या कार्याचे योग्य आयाम आता जगासमोर यायला लागले आहेत. ते म्हणजे, जगातील जवळपास सर्व समाजात दोन वर्ग आढळतात. 'आहे रे' आणि 'नाही रे' या दोन वर्गात जग विभागलेले दिसते. बाबासाहेबांचे विचार, त्यांनी केलेले लेखन, त्यांनी लढवलेले सामाजिक न्यायाचे लढे, आज जगभरच्या 'नाही रे' वर्गाला लढण्याची प्रेरणा देत आहे. 'नाही रे' वर्गाच्या संदर्भात आजही जगात एकही देश असा नाही, की ज्या देशाला 'आदर्श देश' म्हणता येईल. अनेक लोकांना अमेरिका हा आदर्श देश वाटतो. पण तेथील कृष्णवर्णीय समाजाची स्थिती बघितली, तर आपल्याला वेगळीच अमेरिका दिसते. २५ मे २०२० रोजी जॉर्ज फ्लॉईड या ४४ वर्षांच्या कृष्णवर्णीय माणसाला मिनियापोलिस येथील डेरेक चौव्हिन या पोलिस अधिकाऱ्याने मानेवर गुडघा ठेऊन दिवसाढवळ्या मारून टाकले. फ्लॉईडवर खोट्या नोटा खपवल्याचा प्रयत्न केल्याचा संशय होता. आजही अमेरिकेत फ्लॉईडसारख्या घटना घडत असतात. म्हणूनच बाबासाहेबांनी 'नाही रे' वर्गाला दिलेला संदेश महत्त्वाचा ठरतो.




**बाबासाहेबांनी हयातभर काँग्रेसच्या विरोधात राजकीय भूमिका घेतल्या**

ज्या पाश्चात्य जगतात अशा घटना घडतात, त्याच पाश्चात्यांच्या बौद्धिक जगतात नेपोलियन, जॉन केनेडी वगैरे महामानवांची दर दहा-पंधरा वर्षांनी नवीन चरित्रं लिहिली जातात. दर दहा-पंधरा वर्षांनी नवीन पुरावे, नवीन माहिती समोर येते. त्या प्रकाशात महामानवांच्या कार्याचे पुनर्मूल्यमापन होत असते. भारतात आता हा प्रकार सुरू झाला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी अलीकडेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'आंबेडकर: ए लाईफ' हे इंग्रजीत चरित्र लिहिले आहे. या वाक्यातील 'काँग्रेसचे ज्येष्ठ नेते' हा उल्लेख महत्त्वाचा आहे. याचे कारण बाबासाहेबांनी हयातभर काँग्रेसच्या विरोधात राजकीय भूमिका घेतल्या होत्या. विसाव्या शतकातील दलित आणि ब्राह्मणेतरांच्या राजकारणाचा विचार केला तर असे दिसते, की उत्तर भारतातील बाबू जगजीवनराम (१९०८- १९८६) यांनी काँग्रेसमध्ये राहून राजकारण केले. दक्षिणेत रामसामी नायकर (१८७९-१९७३) यांनी सुरुवातीला काँग्रेसमध्ये, तर नंतर काँग्रेसबाहेर पडून राजकारण केले. मात्र डॉ. आंबेडकरांनी (१८९१-१९५६) शेवटपर्यंत काँग्रेसच्या, त्यातही गांधीजींच्या विरोधात भूमिका घेतल्या होत्या.

**बाबासाहेबांच्या कार्याच्या लेखाजोख्याचा पुरावा म्हणजे हे चरित्र**

डॉ. आंबेडकरांचे जीवन बहुआयामी होते. त्यांची विद्वत्ता, त्यांचे लेखन, त्यांचे घटना समितीतील योगदान, त्यांचे समाजकारण, त्यांची पत्रकारिता, त्यांनी केलेल्या सामाजिक न्यायाच्या चळवळी,

स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्था आणि सर्वात शेवटी म्हणजे त्यांनी ऑक्टोबर १९५६ मध्ये केलेले धर्मांतर वगैरे अनेक घटनांनी भरलेल्या जीवनाबद्दल एकविसाव्या शतकात आणि तेसुद्धा अवघ्या दोनशे पानांत मांडणे हे एक वेगळेच आव्हान आहे. हे आव्हान शशी थरूरांनी पेलले आहे. मुख्य म्हणजे त्यांनी सोप्या इंग्रजीत चरित्र लिहिले आहे. अन्यथा 'थरूरांचं इंग्रजी' हा और प्रकार आहे. थरूरांनी हे चरित्र भारतीय जनतेला अर्पण केले आहे. To the people of India, to whom Ambedkar gave so much that we are yet to fully बाबासाहेबांनी आपल्याला काय दिले याचा अंदाज अजूनही आपल्याला आलेला नाही, हे निरीक्षण अंतर्मुख करणारे आहे. आता बाबासाहेबांकडे अनेक अभ्यासकांचे लक्ष गेलेले आहे आणि आजही बाबासाहेबांच्या कार्याचा लेखाजोखा मांडावा लागतो, याचा पुरावा म्हणजे हे चरित्र.

**या घटनेतील नाट्य नीट समजून घेतले पाहिजे!**

या छोटेखानी चरित्रात एकूण सहा प्रकरणं आहेत. यातील पहिल्या पाच प्रकरणांत लेखकाने बाबासाहेबांच्या जीवनाचा वेध घेतला आहे, तर सहाव्या प्रकरणात बाबासाहेबांच्या वैचारिक वारशाची चर्चा केली आहे. डॉ. आंबेडकरांचा जीवनपट एव्हाना सर्वांना माहीत आहे. जून १९१३ मध्ये बाबासाहेबांना बडोद्याच्या महाराजांनी शिष्यवृत्ती देऊन अमेरिकेला उच्चशिक्षणासाठी पाठवले. ही घटना अनेक अर्थांनी अभूतपूर्व होती. आजपासून ११० वर्षांपूर्वी एक दलित समाजातला तरुण उच्चशिक्षणासाठी कोलंबिया विद्यापीठात दाखल होतो, या घटनेतील नाट्य नीट समजून घेतले पाहिजे. थरूर नमूद करतात त्याप्रमाणे, तेथे बाबासाहेबांनी मे १९१६ मध्ये Castes in India : Their genesis, mechanism and development या विषयावर शोधनिबंध सादर केला. पुढे हाच विषय त्यांच्या व्यासंगाचा झाला. बाबासाहेब तेथे शिकत असताना लाला लजपत राय 'इंडियन होम रूल'च्या वतीने अमेरिकेत भाषणं देत होते. बाबासाहेबांनी त्यांचे एक भाषण ऐकले. बाबासाहेबांनी त्यांना भारतातील दलितांच्या समस्येबद्दल विचारले असता लालाजींनी उत्तर दिले, की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अशा समस्यांचा विचार करता येईल. या उत्तराने बाबासाहेबांचे समाधान झाले नाही आणि नंतर बाबासाहेबांनी या चळवळीतून अंग काढून घेतले (पृ.१३). हा प्रसंग काळजीपूर्वक समजून घेतला तर असे दिसते, की इथेच बाबासाहेबांच्या आगामी कार्याचा आणि राष्ट्रीय चळवळीशी त्यांच्या असलेल्या मतभेदांचा उगम दिसतो. १९१८-१९१९ दरम्यान इंग्रज सरकारने भारतातील सुधारणांसाठी साऊथबरो समिती पाठवली होती. तेव्हा बाबासाहेब मुंबईच्या सिडेनहॅम महाविद्यालयात शिकवत होते. त्यांनी २७ जानेवारी १९१९ रोजी या कमिटीपुढे स्वतःची भूमिका मांडली आणि अस्पृश्यांसाठी विभक्त मतदारसंघाची मागणी केली. हीच मागणी १९३२ साली झालेल्या पुणे कराराच्या केंद्रस्थानी होती.

**बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना**

थरूर यांनी लिहिलेल्या चरित्राकडे 'बाबासाहेबांचे बौद्धिक चरित्र' या नजरेने बघितले पाहिजे. ९ मार्च १९२४ रोजी मुंबईत बाबासाहेबांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. बाबासाहेबांचा समाजजीवनातील वावर इथून सुरू झाला. याबद्दल थरूर लिहितात, की ही संस्था आणि अशा प्रकारचे दलितोद्धाराचे कार्य करणाऱ्या इतर संस्था, यांच्यात मूलभूत फरक होता. बाबासाहेबांच्या मते, इतर संस्था वरवरचे कार्य करत होत्या, त्यांचे कार्य मलमपट्टीसारखे होते. यामुळे मूलभूत बदल होणार नव्हता.' (पृ.३२) खरं तर इथूनच बाबासाहेबांच्या विचारांचे वेगळेपण अधोरेखित होते. इंग्रज सरकारनेसुद्धा बाबासाहेबांच्या कार्याची दखल घ्यायला सुरुवात केली आणि जानेवारी १९२७ मध्ये त्यांना मुंबई प्रांताच्या विधिमंडळावर नेमले. बाबासाहेबांनी एप्रिल १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले. थरूरांनी अनेक ठिकाणी इतरत्र पसरलेली माहिती एका सूत्रांत गुंफून वाचकांसमोर ठेवली आहे. उदाहरणार्थ, बाबासाहेबांच्या १९२७ सालच्या महाड सत्याग्रहाअगोदर दक्षिण भारतातील त्रावणकोर संस्थानात वायकोम येथे दलितांनी मंदिर प्रवेशासाठी मार्च १९२४ मध्ये सत्याग्रह केला होता (पृ.४०). अशा तपशिलांमुळे दलितोद्धाराच्या चळवळीचे देशव्यापी स्वरूप समोर येते.

**काळाराम मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह**

बाबासाहेबांचे नेतृत्व आधुनिक विचारसरणीवर आधारलेले होते. १९२८ सालच्या सुरुवातीला ते अस्पृश्य समाजाच्या एका परिषदेचे अध्यक्ष होते. बैठकीत महार समाजातील नामवंत संत चोखामेळाचे मोठे मंदिर बांधण्याबद्दल चर्चा झाली. या बैठकीत बाबासाहेबांनी वेगळे मंदिर बांधायला विरोध केला. अशा प्रकारे आपण वेगळी मंदिरं बांधली, तर अस्पृश्यता कधीच संपणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. यापेक्षा आपण मंदिरप्रवेशासाठी लढले पाहिजे, असा बाबासाहेबांचा आग्रह होता. परिणामी असे मोठे मंदिर बांधण्याची योजना रद्द झाली. पुढे १९३० साली बाबासाहेबांनी नाशिक येथे काळाराम मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह केला.

**...म्हणूनच मग बाबासाहेबांनी सायमन कमिशनला सहकार्य केले**

याच काळात बाबासाहेबांच्या जीवनातील महत्त्वाची घटना घडली. जून १९२८ मध्ये बाबासाहेब मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजमध्ये शिकवायला लागले. त्याच महिन्यात मुंबईत सायमन कमिशनचे आगमन झाले. या कमिशनवर काँग्रेसने बहिष्कार घातला होता. देशात सर्वत्र 'सायमन, गो बॅक'च्या घोषणा ऐकू येत होत्या. थरूर यांनी या अगोदर देशातील राजकीय वातावरणाचा अचूक वेध घेतला आहे. १९१८ साली संपलेल्या पहिल्या महायुद्धानंतर इंग्रज सरकारने भारतीय समाजाच्या अपेक्षा पूर्ण केल्या तर नाहीच, उलट १९१९ साली रौलॅट कायद्यासारखा कायदा केला. दुसरीकडे, १९२८ साली मोतीलाल नेहरू समितीने एका अहवालातून भारताची राज्यघटना बनवली होती. या राज्यघटनेत मुस्लिमांच्या हितसंबंधांचे रक्षण केले होते. पण दलित समाजासाठी काहीही तरतुदी नव्हत्या (पृ.४६). यामुळे 'काँग्रेस म्हणजे उच्चवर्णीय हिंदूंचा पक्ष' हा बाबासाहेबांचा आरोप खरा ठरला. म्हणूनच मग बाबासाहेबांनी सायमन कमिशनला सहकार्य करण्याचे ठरवले.

**सार्वभौम सत्ता जनतेकडे असते, संस्थानिकांकडे नाही**

देशात गोलमेज परिषदांचे वातावरण असताना बाबासाहेब आणि महात्माजींची पहिली भेट मुंबईत १४ ऑगस्ट १९३१ रोजी

झाली. थरूर नमूद करतात त्याप्रमाणे, ही भेट यशस्वी झाली नाही (पृ.५६). दोघांनी एकमेकांचे मतपरिवर्तन करण्याचे प्रयत्न केले; पण व्यर्थ. लेखकाने गोलमेज परिषदेदरम्यान घडलेला एक प्रसंग नमूद केला आहे, ज्यातून बाबासाहेबांचे लोकशाहीप्रेम ठसठशीतपणे व्यक्त होते. परिषदेत बिकानेरचे महाराज सर गंगा सिंग म्हणाले, की काँग्रेसने संस्थानिकांना गृहीत धरू नये. यावर बाबासाहेबांनी ठणकावून सांगितले, की आधुनिक काळात सार्वभौम सत्ता जनतेकडे असते, संस्थानिकांकडे नाही.

**भारतातील खरा लढा ब्राह्मणवाद आणि बुद्ध यांच्यात**

याच काळात बाबासाहेब हिंदू धर्माच्या विरोधात जाहीरपणे टीका करत होते. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी बाबासाहेबांनी येवला येथे केलेल्या भाषणात 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही,' असे जाहीर केले होते. त्याच काळात मसूरकर महाराजांनी दहा हजार कॅथॉलिक ख्रिश्चनांना हिंदू धर्मात परत आणले होते (पृ.७७). बाबासाहेबांनी मसूरकर महाराजांना हिंदूंनी अस्पृश्यता निवारणाचा कालबद्ध कार्यक्रम देण्याचे आवाहन केले. यानंतर मे १९३६ मध्ये बाबासाहेबांचे 'ॲन्हिलेशन ऑफ कास्ट' प्रसिद्ध झाले. हिंदूंच्या मानसिकतेत फरक न पडल्याने बाबासाहेबांनी ऑक्टोबर १९५६ मध्ये सामूहिक धर्मांतर केले.

जुलै १९४६ मध्ये झालेल्या घटना समितीसाठीच्या निवडणुकांत बाबासाहेब मुंबई इलाख्यातून पराभूत झाले, तरी बंगाल प्रांतातून मुस्लिम लीगच्या पाठिंब्यावर निवडून आले (पृ.१०३). येथून बाबासाहेबांचा घटना समितीतील प्रवास आणि योगदान सुरू झाले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी घटना समितीने मसुदा समिती स्थापन केली आणि तिचे अध्यक्षपद बाबासाहेबांना देण्यात आले. याच काळात म्हणजे १९४६ साली बाबासाहेबांचा 'शुद्र पूर्वी कोण होते?' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. बाबासाहेबांनी हा ग्रंथ महात्मा फुल्यांना अर्पण केला. यात बाबासाहेबांनी 'आर्यांच्या आक्रमणाचा सिद्धांत' अमान्य केला आणि भारतातील खरा लढा ब्राह्मणवाद आणि बुद्ध यांच्यात आहे, या लढ्यातून अस्पृश्यतेचा जन्म झाला, अशी मांडणी केली.

**डॉ. बाबासाहेबांच्या कार्यातील चार उणिवांची चर्चा**

थरूरांच्या पुस्तकाचा दखलपात्र भाग म्हणजे त्यांनी उत्तरार्धात बाबासाहेबांच्या कार्यातील चार उणिवांची (flaws) चर्चा केली आहे. पहिली म्हणजे बाबासाहेबांनी आदिवासी समाजाकडे सहानुभूतीनं बघितलं नाही (पृ.१७१). ६ मार्च १९४५ रोजी मुंबईत भरलेल्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या अधिवेशनातल्या भाषणात बाबासाहेब म्हणाले होते, Aboriginal Tribes have not as yet developed any political sense to make the best use of their political opportunities and they may easily become mere instruments in the hands of either a majority or a minority. बाबासाहेबांच्या मांडणीतील दुसरी उणीव दाखवतांना थरूरांनी प्रा. भिखू पारेख यांची साक्ष काढली आहे. बाबासाहेबांनी 'हिंदू धर्म' आणि 'हिंदू समाज' एकच आहेत, असे गृहीत धरून हिंदू धर्मावर कडवट टिका केली. यामुळे जातीव्यवस्था न मानणारे, पुरोगामी विचारांचे असंख्य हिंदू व्यक्ती बाबासाहेबांच्या विचारविश्वात येऊ शकल्या नाहीत (पृ.१७३). तिसरी उणीव म्हणजे गांधीजींच्या विचारांचा सामना करताना बाबासाहेब गांधीजींशी व्यक्तीगत वैर असल्यासारखे वागले. गांधीजींचा खून झाल्यानंतर बाबासाहेबांनी काहीही प्रतिक्रिया दिली नाही. चौथी उणीव म्हणजे सामाजिक-आर्थिक बदलांसाठी बाबासाहेबांचा शासनव्यवस्थेवर असलेला विश्वास. यथावकाश हा विश्वास अनाठायी असल्याचे सिद्ध झाले. असे असले तरी, ज्या काळात बाबासाहेबांचा विश्वास शासनव्यवस्थेवर होता तो काळ समजून घेतला पाहिजे. ऑक्टोबर १९१७ मध्ये रशियात कामगारक्रांती झाली. यामुळे जागतिक पातळीवर खळबळ माजली. या क्रांतीनंतर सत्ता घेतलेल्या सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाने देशात अभूतपूर्व प्रगती केली. १९२७ साली या क्रांतीला दशक पूर्ण झाले. त्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमांना पंडित नेहरू आमंत्रित होते. त्यांनी रशियाने शासनव्यवस्थेच्या माध्यमातून केलेली प्रगती बघितली आणि जाहीर केले, की जेव्हा भारत स्वतंत्र होईल तेव्हा आम्हीसुद्धा रशियाचे विकासाचे प्रारूप वापरू. अशा वातावरणात बाबासाहेबांनी जर शासनव्यवस्थेवर विश्वास दाखवला, तर त्यात फारसे चुकले नाही. आज २०२३ मध्ये जर बाबासाहेब असते तर वेगळी मांडणी केली असती. आजच्या भारतात बाबासाहेबांना सर्वपक्षीय मान्यता मिळालेली आहे. भाजपासारखा हिंदुत्व प्रमाण मानणारा पक्ष तर बाबासाहेबांचा सतत उदोउदो करत असतो. थरूर नमूद करतात त्याप्रमाणे, २०२२ साली पंजाबात सत्तेत आलेल्या आम आदमी पक्षाने सरकारी कार्यालयात शहीद भगतसिंग आणि बाबासाहेबांचे फोटो लावण्याचा हुकुम काढला (पृ.१८०).

थरूरांनी बाबासाहेबांच्या योगदानाकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून बघितले आहे. म्हणूनच ते पुस्तकाच्या शेवटी नोंदवतात, की बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कार्याची थोरवी भारतीयांनाच नव्हे, तर जगातील अनेकांना पटली आहे. प्रा. पारेख यांच्या मते, अमेरिकेतील कृष्णवर्णीयांचे नेते डॉ. मार्टिन ल्युथर किंग (ज्युनियर) आणि बाबासाहेब यांची तुलना केली, तर बाबासाहेब फार मोठे नेते ठरतात (पृ.१८४). असे असले तरी, आजही भारतातील दलितांची अवस्था वाईट आहे. थरूर २९ सप्टेंबर २००६ रोजी भोतमांगे कुटुंबावर झालेल्या हल्ल्याचा उल्लेख करतात. याशिका दत्त या लेखिकेच्या लेखातील एक उल्लेख अंजन घालतो Our Dalitness is imprinted onto us through the burn bodies of our children, suicides of our PhD scholars and college students, rapes of young girls and women, asphyxiation of our manual scavengers and 'honour killings' of lovers (पृ. १९६). अशा प्रकारे थरूर बाबासाहेबांच्या चरित्राच्या शेवटी आजच्या भारतात दलितांची स्थिती काय आहे, हे वाचकांसमोर आणतात. म्हणून ते चरित्र महत्त्वाचे ठरते. माझ्या मते, थरूर यांनी लिहिलेल्या चरित्रातील महत्त्वाची उणीव म्हणजे त्यांनी 'आंबेडकरपूर्व दलित चळवळीचा उल्लेखही केला नाही. असे असले तरी बाबासाहेबांच्या कार्याचा अभ्यास करणाऱ्यांसाठी हे महत्त्वाचे चरित्र आहे. ●●●

**(लेखक राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत)**

# बहुजनांनी संघाच्या षड्यंत्रापासून सावध राहावे



उल्का महाजन

**हा देश जातीयवाद्यांनी शिवरायांच्या व भीमरायांच्या स्वप्नापासून खूप लांब न्यायचा प्रयत्न चालवला आहे. भारतीय जनता पक्ष व त्यांची मूळ संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या राजवटीत लोकशाहीचे खच्चीकरण सुरू आहे. संविधान त्यांना कधीच मान्य नव्हते. त्यामुळे मनुस्मृतीचे पुनरुज्जीवन करणे सुरू आहे. बहुजनांना गुलामगिरीकडे नेणारा हा प्रवास थांबवायचा असेल, तर तरूण पिढीला, कष्टकरी समाजाला, जाणत्या नागरिकांना जागवायचे खूप प्रयत्न करायला हवेत. शिवराय, भीमराय व पुरोगामी परंपरेतील अनेक दीपस्तंभांच्या प्रकाशात पुन्हा एकदा वाटा रुंदावायला हव्यात. आपल्या पिढीची ती जबाबदारी आहे.**

रायगड जिल्ह्यात आमच्या कामाला सुरुवात झाली १९९० पासून. 'सर्वहारा जनआंदोलन' या संघटनेची स्थापना करून काही निवडक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने जिल्ह्यातील सर्वात शोषित वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी लढा उभारणे हे प्रमुख उद्दिष्ट ठरले. त्या शोषित समाजघटकांमध्ये प्रामुख्याने होते, आदिवासी व दलित तसेच भटके विमुक्त.

जिल्ह्याला पार्श्वभूमी दोन दीपस्तंभरूपी महान व्यक्तिमत्वांच्या कर्तृत्वाची. एक शिवराय, दुसरे भीमराय. त्याच विचारांच्या प्रकाशात वाटचाल करायचे ठरले.

संघटनेत एखाद्या निश्चित विचारधारेचा परिवार वा पार्श्वभूमी असलेले माझ्यासकट कोणीही नाही. आम्ही सगळेच आमच्या जगण्याचा, आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांचा, अवतीभवतीच्या समाजाचा शोध घेत एकत्र आलो. एकमेकांच्या जगण्याचा सन्मान, अन्याय/शोषणाविरुद्ध लढण्याची भावना, चिकाटी आणि प्रामाणिकपणे शोध घेण्याची तयारी, हेच आमच्यातले सामायिक गुण. बाकी आर्थिक, सामाजिक स्तर, पार्श्वभूमी भिन्न.

### कट्टरवादी न होता चिकित्सक राहता आले पाहिजे

समाज समजून घ्यायला काही आधार लागतात, त्यामध्ये जे प्रश्न असतात ते का असतात, गरिबी का आहे, ती पिढ्यान्‌पिढ्या दूर का होत नाही? समाजव्यवस्था बदलल्याशिवाय ते प्रश्न दूर होऊ शकतात का? मग तो समाज, ती व्यवस्था कशी बदलायची, त्याची दिशा ठरवायला, त्यातील घडामोडी समजून घ्यायला काही आयुधे लागतात. म्हणून वैचारिक बैठक असायला हवी याबाबतीत सर्वांमध्ये एकवाक्यता होती. पण तो एक विचारवाद असायला हवा का आणि तो कोणता, यावर चर्चा होत असे. त्यातून आणखी एका गोष्टीवर सहमती होती, ती म्हणजे जग झपाट्याने बदलतंय. ते समजून घ्यायचं असेल तर कट्टरवादी न होता चिकित्सक राहता आले पाहिजे.

### बुजुर्गांचा हा सल्ला आम्ही स्वीकारला

संघटनेची सुरुवात झाली ते वर्ष होतं १९९०. याच काळात व्यवस्थाबदलाचा, शोषणमुक्तीचा, जगातील एक महत्त्वाचा प्रयोग- सोव्हिएट रशिया कोसळत होता. कष्टकऱ्यांच्या राज्याचे स्वप्न कोसळत होते. मुक्त अर्थव्यवस्थेचे वारे वाहू लागले होते. समाजवादावर आधारलेली चीनची राज्यव्यवस्थापण नव्या भांडवली वळणावर होती. सामाजिक, राजकीय विचारविश्वात प्रचंड घुसळण चालू होती. अशा वातावरणात एका विचारधारेचा चष्मा लावून जगाकडे पाहण्यापेक्षा जे जे काही समतावादी, पुरोगामी असेल त्याची शिदोरी बनवावी व शोधक, चिकित्सक रहावे हा या बुजुर्गांचा सल्ला आम्ही स्वीकारला. मग प्रत्यक्ष समाजात विविध प्रश्नांचा सामना करताना, वाचन, अभ्यासवर्ग, शिबिरे यातून अनेक तुकडे, धागेदोरे सापडत गेले. त्यातून काही प्रमाणात वैचारिक बैठक तयार होत गेली.

सामाजिक, राजकीय कामाच्या प्रेरणा या फक्त समाजातील दुःखावर, वेदनेवर स्वार होऊन चालत नाहीत. त्यांना विचारांची, विश्लेषणाची, प्रश्न सोडवणाऱ्या, मार्ग काढणाऱ्या बुद्धीमत्तेची जोड लागते हे कळत गेलं. गरिबी ही केवळ गरिबांच्या हातात आर्थिक साधन नसण्याचा प्रश्न नसतो, तर पिढ्यान्‌पिढ्या विषमता राखणाऱ्या शोषणव्यवस्थेचा तो परिणाम असतो. त्यामधे हितसंबंधांची व सत्तासंबंधांची बांधणी असते.

### ...हे हळूहळू कळत गेले

ही शोषणव्यवस्था कशी तयार होत गेली, तिचे ऐतिहासिक स्वरूप काय, हे समजून घ्यायला मार्क्सवादाचा गाढा अभ्यास जमला नाही तरी ओळख तरी हवी, हे जाणवलं. भारतीय संदर्भात ही विषमता व त्याची पाळंमुळं समजून घ्यायची असतील, तर महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांचे विचार, चिंतन, विश्लेषण व त्यांनी अभ्यासलेले मार्ग समजून घ्यायला हवेत. गुलामी मानसिकतेवर मात करण्याच्या

व खरे रयतेचे राज्य उभारण्याच्या प्रेरणा जागवायच्या असतील, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचा लढा अभ्यासावा लागेल, आदिवासी समाजाने स्वकीय व परकीय सत्तेविरोधी दिलेले चिकाटीचे व लढाऊ संघर्ष समजून घ्यायला बिरसा मुंडा व अनेक आदिवासी वीरांचा इतिहास समजून घ्यावा लागेल आणि आजच्या काळात गुलामगिरी व अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आणि उद्याच्या शांततामय समाजासाठी, शाश्वत पर्यावरण व जीवनासाठी गांधीजींच्या अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गावर चालावे लागेल, हे हळूहळू कळत गेले. या विचारधारांमध्ये असणारे विरोधाभास, द्वंद्व हे प्रत्यक्ष अनुभवांच्या कसोटीवर तपासून बघावे लागतील, ज्येष्ठांच्या मदतीने ते उलगडावे लागतील. पण त्या वादांमध्ये अडकून न पडता तो एक प्रवास असेल, हे आम्ही स्वीकारलं. समतेच्या वाटेवरले हे सर्व आमच्यासाठी दीपस्तंभाप्रमाणे होते. त्या वाटेवर प्रत्यक्ष झटलेले अनेक दिग्गज मग भेटत गेले ज्यामध्ये विठ्ठल रामजी शिंदे, गाडगे बाबा, संत बहिणाबाई, आगरकर, कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, शाहीर अण्णा भाऊ साठे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, साने गुरुजी असे अनेक जण. महाराष्ट्रात तर ही मोठी परंपरा आहे. आधुनिक जगातील पर्यावरणवाद, स्त्रीवाद, पर्यायी विकासनीती याची त्यात भर पडत गेली.

**महाराष्ट्रात समतावादी परिवर्तक तीन किल्ल्यांत विभागले गेले**

एका बाजूला शिका, संघटित व्हा, संघर्ष करा आणि खरा मुद्दा जग बदलण्याचा आहे ही दिशा, तर दुसऱ्या बाजूला सत्य, सुंदर, निर्मळाची नित्य हो आराधना ही भावना, या दोन्हींची भुरळ पडली. हे थोडे विरळा समीकरण होते. कारण देशात व प्रामुख्याने महाराष्ट्रात समतावादी परिवर्तक तीन किल्ल्यांत विभागले गेले आहेत. मार्क्सवादी, फुले-आंबेडकरवादी आणि गांधी विनोबावादी. चौथा गट माफुआवादी आहे. पण त्यांचे व पहिल्या दोन्ही गटांचे गांधीविचाराशी जमत नाही. आम्हाला गांधीजी पण अनेक बाबतीत पटत होते. मुद्दा जग बदलण्याचा तर होताच, त्या वाटेवर आपला खारीचा वाटा प्रामाणिकपणे व निश्चित दिशेत उचलायचा होता. कृतिशील व्हायचे होते.

मार्क्सची मांडणी इतिहासाचे विश्लेषण करते. त्यांनी मानवी जगाच्या इतिहासाचा उलगडा श्रमिकांच्या हक्क व शोषणाच्या परिप्रेक्ष्यातून वर्गव्यवस्थेची उकल करत केलेला आहे. फुले, आंबेडकरदेखील भारतीयसंदर्भात जातीय उतरंडीची व विषमतेची नेमकी व ऐतिहासिक मांडणी करतात. तर गांधीजींच्या इतिहासाचे भान त्यांच्या कृतीतून दिसते. गांधीजी त्यांच्या कृतीतूनच बोलतात.

आम्हाला गांधी-आंबेडकरवाद समजून घ्यायचा होता; पण त्यात अडकायचे नव्हते. त्या दोन्ही महापुरुषांच्या त्यांच्या त्यांच्या सामाजिक स्थानावरून व्यक्त होणाऱ्या भूमिका, त्यामागचा अनुभव, चिंतन व भारतीय समाजाला समानतेच्या वाटेवर नेण्याची प्रामाणिक आस हे त्यांच्या हेतूंबद्दल शंका न घेता समजून घ्यायचे होते.

**प्रश्न हे विचारांचे वाहक असतात**

सर्वात शोषित घटकांचा जीवनसंघर्ष उभारत शोषणाविरुद्ध टक्कर घेण्याची ताकद उभारणारी जनसंघटना असे संघटनेचे स्वरूप निश्चित झाले. ज्या प्रश्नांवर आम्ही लढलो, लढत आहोत त्या प्रश्नांची निवड करण्यासाठीदेखील ही वैचारिक बैठक आवश्यक आहे. प्रश्न हे विचारांचे वाहक असतात व त्यांवर लढण्याची प्रक्रिया हीदेखील विचारांची वाहक व्हायला हवी, हे भान येत गेले. त्यातून आमच्या कामाच्या पद्धती तयार होत गेल्या. प्रश्न मांडण्याची पद्धत, विश्लेषण, त्याला हात घालण्याची पद्धत, प्रश्नावरचा तुम्ही मांडत असलेला उपाय, त्यावर करायचे जनजागरण, लढण्याची रणनीती हे सारंच तुमच्या वैचारिक बैठकीवर अवलंबून असतं. यातून तुमची भूमिका निश्चित होत असते.

भारतीय समाजात सनातन्यांकडून व प्रस्थापितांकडून सातत्याने नाकारली, हिणवली गेलेली व प्रसंगी हल्ले करून संपवण्याचे प्रयत्न करण्यात आलेली परंपरा म्हणजे चिकित्सेची. कोणतीही वैचारिक का होईना परंपरा प्रस्थापित झाली, की ती चिकित्सा नाकारते, असे सातत्याने दिसून आले आहे. वरील सर्व विचारधारांच्या पायाशी ही चिकित्सक वृत्ती नसेल, तर आधुनिकता व खरी लोकशाही अस्तित्वात येणे व टिकणे शक्य नाही, हे भान आम्हाला आमच्या बरोबर असणाऱ्या सल्लागार मंडळींनी सतत दिले. चिकित्सेची चार्वाकाची, बुद्धाची, तुकारामाची परंपरा अभ्यासणे त्यामुळे अनिवार्य ठरते.

आम्ही ज्या प्रश्नांना हात घातला ते या विचारांच्या दिशेत समोर आले. त्यात जमीन, जंगलावरच्या हक्काचे प्रश्न होते. हाताला काम व कामाला दाम म्हणजे न्याय्य मजुरी मिळण्याचे होते. आदिवासी, दलित बांधवांवर, महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे होते, मूलभूत सुविधांचे होते. सरकारी योजनांमधून केल्या जाणाऱ्या वंचनेचे, भ्रष्टाचाराचे होते. प्रस्थापितांनी या कष्टकरी वर्गाच्या जगण्यावर केलेल्या आक्रमणाचे होते. पण सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता आत्मसन्मानाचा. तो जागवत, संविधानिक अधिकारांशी त्याची सांगड घालत आम्हाला पुढे सरकायचे होते.

**अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये**
**दाखल झालेला पहिला गुन्हा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या खोतीविरोधी लढ्यानंतरही इतक्या दशकांनंतर गावकुसाबाहेरील अनेक कुळांना कसत्या जमिनीवर हक्क मिळालेला नव्हता. चवदार तळ्याचा सत्याग्रह होऊन पासष्ट वर्षे झाली, तरी महाडपासून तीस कि.मी. अंतरावर असणाऱ्या गावात पाणवठे खुले झाले नव्हते. या मोहिमांना सुरुवात झाली. पहिला पाणवठ्याचा लढा माणगाव तालुक्यातील पळसगावचा. दळी जमिनींच्या प्रश्नावर मिटींग घेण्यासाठी या गावातील बौद्धवाडीवर गेलो असताना बाबासाहेबांच्या विचारांबाबत खूप चर्चा झाली. तरुण वर्ग ऐकत होता. या मिटिंगनंतर पंधरा दिवसात बौद्ध ग्रामस्थांना गावातील सवर्ण पुढाऱ्यांनी, सरपंचांनी मिटिंगसाठी बोलावले.

तुम्ही पूर्वीच्या रूढीने चालाल तर गावात राहता येईल, गाव बैठकांमधे बसता येईल. पुढाऱ्यांनी थेट विषयाला हात घातला. बरीच खडाजंगी झाली. बौद्धवाडीतले ज्येष्ठ दबून होते. पण तरुणांनी वाद घातला. दुसऱ्या दिवशी सर्वजण संघटनेच्या कार्यालयात आले. तक्रार करण्यात आली. संघटनेने आवाज उठवला. पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली. पण स्थानिक आमदारांनी दबाव

आणला, फौजदारांनी समज देऊन प्रकरण गुंडाळले. पण आता सवर्णांमधले जातीयवादी खवळले होते. बौद्धवाडीचे पाणी, रस्ते अडवण्यात आले. धमक्या, शिवीगाळ, सुरू झाली. एका तरुणाला मारहाण झाली. मग अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये संघटनेने दाद मागितली. तेव्हा कायदा नवीन होता. फौजदारांना तर माहीत नव्हताच, जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांनापण माहीत नव्हता. मग धाव घ्यावी लागली मुंबईत डी.आय.जी. (नागरी हक्क संरक्षण) यांच्याकडे. त्यांनी विशेष पथक पाठवून गुन्हा दाखल करून घेतला. हा रायगड जिल्ह्यात या कायद्यान्वये दाखल झालेला पहिला गुन्हा.

या केसमुळे संघटनेचा दबदबा संपूर्ण परिसरात तयार झाला. पाठोपाठ आदिवासींवरील अत्याचाराचे अनेक गुन्हे दाखल झाले. त्या परिसरातील पाण्यावरील हक्काचे, पाणवठे खुले करण्याचे अनेक प्रश्न समोर आले. मग मोहीम काढून हा प्रश्न हाताळावा लागला. अनेकांनी टीका केली. नसलेले प्रश्न उकरून काढतात, समाजात तेढ निर्माण करतात असा आरोप पुरोगामी म्हणवणाऱ्या स्थानिक वर्तमानपत्राच्या संपादकांनी केला. पण त्याला सामोरे गेलो.

या प्रतिकूल काळात अनेकांची मदत मागितली, प्रत्यक्ष जाऊन भेटलो. पण गावात थेट सामना करायला सत्याग्रहात सहभागी व्हायला आले फक्त रायगड जिल्ह्याचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दादासाहेब लिमये. नंतर मुंबईतील अनेक पत्रकार मित्रांनी साथ दिली. त्यात सतीश कामत, निखिल वागळे, बंधुराज लोणे, युवराज मोहिते, साहील जोशी यांसारखे अनेक होते. या लढ्यात टिकलेले कार्यकर्ते पूर्णवेळ सहकारी झाले. चंद्रकांत गायकवाड हा तरुण तेव्हा पुढे आला. सोपान सुतार, नथुराम वाघमारे हे संघटनेत जोडले गेले.

**हा तर मानवमुक्तीचा लढा**

या सर्व कामात वैचारिक दिशा टिकवणे व संघटनेच्या सभासदांसमोर ती कायम मांडत राहण्याचे आव्हान असते. विविध उपक्रमांतून ते करत न्यावे लागते. गावशिबिरे, संविधान यात्रा, चवदार तळे सत्याग्रह दिनी, मनुस्मृती दहन दिनी सहभाग घेणे इ. विविध मोहिमा आखत राहावे लागते. त्यातील एक मोहीम शिवराय ते भीमराय समता मार्च.

संविधान जागर समितीच्या बैठकीत याबाबत चर्चा पुढे आली. ही समिती संघटना ज्या व्यापक आघाड्यांशी जोडलेली आहे त्यापैकी एक. सुरेश सावंत, उमेश कदम यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा त्यात पुढाकार आहे. राज्यातील अनेक संघटना, कार्यकर्ते त्यात एकत्र आले आहेत. महाडच्या तरुण कार्यकर्त्यांच्या वतीने नागेश जाधव याने प्रस्ताव मांडला. चवदार तळे सत्याग्रहदिनी एकाच जागेवर आंबेडकरी चळवळीतल्या विविध नेत्यांचे वेगवेगळे मंच असतात. एक विचार, तर एक मंच का नको, यासाठी प्रयत्न करायला हवेत. मग विचार केला हा दिवस फक्त दलित बांधवच मोठ्या संख्येने येऊन साजरा करतात. असे का? हा तर मानवमुक्तीचा लढा आहे. तो सर्व जातीयांनी साजरा करायला हवा. संविधानिक मूल्ये मानणाऱ्या सर्वांचा त्यात सहभाग हवा.

**'शिवराय ते भीमराय' समता मार्चची घोषणा**

मग निर्णय झाला, सत्याग्रहाची घोषणा ज्या परिषदेत करण्यात आली, त्या दिवशी म्हणजे १९ मार्चला आपण प्रयत्न करायचा सर्वांना हाक देण्याचा. त्या दिवशी वंदन करायचे या जिल्ह्यातील दोन दीपस्तंभांप्रमाणे असणाऱ्या महान व्यक्तिमत्वांना. शिवराय व भीमराय. शिवराय फक्त मराठ्यांचे नाहीत आणि भीमराय फक्त दलित वा बौद्ध बांधवांचे नाहीत. मानवमुक्तीच्या या उद्गात्यांना एकजातीय करून चालणार नाही. त्यामुळे जातीयवाद्यांचे फावते आणि घोषणा झाली शिवराय ते भीमराय समता मार्चची. दरवर्षी महाराष्ट्रातील कार्यकर्ते, संघटनांना आवाहन करून हा दिवस साजरा करायचा. सर्वजातीय, धर्मीय बांधवांना या उपक्रमांत येण्याचे आवाहन करत राहायचे.

सतराव्या शतकातील सरंजामशाहीत, लोकशाहीची संकल्पना विचारात नसताना रयतेचे राज्य स्थापन करू पाहणारे शिवाजी महाराज व आधुनिक भारताच्या उभारणीसाठी राजेशाही, सरंजामशाही संपवून समतेच्या वाटेवर लोकशाहीचा रोडमॅप संविधानाच्या रुपाने मांडणारे डॉ. भीमराव आंबेडकर. या दोन प्रेरणास्थानांना नव्या पिढीसमोर बदलत्या वास्तवात पुन्हा त्यांच्या द्रष्ट्या मांडणीसह पुढे आणत जातीयवादी शक्तींना भिडणारी ताकद उभारायची, हे आव्हान आम्ही सर्वांनी सामूहिकपणे स्वीकारले.

भल्या सकाळी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घालून, मानवंदना देऊन खाली माता जिजाऊंच्या समाधीस्थळी वंदन करून यात्रा निघते. संध्याकाळी चवदार तळ्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सत्याग्रहाची प्रेरणा जागवत तिथे भीमरायांना वंदना देत यात्रेचे सभेत रूपांतर होते.

२०१८ पासून या मोहिमेची सुरुवात झाली आहे. राज्यभरातील हजारो कार्यकर्ते, विविध जातीय, विविध धर्मीय नागरिक यात सहभागी होत आहेत. मधली दोन वर्षे यात कोविड साथीमुळे खंड पडला. पण पुन्हा जोमाने सुरुवात झाली आहे. आता याच दिवशी वेगवेगळ्या जिल्ह्यातदेखील अशाच यात्रा याच नावाने आयोजित केल्या जात आहेत. २०२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या ऐतिहासिक सत्याग्रहाला शंभर वर्षे पूर्ण होतील, तेव्हा या प्रयत्नांचे स्वरूप अधिक व्यापक व्हायला हवे, असा प्रयत्न आहे.

हा देश जातीयवाद्यांनी शिवरायांच्या व भीमरायांच्या स्वप्नापासून खूप लांब न्यायचा प्रयत्न चालवला आहे. भारतीय जनता पक्ष व त्यांची मूळ संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या राजवटीत लोकशाहीचे खच्चीकरण सुरू आहे. संविधान त्यांना कधीच मान्य नव्हते. त्यामुळे मनुस्मृतीचे पुनरुज्जीवन करणे सुरू आहे. बहुजनांना गुलामगिरीकडे नेणारा हा प्रवास थांबवायचा असेल, तर तरूण पिढीला, कष्टकरी समाजाला, जाणत्या नागरिकांना जागवायचे खूप प्रयत्न करायला हवेत. शिवराय, भीमराय व पुरोगामी परंपरेतील अनेक दीपस्तंभांच्या प्रकाशात पुन्हा एकदा वाटा रुंदावायला हव्यात. आपल्या पिढीची ती जबाबदारी आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात या संविधानविरोधी शक्ती सत्तेत आहेत. संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षात त्या सत्तेत असता कामा नयेत, असा प्रयत्न झटून करू या. ●●●

**जय शिवराय, जय भीमराय.**

**(लेखिका सामाजिक कार्यकर्त्या आहेत.)**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आदिवासी



प्रभू राजगडकर

**खरं तर, हा विषय एका दीर्घ निबंधाचा आहे. पण माझ्या अनुभवातील काही घटना-प्रसंग घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आदिवासी काय संबंध आहे, हे उलगडण्याचा प्रयत्न करतो.**

दोन वर्षांपूर्वी आम्ही बस्तरमधील नारायणपूर येथे ९ ऑगस्ट या आदिवासी दिनी होतो. नारायणपूर या जिल्ह्याच्या ठिकाणापासून २० कि.मी. अंतरावरील जंगलातील गावात 'आदिवासी दिवस' मोठ्या उत्साहाने साजरा होत होता. आजूबाजूच्या आदिवासी खेड्यांतून लोक जथ्याने येत होते. ज्या ठिकाणी आदिवासी दिवसाचा कार्यक्रम होता, तेथील मंचावर आदिवासींमधील प्रेरणा असलेल्या तसबिरी होत्या. सोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीही तसबीर होती. आदिवासी सप्तरंगी झेंड्याच्या चबुतऱ्याजवळ 'जय बिरसा-जय आदिवासी व जय भीम' रांगोळीने लिहिले होते. आदिवासींवरील पुस्तकासोबतच बाबासाहेबांवरील पुस्तकही होती. मला आनंद झाला आणि आश्चर्यही वाटले. बस्तर-नारायणपूर हे नक्षलवाद्यांचे हब म्हणून ओळखले जाते.

**प्रसंग दोन** : २०१७ मध्ये भामरागडजवळील बेजूरपल्ली या जंगलातील गावात 'आदिवासी दिवसा'चाच कार्यक्रम होता. गावाची वस्ती असेल पाचशे-सहाशे. पण या गावात पंचक्रोशीतील आदिवासी मोठ्या संख्येने हजर होते. भामरागडमधून रॅली काढण्यात आली. जेथून रॅली काढण्यात आली तेथील समाजमंदिराच्या आवारात वीर बाबुराव शेडमाके व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तसबिरी होत्या. त्यांच्या तसबिरींना अभिवादन करूनच आदिवासींनी रॅली काढली.

**प्रसंग तीन** : चाळीसगाव तालुक्यातील वडगांव या (२०१९ ला) आडमार्गाच्या गावाला आदिवासी साहित्य संमेलन होते. ग्रंथदिंडी काढण्यात आली. त्यामध्ये संविधानाची प्रत आवर्जून ठेवण्यात आली. संमेलनस्थळी आदिवासी वीरांच्या तसबिरींसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीही तसबीर होती.

**प्रसंग चार** : अलीकडेच जानेवारीमध्ये यवतमाळ येथे आदिवासी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा होता. या मेळाव्यात बिरसा मुंडा, वीर बाबुराव शेडमाके, म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा होत्या.

तुम्हाला आता थोडं मागे घेऊन जातो. १९६० चे दशक असेल. वणी (यवतमाळ) या शहरात माझं बालपण गेलं. मी वाढलो बौद्ध मोहल्ल्यात. काही चर्मकार कुटुंबे, काही मातंग, काही आदिवासी कुटुंबेही होती. या वार्डात एक विहार होते. (वणीला त्याला सोपा म्हणायचे. का माहीत नाही, पण तो कधीच पूर्ण झालेला नव्हता.) तेथे आंबेडकर जयंतीचा, बुद्ध जयंतीचा कार्यक्रम व्हायचा. आम्ही म्हणजे राजगडकर उपस्थित राहत होतो. पण मातंग, चर्मकार कधीही कनेक्ट झाल्याचे मी पाहिले नाही. आम्हाला सोडून कोणी आदिवासीही येत नसत.

या तीन-चार प्रसंगांवरून आपणास दिसून येईल, की आदिवासी समाजाच्या कार्यक्रमांमध्ये आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जागा मिळू लागली. तोपर्यंत किमान विदर्भातील गावखेड्यांमध्ये आदिवासींच्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा मला तरी कधीही दिसली नाही. आता महाराष्ट्रात आदिवासींच्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा आवर्जून दिसेल.

हे का घडलं. माझे असे निदान आहे, की बामसेफ नावाची संघटना १९८० च्या दशकात स्थापन झाली. या संघटनेने वंचित कर्मचाऱ्यांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. या संघटनेच्या एकूणच कार्यप्रणालीविषयी, त्याच्या नंतरच्या राजकीय पक्षात रुपांतर होण्याविषयी, त्यांच्या एकूणच भूमिकेविषयी मतभेद आहेत. या संघटनेने आदिवासींसह कर्मचारी जोडले. त्यांनी त्यांच्या पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगत राहिले. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करीत राहिले. त्या माध्यमातून सुशिक्षित आदिवासी कर्मचारी डॉ. बाबासाहेब जाणून घेऊ लागले. तेव्हा प्रथमतः आदिवासींच्या शिक्षित लोकांमध्ये डॉ. बाबासाहेब पोहचू लागले. बामसेफच्या सभा-संमेलनात आदिवासी कार्यकर्त्यांना बोलण्यास प्राधान्य दिले जात आहे. या प्रक्रियेतून खूप आदिवासी कार्यकर्ते घडले. त्यामधील विदर्भातील प्रमुख नाव व्यंकटेश आतराम. ते आदिवासींच्या प्रश्नांची चिकित्सा आंबेडकरी विचारव्यवहारातून करू लागले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बाबासाहेब आंबेडकर' अशी पुस्तकेही

त्यांनी लिहिली.

स्वातंत्र्याच्या तीन दशकांनंतर आंबेडकर नावाचं वादळ आदिवासींच्या दारावर धडक देऊ लागलं. आंबेडकर नावाचं तत्त्वज्ञान समजू, पाहू लागलं. असे का झाले असेल?

**...असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे**

आदिवासी आणि डॉ. आंबेडकर ही दरी राहिली, की कोणी निर्माण केली. याचे उत्तर आज आपणास शोधवे लागेल. डॉ. बाबासाहेबांच्या भारतीय राजकारणातील प्रवेशानंतर येथील जातव्यवस्था डळमळू लागली. बाबासाहेबांनी देशातील अस्पृश्यांचे प्रश्न घेऊन प्रश्न उपस्थित करणे सुरू केले. अस्पृश्य समाजाला संघटित केले. ब्रिटिश सत्तेसमोर, त्यांच्या विविध कमिशनसमोर अस्पृश्यांच्या प्रश्नांची तड लावण्याचा प्रयत्न केला. त्यांचा प्राधान्यक्रम दलित-अस्पृश्य असणे स्वाभाविक होते. पण त्यांचे आदिवासी समूहाकडे संपूर्ण दुर्लक्ष होते, असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. तसे नसते तर तिसऱ्या राउंड टेबल कॉन्फरन्सवेळी डॉ. हट्टन यांच्याशी जी चर्चा-वाद झाला, तो मुळातूनच वाचला पाहिजे. आदिवासींना मताधिकार देण्यात येणार नाही, हे जेव्हा हट्टनकडून ऐकले तेव्हा बाबासाहेब म्हणाले होते, 'भारतीय घटनेच्या कक्षेत आदिवासी लोक येऊ नयेत अशा प्रकारचीच बंधने आपण लादत आहात का?' तेव्हा हट्टन म्हणाले, 'त्याचे कारण म्हणजे आदिवासींच्या जीवनावर इतर लोकांकडून कमीत कमी हस्तक्षेप व्हावा. हा सरकारचा त्या पाठीमागचा उद्देश आहे.' तेव्हा बाबासाहेबांनी दोन मुद्दे हट्टनसमोर उपस्थित केले. एक : या वन्य लोकांनी आहे त्या वन्य पुरातन स्थितीतच राहावे व भारताच्या इतर लोकांसोबत त्यांचा कसलाच संबंध येऊ नये. दोन : या वन्य जमातीचे जीवन अशा प्रकारे घडविले पाहिजे, की त्यांचे जीवन इतर मानव समाजापासून अलग व एकलकोंडे न राहता इतर भारतीय सर्व समाजाप्रमाणे सार्वजनिक जीवनात सहभागी होतात, त्याप्रमाणे या लोकांनीही तसेच सहभागी व्हावे का!

याचा अर्थ असा निघतो, अस्पृश्यांचे प्रश्न हाताळताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आदिवासींच्या जगण्याकडेही लक्ष होते. पण आदिवासींसाठी त्यांना पूर्णपणे वेळ देता आला नाही. त्याचे कारण आपण शोधावे लागेल. त्या काळात आदिवासींचे जे नेतृत्व होते, ते बाबासाहेबांच्या संपर्कात होते का, याचाही शोध घेतला पाहिजे.

आदिवासींमधील विविध जमाती, त्यांच्या अनेक बोली, आदिवासी जंगल प्रदेशात राहत असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क, माध्यम व्यक्ती असे काही होते का. हा संशोधनाचा विषय आहे.

**त्यामुळे त्यांचे वर्गीकरण गुन्हेगारी वर्गात झाले आहे**

आदिवासी हे चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या बाहेरचे आहेत. त्यांच्या श्रद्धा-चालीरिती-सामाजिक संकेत सर्वथा भिन्न आहेत. या आदिवासींचे भारतीय समाजव्यवस्थेमध्ये नेमके स्थान काय? आजही आदिवासींकडून विचारला जाणारा हा प्रश्न आहे. त्यांच्या उत्थानासाठी तत्कालीन तथाकथित हिंदूंना जाब विचारताना ॲनिहिलेशन ऑफ कास्ट १९३६ या ऐतिहासिक निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''नुकत्याच झालेल्या चर्चेमुळे वगळलेल्या आणि अंशतः समावेश केलेल्या क्षेत्रांबाबत ज्यांना भारतात आदिवासी जमाती म्हणतात, त्यांच्या स्थितीकडे लक्ष वेधण्याचे काम केले गेले. त्यांची संख्या तेरा दशलक्षाच्या जवळपास असावी. त्यांना नव्या संविधानातून वगळणे योग्य आहे की अयोग्य, हा प्रश्न थोडा वेळ बाजूला ठेवला तरी वस्तुस्थिती अशी आहे, की हजारो वर्षे जुन्या संस्कृतीची शेखी मिरविणाऱ्यांच्या भूमीत हे लोक आणखीही आपल्या आदिम असंस्कृत अवस्थेत आहेत. ते केवळ असंस्कृत आहेत एवढेच नाही, तर त्यापैकी काही जे व्यवसाय करतात त्यामुळे त्यांचे वर्गीकरण गुन्हेगारी वर्गात झाले आहे. संस्कृतीच्या मधोमध तेरा दशलक्ष लोक अजूनही रानटी अवस्थेत आहेत आणि आनुवंशिक गुन्हेगाराचे आयुष्य जगत आहेत; परंतु हिंदूंना त्याची कधीही लाज वाटली नाही. माझ्या मते, जगात असे दुसरे उदाहरण नाही. अशा लाजिरवाण्या परिस्थितीचे कारण काय आहे? आदिवासींना सुसंस्कृत करून त्यांना अधिक सन्मानजनक व्यवसाय निवडण्याचा मार्ग दाखविण्याचे प्रयत्न का केले गेले नाहीत? आदिवासींच्या रानटीपणाला त्यांची जन्मजात मंदबुद्धी कारणीभूत आहे, असे कदाचित हिंदू म्हणतील. ते बहुधा कबुल करणार नाहीत, की आदिवासी रानटीच राहिले. कारण त्यांना सुसंस्कृत करण्यासाठी, त्यांना वैद्यकीय मदत देण्यासाठी, त्यांना सुधारण्यासाठी, त्यांना चांगले नागरिक बनविण्यासाठी हिंदूंनी काहीही प्रयत्न केले नाहीत; परंतु समजा आज ख्रिस्ती धर्मप्रसारक या आदिवासींसाठी जे करीत आहेत ते करण्याची हिंदूंची इच्छा झाली, तर तो तसे करू शकला असता का? मी नम्रतापूर्वक सांगू इच्छितो, की याचे उत्तर 'नाही' असेच आहे. आदिवासींना सुसंस्कृत करणे म्हणजे त्यांना आपले स्वतःचे म्हणून स्वीकारणे, त्यांच्यात राहणे, थोडक्यात आपलेपणाची भावना जोपासणे म्हणजे त्यांच्यावर प्रेम करणे होय. एका हिंदूला असे करणे कसे शक्य होईल? त्याचे सबंध आयुष्य म्हणजे जात जपण्याचा एक चिंतातूर प्रयत्न असतो. जात ही त्याच्यासाठी अशी मौल्यवान मिळकत आहे, की जिचे रक्षण त्याला काहीही झाले तरी केलेच पाहिजे. वैदिक काळातील, त्याला ओंगळ वाटणाऱ्या, अनार्यांचा अवशेष असलेल्या आदिवासींशी संपर्क स्थापित करून जात गमावण्याला तो मान्यता देऊ शकत नाही. हिंदूला पतीत मानवतेबद्दल त्याच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाऊ शकत नाही, असे नाही; परंतु त्यात अडचण आहे ती अशी, की कर्तव्यभावना कितीही तीव्र असली तरी ती त्याला त्यांच्या जात जपण्याच्या कर्तव्यावर मात करण्याइतपत प्रेरित करू शकत नाही. अत्यंत निर्लज्जपणे व खंतरहित भावनेने या आदिम जातींना सुसंस्कृत समाजात असंस्कृत राहू दिले, याचे खरे स्पष्टीकरणही जातीसंस्थेतच सापडते. हे आदिवासी त्यांच्यासाठी संभाव्य धोक्याचा स्रोत आहेत, याची हिंदूंना जाणीव झालेली नाही. हे रानटी लोक रानटी अवस्थेतच राहिले, तर ते हिंदूंना कदाचित नुकसान पोहोचविणार नाहीत; परंतु त्यांच्यात अहिंदूंनी सुधारणा करून त्यांना आपल्या धर्मात घेतले, तर त्यामुळे हिंदूंच्या शत्रूंच्या संख्येत मोठी भर पडेल. जर कधी असे घडले, तर त्यासाठी स्वतः हिंदू व त्यांची जातीव्यवस्थाच जबाबदार असेल.'' या दीर्घ परिच्छेदामधून आपणास त्यांचे आदिवासींविषयीचे चिंतन किती मूलगामी होते हे निदर्शनास येते. 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट'मधील हे विचार असोत किंवा जुलै १९३३ मध्ये 'जनता'च्या

अंकात भिल्ल आदिवासींविषयी व्यक्त केलेले मत असो. ओ.एच.बी. स्टार्ट यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीत सदस्य म्हणून काम करताना आदिवासींचा आलेला संपर्क व त्यामधून आदिवासींच्या समस्या जाणून घेता आल्या.

**घटनेत 'आदिवासी' शब्द न ठेवण्याबाबतची कारणमीमांसा**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना घटनेमध्ये आदिवासींसाठी केलेल्या तरतुदी जरी नजरेखालून घातल्या तरी डॉ. आंबेडकरांचा आदिवासींबाबतचा दृष्टिकोन आपणास लक्षात येईल. घटना समितीमध्ये आदिवासींचे आठ प्रतिनिधी होते. मात्र जयपाल सिंग मुंडा सोडले तर इतर सदस्यांनी चर्चेत कधीही सहभाग घेतला नाही. जसपाल सिंह मुंडा हे आदिवासींचे नेते होते. घटना समितीमधील त्यांच्या सूचना व त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उत्तरे मुळातूनच वाचली पाहिजेत. घटना समितीमधील एका चर्चेचा उल्लेख करणे अस्थायी ठरणार नाही. जयपाल सिंह मुंडा यांनी घटनेमध्ये 'आदिवासी' असावा यासाठी अत्यंत तार्किक मांडणी केली. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तेवढ्याच तार्किकपणे 'आदिवासी' शब्द न ठेवण्याबाबतची कारणमीमांसा केली आहे. बाबासाहेब म्हणतात, ''अनुसूचित वनजातियोंके प्रश्न पर यह पूछा जा सकता है, की मैंने, 'आदिवासी' के स्थान मे 'अनुसूचित' शब्द क्यो रखा। इस बात पर मेरा उत्तर यह है, जैसा की मैंने कहा है, 'अनुसूचित वनजाती' शब्द का एक निश्चित अर्थ है, क्योंकी वह वनजातीयोंको क्रमबद्ध करता है. जैसा की आप दोनों अनुच्छेदों मे पायेंगे. 'आदिवासी' शब्द वास्तव में एक सामान्य शब्द है, जिसका कोई विशिष्ट कानूनी अर्थ नही है. यह कुछ कुछ अछूत शब्द के समान है. इसका कोई निश्चित कानूनी अर्थ नही है. इसीलिए सन १९३५ के भारतीय सरकार के अधिनियम में यह आवश्यक समझा गया, की 'अछूत' शब्द का कुछ कानूनी अर्थ किया जाए और यही सुविधाजनक समझा गया, की उन जातियों को क्रमबद्ध कर दिया जाए, जो विभिन्न प्रांतों तथा क्षेत्रों में वहाँ के रहनेवालोंद्वारा अछूत समझी जाती है. आदिवासीयों के संबंध में भी यही प्रश्न उठ सकता है. आदिवासी कौन है? और यह प्रश्न संगत होगा, क्योंकी इस विधानद्वारा हम आदिवासींयो को कुछ अधिकार, कुछ विशेषाधिकार प्रदान कर रहे है. यदि यह विषय न्यायालय में प्रस्तुत होगा तो उसके लिए आदिवासी कौन है, इसकी ठीक ठीक परिभाषा होनी आवश्यक है.'' तथापि, याबाबत काही आदिवासी लेखक अद्यापही आक्षेप घेतात, असे लेखक म्हणतात, 'जमाती संकल्पना' सांस्कृतिक नाही. 'जमाती' ही संकल्पना आदिवासींच्या रक्ताच्या जन्मभूमीची, देशाची मुळीच नाही.' यावर चर्चा होऊ शकते.

भारतीय घटनेमधील कलम २४४, ३३२, ३३५, ३३८ (क), अनुसूचित जनजमाती आयोग, ३३९, ३४२ तसेच पाचवी अनुसूची हे आदिवासींच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. याच भारतीय राज्यघटनेमुळे PESA आणि वनहक्कासारखे आदिवासीला सहाय्यक कायदे मिळाले. आपण असे समजू या, की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागी अन्य कोणी घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष असते, तर आदिवासींना आज जे संरक्षण आहे ते मिळाले असते का? एक क्षण असा विचार करायला काय हरकत आहे. त्यामुळे आदिवासी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संबंध किती घनिष्ठ आहे, हे दिसून येईल.

हे निश्चित, की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्यांसाठी सर्वार्थाने झोकून देता आले, तसे आदिवासींबाबत घडले नाही. पण तशी अपेक्षा तरी का करावी? तत्कालीन आदिवासी नेतृत्व आणि त्यांनी आदिवासींसाठी केलेले कार्य, हा एक वेगळा अभ्यासाचा विषय आहे. असा अभ्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कालखंडाशी जोडून करणे व आदिवासी, त्यांचे नेते, आदिवासी चळवळ असा व्यापक पट घेऊन करता येईल.

**'आदिवासींनी आमच्याकडे यावे, आम्ही त्यांच्याकडे का जावे'?**

जाता जाता माझे काही अवलोकन. आदिवासींमध्ये ब्रिटिशांच्या आगमनानंतर ख्रिस्ती मिशनरी प्रथम गेले. त्यांनी त्यांच्या पद्धतीने दयाभाव ठेऊन काम केले. बरेच आदिवासी ख्रिस्ती झाले. यानंतर आदिवासींमध्ये काम केले ते कम्युनिस्टांनी. कम्युनिस्टांच्या लढ्यामुळे आदिवासींमध्ये आत्मभान आले, हे कबुल करावेच लागेल. भलेही त्यांचा लढा जमिनीशी आणि आर्थिक मुद्याशी होता. पण कम्युनिस्टांचे आदिवासींमधील महत्त्व अमान्य करता येणार नाही. नंतर पोहोचले ते वनवासी कल्याण आश्रमाच्या नावाने आरएसएस आणि त्यांनी आदिवासींचा चेहराच बदलण्याचे काम सुरू केले. पण डॉ. बाबासाहेबांजवळ आदिवासींबाबत जी सम्यक दृष्टी होती, ती नंतरच्या आंबेडकरी चळवळीतील कोणत्याही नेत्यामध्ये नाही. (अपवाद कदाचित असेल.) 'आदिवासींनी आमच्याकडे यावे, आम्ही त्यांच्याकडे का जावे' असे म्हणणारे पुढारीही पाहिले आहेत. खरे तर, आज आदिवासी समाजामध्ये फुले, आंबेडकरी विचारांची पेरणी अधिक होणे गरजेचे आहे. फुले, आंबेडकरी विचारच सामाजिक आणि व्यक्तिगत आयुष्य समृद्ध करू शकते. अलीकडे आदिवासींमधील नवशिक्षित आंबेडकरी विचारांची चिकित्सा करू लागला आहे. ही चिकित्सा अधिक होत राहिल्यास दऱ्याखोऱ्यातील अद्यापही अस्तित्वासाठी लढणारा आदिवासी विचाराने समृद्ध होऊन वैधानिक-संविधानिक मार्गाने आपले प्रश्न सोडवू शकेल. ही प्रकिया आंबेडकरी समूहाकडूनही तेवढ्याच गतीने होणे गरजेचे आहे.

आज देशातील सामाजिक-जातीय वातावरण आपण पाहतोच आहोत. अशा वेळी राजकारण, समाजकारण करणाऱ्या विद्वानांनी हे वातावरण बदलण्यासाठी दलित-आदिवासी-भटके-ओबीसी कसे एकत्र येतील यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. आज वनवासी कल्याण आश्रम आदिवासी समाज पोखरण्याचे काम वेगाने करत आहे. प्रत्येकजण आपापले अस्मितेचे मुद्दे टोकदार करीत आहे. अशा वेळी बाबासाहेबांची सम्यक दृष्टी आपल्या चळवळीने अंगीकारली पाहिजे.

मी अगोदरच सांगितले, की आदिवासी आणि आंबेडकर हा गंभीर अभ्यासाचा, सैद्धांतिक अभ्यासाचा विषय आहे. तशी मांडणी पुढे करण्याचा यथावकाश प्रयत्न करू. आता फक्त काही मुद्दे चर्चेसाठी आपणासमोर ठेवले आहेत. मुद्दा आहे बाबासाहेबांच्या विचारांना आदिवासींपर्यंत पोहचण्यास उशिर का झाला, हा. ●●●

**(लेखक प्रशासकीय अधिकारी असून आदिवासी मराठी काव्य परंपरेतील पहिल्या पिढीचे कवी आहेत.)**

# डॉ. आंबेडकर आणि समाजवाद



प्रसाद माधव कुलकर्णी

**डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांवर आयुष्यभर संघर्ष केला. अस्पृश्य समाजाची प्रगती हाच त्यांचा ध्यास आणि श्वास बनला होता. त्यांनी करोडो दलित मनात स्वाभिमानाची पेरणी केली. अनेक शतके उपेक्षित आणि गावकुसाबाहेर असणाऱ्या समाजात वैचारिक क्रांती केली. आर्थिक समतेच्या दिशेने जाणे त्यांना फार महत्त्वाचे वाटत होते. सामाजिक व आर्थिक स्तरावरील विषमता नष्ट करणारी धोरणे सरकारने आखली पाहिजेत, ही त्यांची भूमिका होती. हा त्यांचा समाजवाद होता.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अतिशय उत्तुंग व्यक्तिमत्व होते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, थोर प्रज्ञावंत, तत्त्वचिंतक, समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, जलतज्ज्ञ, चिकित्सक लेखक, साक्षेपी संपादक, बुजुर्ग नेते अशा विविध पैलूंनी युक्त असे ते महामानव होते. आज डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर ते शिल्पकार असलेल्या भारतीय राज्यघटनेवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे होणाऱ्या हल्ल्यांचे प्रमाण चिंताजनक पद्धतीने वाढताना दिसते आहे. सत्ताधारी वर्गच हे हल्ले करताना दिसतो आहे. त्यामुळे त्याची तीव्रता कैक पटीने वाढलेली आहे. सर्वप्रथम शुक्रवार, ता.१४ एप्रिल २०२३ रोजी असलेल्या त्यांच्या १३२ व्या जन्मदिनी विनम्र अभिवादन...!

डॉ. आंबेडकरांची बुद्धिमत्ता अफाट व अचाट होती. त्यांचे वाचन व लेखन प्रचंड होते. पंचवीस हजारांवर ग्रंथांचा व्यक्तिगत संग्रह त्यांच्याकडे होता. एन्शट इंडियन कॉमर्स (प्राचीन भारतातील व्यापार), द इव्होल्युशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया (भारताच्या राष्ट्रीय नफ्याच्या वाटा: एक ऐतिहासिक पृथक्करणात्मक अध्ययन), 'द प्रॉब्लेम ऑफ मनी' हे त्यांचे प्रबंध त्यांच्या अर्थशास्त्रीय व्यासंगाची साक्ष देतात. तसेच ॲन्हिलेशन ऑफ कास्टस, व्हॉट काँग्रेस अँड गांधी हॅव डन टु अंनटचेबल्स, हू वेअर द क्षूद्राज, द अनटचेबल्स, बुद्ध अँड हिज धम्म, थॉटस ऑन पाकिस्तान, रानडे गांधी अँड जीना, थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स आदि त्यांचे ग्रंथ त्यांच्या पांडित्याची उंची दर्शवतात. त्यांनी ग्रंथलेखन प्रामुख्याने इंग्रजीतूनच केलेले आहे. त्यांनी काढलेल्या मराठी वृत्तपत्रातून त्यांचे मराठी लेखन प्रामुख्याने दिसून येते. अर्थात, डॉ. आंबेडकरांच्या सर्व ग्रंथांची मराठी भाषांतरे उपलब्ध आहेत. या लेखात आपण आंबेडकरांचा समाजवादासंदर्भातला विचार ध्यानात घेणार आहोत.

**बुद्धाचा मार्ग अनुसरला तरच या तिन्ही गोष्टी एकत्र राहू शकतील**

डॉ. आंबेडकर यांनी 'बुद्ध की कार्ल मार्क्स' या विषयावर पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात त्यांनी बुद्धाची तत्त्वप्रणाली, कार्ल मार्क्सची तत्त्वप्रणाली यांची तुलना, साधने व त्यांचे मूल्यमापन, परिणामकारक साधने कोणती, राज्य नष्ट होणे वगैरे मुद्यांची चर्चा केली आहे. त्यांच्या मते, सर्व आश्चर्यातील आश्चर्य म्हणजे बुद्धाने



संघामध्ये हुकुमशाहीशिवाय साम्यवाद प्रस्थापित केला. तो अतिशय छोट्या प्रमाणातील साम्यवाद असेलही. पण तो हुकुमशाहीशिवाय असलेला साम्यवाद होता. हे आश्चर्य लेनिननासुद्धा करता आले नाही. समता प्रस्थापित करताना समाजाला सहभाव किंवा स्वातंत्र्याचा बळी देता येणार नाही.सहभाव व स्वातंत्र्य याशिवाय समतेला कसलाही अर्थ नाही. बुद्धाचा मार्ग अनुसरला तरच या तिन्ही गोष्टी एकत्र राहू शकतील'.

डॉ. रावसाहेब कसबे यांनी म्हटले आहे, 'डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारे बुद्ध धर्माचे स्वरूप पारंपारिक बौद्ध धर्मापेक्षा वेगळे आहे. 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात आंबेडकरांनी बुद्ध धर्माचे जे स्वरूप मानले आहे ते पूर्णपणे निरीश्वरवादी, अनात्मवादी, पुनर्जन्मविरोधी, कर्मविपाकविरोधी आणि विज्ञाननिष्ठ असे आहे. कदाचित त्यामुळे जागतिक बौद्ध संघटना या ग्रंथाला अधिकृत ग्रंथाची मान्यता देत नसाव्यात. राजकारणातील लोकशाही समाजवादी विचारांना समतेचा पुरस्कार करणाऱ्या बौद्ध धर्माचा सामाजिक पाया असेल तर लोकशाही समाजवादाचे ध्येय वास्तवात येण्यास मदत होईल, असा त्यांचा विचार होता.'

मानवतेला केवळ आर्थिक मूल्यांची आवश्यकता नाही, तर आध्यात्मिक मूल्ये टिकवून ठेवण्याचीदेखील तिला आवश्यकता आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. फ्रेंच राज्यक्रांती समता प्रस्थापित करण्यात अपयशी ठरली असे म्हणत डॉ. आंबेडकर

रशियन राज्यक्रांतीचे स्वागत करतात. पण तिला अवास्तव महत्त्व देता येणार नाही, हेही स्पष्ट करतात. क्रांतीनंतर जेव्हा कामगार वर्गाची आधिसत्ता येणार असेल तर तिचा कालखंड किती असेल? आणि कामगार वर्गाची अधिसत्ता नष्ट झाल्यावर कोणत्या प्रकारची शासन व्यवस्था येणार, असे प्रश्न डॉ. आंबेडकर मांडताना दिसतात.



**मूठभर नवकोट नारायणाची संख्या वाढते आहे**

डॉ. आंबेडकरांना सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समानता आणणारा समाजवाद अभिप्रेत होता. भारतीय घटना समितीच्या सभेत २५ नोव्हेंबर १९४९ रोजी म्हणजे राज्यघटना मंजूर होण्याच्या आदल्या दिवशी डॉ. आंबेडकर म्हणाले होते, 'भारतीय समाजात आज दोन गोष्टींची कमतरता दिसून येते आहे. त्यापैकी एक म्हणजे समता होय. सामाजिक क्षितिजावर आज स्तरात्मक असमानता आहे. त्यात काही वरिष्ठ आणि उरलेले बरेचसे कनिष्ठ पातळीवर आहेत. आर्थिक क्षितिजावर मूठभर लोक गर्भश्रीमंत आहेत, तर बहुसंख्य अतिशय दारिद्र्याने पिचलेले आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी या राज्यघटनेचा अंमल करतानाच आपण एका विरोधाभासाच्या युगात प्रवेश करणार आहोत. राजकीय क्षेत्रात सर्वत्र समता असेल, तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रात असमानता असेल. अशा विरोधात्मक परिस्थितीत आपण किती काळ राहू शकणार आहोत? किती काळ आपण सामाजिक व आर्थिक समता नाकारू शकणार आहोत? जर आपण लवकरात लवकर विरोधाभासाचे वातावरण दूर करू शकलो नाही, तर घटना समितीने परिश्रमपूर्वक तयार केलेली राजकीय लोकशाहीची इमारत जे विषमतेचे बळी पडतील त्यांच्याकडून उखडली गेल्याशिवाय राहणार नाही. ७५ वर्षांपूर्वी डॉ. आंबेडकरांनी द्रष्टेपणाने दिलेल्या या इशाऱ्याकडे आपण गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. कारण आज संपत्तीचे कमालीचे केंद्रीकरण होत आहे. एक-दोन उद्योगपतींच्या हातात संपूर्ण देश जातो आहे की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मूठभर नवकोट नारायणाची संख्या वाढते आहे, तर करोडो लोक खंक होत दारिद्र्यरेषेखाली ढकलले जात आहेत. म्हणूनच बाबासाहेबांचा हा इशारा अतिशय महत्त्वाचा ठरतो.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांवर आयुष्यभर संघर्ष केला. अस्पृश्य समाजाची प्रगती हाच त्यांचा ध्यास आणि श्वास बनला होता. त्यांनी करोडो दलित मनात स्वाभिमानाची पेरणी केली. अनेक शतके उपेक्षित आणि गावकुसाबाहेर असणाऱ्या समाजात वैचारिक क्रांती केली. आर्थिक समतेच्या दिशेने जाणे त्यांना फार महत्त्वाचे वाटत होते. सामाजिक व आर्थिक स्तरावरील विषमता नष्ट करणारी धोरणे सरकारने आखली पाहिजेत, ही त्यांची भूमिका होती. हा त्यांचा समाजवाद होता.

**'एक माणूस एक मूल्य' हा लोकशाही गाभा**

डॉ. आंबेडकरांनी घटना समितीला 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' या आपल्या पक्षाच्या वतीने एक निवेदन दिले होते. त्यात म्हटले होते, भारतीय राज्यघटनेने इतर देशांच्या राज्यघटनेतील दोषांची नक्कल करू नये. ही वेळ घटनात्मक विधिनिमांद्वारे या देशाची अर्थव्यवस्था आणि राज्यव्यवस्था निश्चित करण्याची आहे. यामध्ये डॉ. आंबेडकरांचा समाजवादी अर्थव्यवस्थेचा आग्रह होता. लोकशाही स्वीकारलेल्या इतर देशांनी त्यांच्या राज्यघटनेत राजकीय ढाच्याला दिलेले महत्त्व आणि अर्थव्यवस्थेकडे केलेले दुर्लक्ष त्यांना मान्य नव्हते. कारण आर्थिक जीवनात राज्य समाजवादाचा पुरस्कार आणि समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम विधिमंडळाच्या इच्छेवर न सोपवता, ती घटनात्मक विधिनियमांद्वारे प्रस्थापित करावी, तसेच विधिमंडळ किंवा कार्यकारी मंडळाच्या कायद्यांमुळे तिच्यात बदल करता येणार नाहीत' अशी त्यांची भूमिका होती. राज्य समाजवादाची स्थापना संसदीय लोकशाही न नाकारता; परंतु संसदीय लोकशाहीवरही न सोपवता येणारी अशी ही आपली योजना होती. या योजनेमुळे अर्थव्यवस्था कोणत्याही एका वर्गाच्या हातात जाण्याची शक्यता राहणार नाही, असे ते म्हणत होते. 'एक माणूस एक मत 'ऐवजी' एक माणूस एक मूल्य' हा लोकशाही गाभा आहे, असे त्यांचे मत होते. आर्थिक विषमता तशीच ठेऊन अथवा वाढवत नेऊन लोकशाहीची इमारत सुरक्षित राहू शकत नाही, यावर ते ठाम होते.

डॉ. आंबेडकरांच्या समाजवादाच्या संकल्पनेत लोकसत्ताक राज्यपद्धतीवरचा आढळ विश्वास होता. म्हणून तर त्यांनी जातीय मतदारसंघांना विरोध केला. सायमन कमिशनसमोर दिलेल्या साक्षीत त्यांनी हे प्रकर्षाने मांडले होते. प्रौढ मताधिकार आणि प्रादेशिकतेच्या तत्त्वावर आधारलेले सर्व जातींचे संयुक्त मतदारसंघ यासाठी ते आग्रही होते. पण गोलमेज परिषदेत इतर सदस्यांनी हे मुद्दे उचलून धरले नाहीत. परिणामी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी त्यांना करावी लागली. पुढे गांधीजींच्या प्राणांतिक उपोषणामुळे त्यांना पुणे करार करावा लागला आणि राखीव जागांचे तत्त्व स्वीकारावे लागले.

**लाकेशाही कायद्याच्या कलमांबरोबर**

**व्यवहारातही असली पाहिजे**

'आपण प्रत्येक पिढीला एक स्वतंत्र राष्ट्र मानले पाहिजे. आताच्या पिढीला बहुसंख्येने कायदे करून स्वतःला बांधून घेण्याचा अधिकार असला तरी येणाऱ्या नव्या पिढीला बांधून टाकण्याचा अधिकार नाही.' असे डॉ.आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणात म्हटले होते. यातून त्यांना अभिप्रेत असलेल्या समाजवादी, समतावादी, विषमताविरहित समाज व्यवस्था राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्थेची कल्पना येते. लोकशाही म्हणजे जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणणारी आणि या बदलांना जनतेने कोणत्याही प्रकारच्या विवादाचा अथवा रक्तपाताचा आसरा न घेता मान्यता द्यावी अशी व्यवस्था असावी, ही डॉ. आंबेडकरांची धारणा होती. लोकशाहीचा आपण स्वीकार केला हे खरे; पण ती लोकशाही सार्वत्रिक असायला हवी. राज्यघटनेच्या सरनाम्यात आणि कायद्याच्या कलमांबरोबर ती व्यवहारातही असली पाहिजे. त्यामुळे लोकशाहीच्या संकल्पनेत ते सामाजिक समतेला सर्वाधिक प्राधान्य देताना दिसतात. स्वातंत्र्याबरोबरच दलित वर्गाला आपली हक्काची जागा मिळावी, त्याची कुतरओढ होऊ नये, त्याला सामाजिक न्याय मिळायला हवा यासाठी डॉ. आंबेडकरांनी राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक दडपशाहीविरुद्धच्या लढ्यासाठी आपले जीवन खर्च केले. यावरूनही त्यांना लोकशाहीतून खरी समता, खरे स्वातंत्र्य, खरी बंधुता, खरा न्याय यांची प्रस्थापना करायची होती, हे स्पष्ट होते. भारतीय राज्यघटनेच्या मूलतत्त्वात स्वीकारण्यात आलेल्या लोकशाही या संकल्पनेचा आशय आणि पल्ला प्रतिनिधिक लोकशाहीकडून सहभागी लोकशाहीकडे जाणारा असला, तरी प्रत्यक्षात गेल्या ७५ वर्षांत लोकशाहीची परवड चालू आहे, हेही नाकारता येत नाही. याचे एक कारण राजकारण हे केवळ सत्ताकारण बनले आहे हे जसे आहे, त्याच पद्धतीने निवडणूक कायद्यातील उणिवा व मतदारांमध्ये पुरेशी जागृती नसणे हेही आहे. लोकाभिमुख कार्यपद्धतीचे सातत्य याची जाण ठेऊन सतत कार्यरत असणाऱ्या राजकीय पक्षांची उणीव आज आहे. अर्थात, संमिश्र अर्थव्यवस्थेच्या व समाजव्यवस्थेच्या देशात स्वीकारण्यात आलेल्या कोणत्याही संसदीय लोकशाही पद्धतीपेक्षा आपण स्वीकारलेली पद्धती अधिक लोकाभिमुख आहे यात शंका नाही.

**मानवी इतिहास हा वर्ग संघर्षाचाच इतिहास आहे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इथल्या वर्णव्यवस्थेचा, जातीव्यवस्थेचा अभ्यास करून त्याची तात्विक मीमांसा केली होती. समाजवादी अर्थव्यवस्था स्वीकारली पाहिजे ही भूमिका मांडली. समाजातील आर्थिक रचनाबंधांचा आणि उत्पादन प्रक्रियेतील हितसंबंधांचा कार्ल मार्क्स यांनी सखोल अभ्यास केला होता. त्याची सुस्पष्ट व प्रमेयबद्ध मांडणी केली होती. कोणत्याही समाजाचे जीवन अर्थव्यवहार नियंत्रण करत असते. अर्थव्यवस्थेत धनिक वर्ग आणि सर्वहारावर्ग असे दोन वर्ग असतात. या दोहोंतील संघर्ष अटळ असतो. दडपला गेलेला वर्ग संघटितपणे लढून विजयी होणार हा इतिहासक्रमाचा भाग आहे. या विजयी वर्गाच्या पिळवणुकीला बळी पडणारा नवा सर्वहारा वर्ग तयार होतो व पुन्हा नवी वर्गरचना तयार होते.म्हणजेच मानवी इतिहास हा वर्ग संघर्षाचाच इतिहास आहे,



अशी मांडणी मार्क्स यांनी केली. वर्ग कलहातून एक वर्ग जाऊन दुसरा वर्ग सत्तेवर येतो. या अरिष्टाचे मुख्य कारण खाजगी मालमत्ता हे असल्यामुळे सगळेच मालक आहेत आणि कुणीही मालक नाही अशी व्यवस्था आणली तर भांडणाचे मूळच नाहीसे होईल. खाजगी मालकीच राहिली नाही तर समाजात वर्गच उरणार नाहीत आणि वर्गच उरले नसतील तर वर्गसंघर्ष कसा होईल, असा प्रश्न मार्क्स उपस्थित करतो. वर्गविहीन, राज्यविहीन समाजाची भूमिका त्यांनी मांडली. त्यांच्या या मांडणीने अनेकदा केवळ स्वार्थमूलक भूमिकेतून येणाऱ्या ईश्वर, धर्म वगैरे बाबींना हादरे बसले. कारण ईश्वर व धर्म यांच्या सांगितल्या जाणाऱ्या अर्थापेक्षा मानवी समाजात अर्थकारणाचे महत्त्व फार मोठे आहे, हे त्यांनी स्पष्ट केले.

कार्ल मार्क्स यांच्या सम्यवादी मांडणीवर डॉ. आंबेडकर काही प्रश्न निश्चितपणाने उपस्थित करतात, ते आपण वर पाहिलेही आहे. मात्र आंबेडकरांना समताधिष्ठित समाजवादी रचना असणारा भारत अभिप्रेत होता. भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी वेळोवेळी केलेली मांडणी ही समाजवादाच्या दिशेने जाणारी आहे. भारतीय राज्यघटनेत १९७६ साली ४२ वी घटनादुरुस्ती मंजूर करण्यात आली. त्यानुसार भारतीय गणराज्याचे स्वरूप स्पष्ट करताना समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष अशी दोन विशेषणे जोडण्यात आली. अर्थात, ही तत्त्वे भारतीय परंपरेत व समाजजीवनात पूर्णतः रुजलेली तत्त्वेच आहेत. पण राज्यघटनेच्या हेतूसंबंधी नागरिकांच्या मनात कोणताही संदेह राहू नये, म्हणून या तत्त्वांचा लिखित स्वरूपात अंतर्भाव करण्यात आला.

**डॉ. बाबासाहेबांचीही तीच धरणा होती**

समाजवाद ही मानवी समाजजीवनाच्या विकासक्रमातील प्रगत अशी अवस्था आहे. नव्या भारताची उभारणी करण्यासाठी हे मूल्य पायाभूत मानले गेले. दारिद्र्य आणि शोषण नष्ट करून सामाजिक न्यायाच्या पायावर समाजाची पुनर्रचना करणे व मानवी जीवन सुखी आणि सुरक्षित बनवणे हे समाजवादाच्या संकल्पनेमधील गृहीत तत्त्व आहे. सर्वेपी सुखिनः संतु, सर्वे संतू निरामयः अशी समाजव्यवस्था आणणे यामध्ये अभिप्रेत आहे. म्हणूनच न्यायमूर्ती रानडे, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, नेताजी सुभाषचंद्र बोस, शहीद भगतसिंग, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदि अनेक दिग्गज समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार करताना आपल्याला दिसतात. त्यांच्या भूमिकेत किंचितशी वेगळी मांडणी

असेल, पण भारत हे समाजवादी राष्ट्रच झाले पाहिजे याबद्दल दुमत नव्हते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असणाऱ्या बाबासाहेबांचीही तीच धरणा होती.

भारतीय राज्यघटनेने समाजवादाची दिशा जरूर दिली. पण राज्यकर्त्यांचा व्यवहार मात्र त्याविरुद्धच अनेकदा झाला आहे, हे वास्तव आहे. स्वामी विवेकानंद एके ठिकाणी म्हणाले होते, 'मी स्वतः एक समाजसत्तावादी आहे. समाजसत्तावादाचा पुरस्कार मी केवळ ही व्यवस्था परिपूर्ण आहे असे मानून करत नाही, तर काहीच न मिळण्यापेक्षा अर्धी भाकरी तरी मिळवून देण्याची हमी या शासन प्रणालीत निश्चित स्वरूपात आहे.' समाजवाद भांडवलदारी उदारमतवादाला नाकारून समता, लोकशाही व वर्गविहीन समाजरचनेचा पुरस्कार करतो. एका अर्थाने समाजवाद हा भांडवलशाही व्यवस्थेच्या विरोधातील संघर्ष आहे. भांडवलशाही व्यवस्थेने प्रस्थापित केलेल्या ऐहिक आणि सांस्कृतिक दारिद्र्याची, सर्वसामान्य लोकांच्या आणि कामगारांच्या अध:पतनाची ही एक उद्वेगजनक प्रतिक्रिया आहे. दडपल्या गेलेल्यांच्या, पिळवणूक झालेल्यांच्या इच्छा व आकांक्षा समाजवादातून प्रतिबिंबित होत असतात.

**सार्वजनिक वितरण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे**

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व सुप्रसिद्ध विचारवंत न्यायमूर्ती चिनाप्पा रेड्डी यांनी चाळीस वर्षांपूर्वी म्हणजे ८-९ जानेवारी १९८३ रोजी 'राज्यघटना आणि समाजवाद' या विषयावर एक व्याख्यान दिले होते. राज्यघटनेला ७५ वर्षे होत असतानाच आपण ते समजून घेण्याची गरज आहे. ते म्हणाले होते, की आपली राज्यघटना समाजवादी होण्यासाठी काय करता येईल, हा खरा प्रश्न आहे. त्यासाठी काही मूलभूत व क्रांतिकारक बदलांची खरोखरच आवश्यकता आहे. सर्वात प्रथम म्हणजे मार्गदर्शक तत्त्वांना न्यायप्रविष्ट म्हणून मान्यता देणे आवश्यक आहे. कामाचा हक्क, योग्य मोबदल्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क, पर्यावरणाचा हक्क हे आणि यासारखे सर्व हक्क मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकरणातून काढून मूलभूत हक्कांच्या प्रकरणात समाविष्ट करणे नितांत गरजेचे आहे. घटनेने बहाल केलेल्या सामूहिक साधनसामुग्रीवरील व संपत्तीवरील वैयक्तिक मालकी तातडीने संपुष्टात आणणेही आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला तिच्या गरजेनुसार मिळावे यासाठी खाजगी वितरण व्यवस्था संपुष्टात आणून सार्वजनिक वितरण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. या सर्व अगदी प्राथमिक गोष्टी आहेत. त्याहीपेक्षा महत्त्वाचे दूरगामी बदल करणे आवश्यक आहे. न्यायमूर्ती चिन्नाप्पा रेड्डी यांनी समाजवादाच्या दिशेने जाण्याची सविस्तर चर्चा या ठिकाणी केलेली आहे आणि शेवटी आपण सर्वांनीच कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळाने समाजवादाच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करावेत, असा दबाव त्यांच्यावर आणून त्यासंबंधीचे मार्ग सुचवण्याची आवश्यकता आहे, असे म्हटले होते.

**जबाबदार व्यक्तीला चुकीची दुरुस्ती करता आली पाहिजे**

बाबासाहेबांची एकूण विचारधारा लक्षात घेता, त्यांनी समाजवादी समाजरचनेचा विचार हा सातत्याने अग्रभागी ठेवलेले दिसून येते. अगदी स्वातंत्र्य आंदोलनातही डॉ. आंबेडकरांनी आपली चळवळ काँग्रेसपासून वेगळी ठेवली असली, तरी त्या चळवळीचा हेतूही स्वातंत्र्य मिळवणे हाच होता. ते म्हणाले होते, अस्पृश्य वर्गाला स्वातंत्र्याची अधिक आवश्यकता आहे. किंबहुना त्याबद्दल त्यांना इतर वर्गापेक्षा जास्त तळमळ लागलेली आहे; परंतु त्यांना हवे असलेले स्वराज्य म्हणजे पूर्वीच्या स्वराज्याची आवृत्ती नको. ज्या स्वराज्यात त्यांच्या माणुसकीचा खून होणार नाही, ज्यात त्यांच्या हक्कांचे संरक्षण योग्य प्रकारे होईल असे स्वराज्य त्यांना हवे आहे. त्यांना ब्रिटिशांपासून आणि इथल्या अन्यायी चातुर्वर्णी व्यवस्थेपासूनही स्वातंत्र्य हवे होते.

डॉ. आंबेडकरांच्या समाजवादी विचारांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा आणि व्यक्तीचा व समूहाचा विवेक याला महत्त्वाचे स्थान होते. सामाजिक अन्याय नष्ट करून समाजवाद प्रस्थापित करणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. त्यांच्या सामाजिक व राजकीय चळवळीला सैद्धांतिक अधिष्ठान होते.त्यांना अनेकदा आपल्या भूमिका बदलाव्याही लागल्या. याचे कारणही त्यांचा प्रचंड व्यासंग हेच होते. याबाबत ते म्हणाले होते, 'सुसंगती हा गाढवाचा गुण असतो. सुसंगतीच्या नावाखाली पूर्वी व्यक्त केलेल्या विधानाला खरा विचारवंत कधीच चिकटून राहणार नाही. सुसंगतीपेक्षा जबाबदारीची जाणीव अधिक महत्त्वाची आहे. जबाबदार व्यक्तीला चुकीची दुरुस्ती करता आली पाहिजे.पुनर्विचार करण्याचे आणि तद्नुसार मतांतर करण्याचे धाडसही त्याच्या अंगी असावे लागते. अर्थात, प्रथम सिद्ध मुद्यावर पुनर्विचार करावयास व त्याप्रमाणे विचार प्रणाली बनवण्यास पुरेशी कारणे हवीत. विचार प्रवाहाला मर्यादा नसते.'

आज समाजवादी विचाराला सर्वात धक्का बसतो आहे तो, ओठात सर्वांच्या विकासाची भाषा आणि कृतीत मात्र एक-दोन भांडवलदारांच्या परमकल्याणाच्या धोरणाचा. रानडे, गांधी आणि जिना या पुस्तकात बाबासाहेब म्हणाले होते, 'असीम गौरव व्यक्त करणे या अर्थाने व्यक्तीपूजा ही एक गोष्ट झाली. नेत्याचे आज्ञापालन हा व्यक्तीपूजेचा अगदी वेगळा प्रकार झाला. पहिल्या प्रकारात काहीच गैर नाही, तर दुसरा प्रकार हा नि:संशय सर्वात धोकादायक गोष्ट झाली. पहिला प्रकार आदरभावाशी सुसंगत आहे. तर दुसरा प्रकारही नि:संशय सर्वात धोकादायक गोष्ट झाली. पहिला प्रकार व्यक्तीची विचार करण्याची बुद्धी आणि कृतीचे स्वातंत्र्य हिरावून घेत नाही. दुसरा प्रकार व्यक्तीला अस्सल मूर्ख बनवतो.'

डॉ. आंबेडकर आणि समाजवाद समजून घेत असताना आंबेडकरांचे एक विधान अतिशय महत्त्वाचे ठरते. ते म्हणजे, 'समतावादाचे ध्येय सर्वांना समतेने वागवणे नसून समता प्रस्थापित करणे हे आहे. हे ध्येय असताना सर्वांना समतेचे वागवून चालणार नाही. जेथे सर्व व्यक्ती समान आहेत, तेथे काही व्यक्तींना असमानतेने वागवल्यास विषमता उत्पन्न होईल. पण जेथे व्यक्ती असमान आहेत, तेथे त्यांना सारख्या लेखून चालणे म्हणजे समता प्रस्थापनेच्या ध्येयाला विरोध करणे होय. समानांमध्ये समता नांदू शकते. असमानांना समान मानणे म्हणजे विषमता जोपासणे होय.'

●●●

**(लेखक समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजीचे कार्यकर्ते व 'प्रबोधन प्रकाशन ज्योती' मासिकाचे संपादक आहेत.)**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुनर्वसन धोरण



डॉ. भारत पाटणकर

**आज तरतूद असूनही धरण-प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यांचा लाभ होत नाही. खास विभाग उघडून त्याच्याकडे हे कार्य सोपवण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संकल्पना आज राबवण्याचा विचार झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खांद्यावर उभे राहून, त्यांच्या पद्धतीने मूलगामी विचार करून आज देशाचे समग्र विकसनशील पुनर्वसन धोरण ठरविले गेले पाहिजे.**

महाराष्ट्र हे समग्र पद्धतीचे विकसनशील पुनर्वसनाचे धोरण घेणारे पुनर्वसन अधिनियम असणारे पहिले आणि अजूनही एकमेव राज्य आहे. या धोरणाची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. महाराष्ट्राच्या पुनर्वसन अधिनियमाची वैशिष्ट्ये आपण सुरुवात करतानाच लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) हा अधिनियम, आधी पुनर्वसन मग धरण/प्रकल्प या तत्त्वावर बेतलेला आहे. म्हणजे धरण/प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे विकसनशील पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक नवी गावठाणे नागरी सुविधांसह पूर्ण झाली आहेत, त्यांना पर्यायी जमीन दिली गेली आहे, त्यांच्या सामानासह त्यांचे स्थलांतर करण्याची सर्व तरतूद झाली आहे याची खात्री पुनर्वसन प्राधिकरणाला करून देऊन त्यांनी परवानगी दिली आहे असे पाहून त्यांना नव्या गावठाणात न्यायचे आहे.

२) मूळच्या गावी जे भूमिहीन शेतमजूर/बलुतेदार होते त्यांना सिंचनाचा लाभ होणाऱ्या क्षेत्रात एक एकर पर्यायी जमीन द्यायची आहे. ज्यांची जमीन २ एकरपर्यंत गेली आहे, त्यांना दोन एकरपर्यंत पर्यायी जमीन द्यायची आहे. ज्यांची जमीन पाच एकरपर्यंत गेली आहे, त्यांना तीन एकरपर्यंत जमीन द्यायची आहे. ज्यांची आठ एकरपर्यंत जमीन गेली आहे, त्यांना चार एकरपर्यंत जमीन द्यायची आहे. ज्यांची आठ एकरपेक्षा जास्त जमीन गेली आहे, त्यांना चार एकरपर्यंतच जमीन द्यायची आहे.

ज्यांच्या कुटुंबात पाचपेक्षा जास्त माणसे आहेत, त्यांना दर तीन माणसांच्या मागे एक एकर अशी सात एकरपर्यंत जमीन द्यायची आहे. कुणालाच सात एकरपेक्षा जास्त जमीन देता येणार नाही. कारण लाभ क्षेत्रातील जमिनींनासुद्धा आठ एकरपर्यंत सीलिंग लावून जमीन उपलब्ध केली आहे.

३) टाऊन प्लॅनिंगच्या निकषांनुसार गावठाण, प्रत्येक कुटुंबाला प्लॉट, खुल्या जागा, नागरी सुविधा करून गावठाण द्यायचे आहे. घर बांधेपर्यंत तात्पुरते शेड बांधून द्यायचीपण तरतूद आहे.

**कायदा विकसित करण्यात चळवळीला यश**

१९७६ साली भारतात पहिल्यांदाच मूळ स्वरूपात हा कायदा, महाराष्ट्रभरातून प्रकल्पग्रस्त होऊ घातलेल्या स्त्री-पुरुष जनतेच्या प्रचंड आंदोलनाच्या परिणामी सरकारला करावा लागला. यात सर्वात अवघड प्रश्न, भविष्यातील लाभक्षेत्रातील जमिनीला सीलिंग लावून जमीन उपलब्ध करून घेण्याचा होता. अशा प्रकारे जमीन काढून घेऊन प्रकल्पग्रस्त कुटुंबांना देण्याचे सशक्त समर्थन निर्माण करण्याचा होता. जमीन सिंचनाखाली आल्यानंतर तिचे उत्पादन किमान ४-५ पटीने वाढते आणि दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागत नाही, असे मजबूत समर्थन त्या काळी या कमिटीत घेतल्या गेलेल्या कॉ. दत्ता देशमुखांसारख्या चळवळीच्या प्रतिनिधींनी शास्त्रीय पद्धतीने दिल्यामुळेच हा मुद्दा सोपा झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या परिणामी महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन विकासाकडे वाटचाल सुरू करण्याचा तो काळ होता. धरणांमुळे विकासाला प्रचंड वेग येऊ शकणार असल्याचे सर्वांनाच समजत होते. पुढेसुद्धा या कायद्यात सुधारणा करण्यासाठी जनतेच्या मोठ्या आणि जाणत्या चळवळी झाल्या. आज १९७६ चा कायदा २०१५ पर्यंत विकसित करण्यात चळवळीला यश आले.

या सर्व संकल्पना विकसित करणारी, इतिहासातली पहिली प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्व काळात झाली. ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश सरकारने स्थापन केलेल्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य म्हणून काम करत असताना झाली. याचे मूळ दामोदर खोरे प्रकल्पाच्या आणि ओडिशामधील नद्यांवर प्रकल्प उभारणीच्या आखणीच्या निमित्ताने निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये व युद्ध संपत आले असताना सैनिकांचे पुनर्वसन करण्याच्या गरजेमध्ये आहे.

**या प्रक्रियेत डॉ. बाबासाहेबांची प्रमुख भूमिका**

या प्रक्रियेची सुरुवात दामोदर खोरे योजनेविषयी झालेल्या कलकत्ता चर्चासत्रापासून होते. या चर्चासत्राचे दोन विषय होते. एक विषय दामोदर नदीच्या पूर नियंत्रणाचा होता आणि दुसरा विषय,

देशातील जलस्त्रोतांचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करण्यासाठी नियोजन करण्याचा. या काळापर्यंत ब्रिटिश साम्राज्यवादी सरकारने कोणतंही देशव्यापी स्वरूपाचं, जलस्त्रोतांच्या नियोजनाचं धोरण ठरवलेलं नव्हतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच जलमार्ग, पूरनियंत्रण, जलसिंचन आणि जलविद्युत निर्मिती अशा प्रकारच्या बहुपेडी, बहुउद्देशीय समग्र धोरणाच्या आखणीला सुरुवात झाली. या पाठोपाठ ओडिशामधील नद्यांचा असाच बहुउद्देशीय आराखडासुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुखत्त्वाखाली बनवायला सुरुवात झाली. या दोन्ही महाकाय योजनांमुळे विस्थापित होणाऱ्या हजारो कुटुंबांचं पुनर्वसन करण्याचा महत्त्वाचा प्रश्न या योजनांची आखणी करतानाच निर्माण होणे साहजिकच होते. या सर्व प्रक्रियेत बाबासाहेबांची प्रमुख भूमिका असल्यामुळे त्यांना पुनर्वसन धोरणाचा विचार करावा लागला.

या संदर्भात जे बाधित होतात, त्यांच्याविषयी दोन महत्त्वाचे मुद्दे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले, १) ज्यांची जमीन बाधित होते, त्यांना न्याय्य नुकसानभरपाई द्यावी. २) ही नुकसानभरपाई जमिनीला जमीन देऊन करावी. ३) या कामासाठी एक मुख्याधिकारी नियुक्त करून त्याने ज्यांच्याकडून सर्व काढून घेतले गेले आहे, त्यांच्या पुनर्वसनासाठी योजना तयार करावी. त्यांच्या चरितार्थासाठी नवीन जमीन देण्यात यावी. त्यांची जीविका चालवण्यासाठी आवश्यक साधने देण्यात यावीत. त्यांची जीविका विस्थापनापूर्वी, किमान जेवढी चालत होती तेवढी तरी चालावी याची खात्री केली जावी.

१९७६ च्या महाराष्ट्राच्या पुनर्वसन अधिनियमात (कायद्यात) लाभक्षेत्रात पर्यायी जमीन देऊन पुनर्वसन करण्याचा नियम आला. बाबासाहेबांनी ब्रिटिश साम्राज्यवादी सरकारच्या काळातसुद्धा जे घडवले ते घडायला स्वातंत्र्याची तीस वर्षे उलटून जावी लागली!

दामोदर कालवा आणि पोलावरम् प्रकल्पाच्या चर्चेत एन.जी. रंगा यांनी प्रश्न विचारला, की बंगाल आणि बिहारमधील अनुसूचित वर्गांमधील जनतेला, त्यांच्या सामुदायिक वास्तव्यासाठी आणि कसण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्याकरिता सरकार काय पावले उचलणार आहे? याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्तर दिले आहे, की भूमिहीनांना जास्तीत जास्त मदत करण्याचा सर्वात चांगला मार्ग सरकार शोधत आहे. हा पैलूसुद्धा १९७६ च्या कायद्यात नव्हता. तो १९८६ च्या कायद्यात समाविष्ट करण्यात आला!

मूळ वस्तीचे ठिकाण बुडण्यापूर्वी किंवा बाधित होण्यापूर्वी बाधित जनतेला तिथून उठून पुनर्वसनाच्या ठिकाणी जाऊन राहण्यासाठी पुरेसा काळ मिळण्याविषयी विचारलेल्या प्रश्नांनासुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, पुरेसा वेळ दिला जाईल असे उत्तर दिले आहे.

१९७६ चा पुनर्वसन अधिनियम होणे आणि तेव्हापासून आजपर्यंत विकसित होत जाणे हे जनचळवळींमुळेच घडू शकले आहे. पण यामागे असणाऱ्या तत्त्वांचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्रिटिश साम्राज्यवादी सरकारच्या काळातच घातला होता, हे त्यांचे मोठेपण आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस सैन्यातून घरी पाठवलेल्या जवानांच्या पुनर्वसनाची प्रगत संकल्पना आणि अंमलबजावणी करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मोठे योगदान केले आहे. जवानांना जमीन देऊन त्यांना स्थिर जीवन मिळण्यासाठी तरतूद करणे हा एक भाग ते मांडतात. दुसरा भाग, त्यांना नोकऱ्या देऊन आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत करणे हा आहे. धरण-प्रकल्पग्रस्तांप्रमाणेच ही वेगळी प्रक्रिया आहे. नोकऱ्यांमध्ये सामावून घेण्याचे नवे अंग यात पुढे आले आहे. आज तरतूद असूनही धरण-प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यांचा लाभ होत नाही. खास विभाग उघडून त्याच्याकडे हे कार्य सोपवण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संकल्पना आज राबवण्याचा विचार झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खांद्यावर उभे राहून, त्यांच्या पद्धतीने मूलगामी विचार करून आज देशाचे समग्र विकसनशील पुनर्वसन धोरण ठरविले गेले पाहिजे. ●●●

**(लेखक विचारवंत आणि श्रमिकांच्या चळवळीचे नेते आहेत.)**

---

# !! नाते भीमरायाशी, जयभीम हाच श्वास नि ध्यास !!

**(पान १५ वरून)** बेळगावपासून नागपूरपर्यंत, दिल्लीपासून बंगलोरपर्यंतची. त्यांची नावानिशी उजळणी करतो. आज कोण कोठे आहे? कसा आहे? असेल का? अशा प्रश्नांची मनात गर्दी होते.

प्रा. भगवान भोईर व्याख्या विचारतात, 'तुम्ही आपला माणूस कोणाला मानता?' मी म्हणतो, ''जो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानतो तो माझा माणूस. त्यांना जो मानत नाही तो माझा नाही. मग तो कोणीही व कोठलाही असो.''

कोणी विचारते, 'आंबेडकरवादाची तुमची व्याख्या काय?' मी सांगतो, ''सर्वांगीण मानवकल्याणी, लोकशाहीनिष्ठ, विवेकी, नीतिप्रहार, ज्ञानमार्ग म्हणजे आंबेडकरवाद.'' (११ ऑगस्ट २०१८ ला रात्री ११ वाजता सुचलेली).

मी आयुष्यात एकही वाईट गोष्ट केली नाही, असे सांगणारे नेतृत्व, कोणत्याही जातीचा द्वेष न करता दलितांसाठी वेचलेले संपूर्ण आयुष्य, क्षणोक्षणी समताधिष्ठित समाजासाठी नि देशाला हिताचा अहर्निश विचार म्हणजे आमचे बाबासाहेब. अलीकडे झोपताना बाबासाहेबांच्या विविध प्रतिमा डोळ्यापुढे येतात नि डोळे पाणवतात. रात्ररात्र झोप लागत नाही. सकाळी डोळा लागतो. सगळे बाबासाहेब कधी वाचून होणार याने चिंताग्रस्त होतो. बाबासाहेब, मी कोण, कुठला, काय; पण आयुष्यभर अदृश्यरूपाने माझ्या अवतीभोवती आहात, असा भास होतो. खरोखरच तुमची कमाल आहे.

बाबासाहेबांपासून प्रेरणा घेण्यासाठी दलित समाजातच जन्माला आले पाहिजे, असे नव्हे व बाबासाहेबांपासून प्रेरणा घेतली तर फक्त दलितच मोठा होतो असेही नव्हे. हे मला आवर्जून सांगावे वाटते.

●●● **(लेखक ज्येष्ठ आंबेडकरवादी विचारवंत आहेत.)**

समृद्धीची एकत्र वाटचाल

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

# पृथ्वीचे अधिक पोषण
# भारताची अधिक समृद्धि



आरसीएफ सहाव्या दशकात आपल्या प्रारंभापासूनच भारताची कृषी उत्पादकता वाढविणारी एक प्रमुख ताकद आहे. आमच्या यशाचे मूळ आमचा विश्वास आहे. आम्हाला विश्वास आहे की शेतकरी समुदायाचे सशक्तीकरण, सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. दीर्घावधिपासून आम्ही भारतीय शेतकऱ्यांचे प्रामाणिक व विश्वासू साथीदार आहोत. कृषीच्या माध्यमातून निरंतर आत्मनिर्भरता ही आज राष्ट्राची गरज आहे आणि आम्ही शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी इनपुट आणि प्रभावी कृषी सेवा देऊन मातीच्या योग्य देखभालीबरोबरच शेतीची उच्च उत्पादकता सुनिश्चित करीत आहोत.

**आमच्या प्रेरणादायी कामगिऱ्या :**

- देशातील अग्रगण्य खत निर्माते.
- मागील पाच दशकापासून भारतीय शेतकऱ्यांसाठी समर्पित सेवा.
- खत निर्मिती क्षेत्रामध्ये पहिल्या पाच कंपन्यांमध्ये स्थान.
- 'उज्ज्वला' यूरिया, संयुक्त श्रेणी 'सुफला' (15:15:15 आणि 20:20:0) पाण्यामध्ये विरघळणारे खत 'सुजला', सेंद्रीय खत 'बायोला' सूक्ष्म पोषक घटक असलेला 'माइक्रोला' अशी अनेक उत्पादने.
- रासायन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रणी, 20 औद्योगिक रसायनांचे उत्पादन.

**भविष्यातील योजना :**

- दरवर्षी १.२७ दशलक्ष टन यूरिया बनविण्यासाठी विस्तारित प्रकल्प.
- सीआयएल, गेल आणि एफसीआयएल बरोबर एकत्र येऊन कोल गॅसिफिकेशनच्या माध्यमातून तालचरमध्ये रासायनिक खत निर्मिती संकुलाची स्थापना करणे.
- संसाधनांनी समृद्ध असलेल्या मध्यपूर्वी देशांमध्ये यूरियासाठी संयुक्त उद्यम प्रकल्पांची स्थापना करणे.
- रॉक फॉस्फेट व पोटॅशसाठी दीर्घावधी ऑफ टेक करार करणे.
- निरंतर विकासावर सशक्तपणे लक्ष केंद्रीत करणे.

## राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड
(भारत सरकारचा अंगिकृत व्यवसाय)

"प्रियदर्शिनी", इस्टर्न एक्सप्रेस हायवे, सायन, मुंबई - ४०० ०२२. | www.rcfltd.com

ओएनजीसी
ONGC

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

# विद्युतशक्ति से सशक्तिकरण तक



## हमारे पूर्वोत्तर राज्यों के स्वप्न आलोकित हुए

त्रिपुरा राज्य में ओएनजीसी की बड़ी विद्युत परियोजनाओं की प्रथम इकाई (363.3 मेगा वाट) भारत के पूर्वोत्तर को प्रकाशमय कर रहा है और यह संयुक्त राष्ट्रसंघ में पंजीकृत विश्व की बृहत्तम स्वच्छ विकास तंत्र परियोजनाओं में से एक है। ओएनजीसी ने राज्य में बेंत उत्पादों को बनाने वाले कई स्वयं सहायता समूहों की भी मदद की है और इस प्रकार महिलाओं को अपने परिवारों का भरण पोषण करने के लिए आजीविका कमाने हेतु सशक्त कर रहा है।

**ओएनजीसी** कम्पनियों का समूह

ओएनजीसी विदेश ONGC VIDESH · ONGC एमआरपीएल MRPL · ओपीएएल OPaL · ओएमपीएल OMPL · OTPC ONGC-Tripura Power Company Ltd. · Petronet MHB Limited · Pawan Hans Limited (A Government of India Enterprise) · tbl ONGC TERI Biotech Limited · DSL · MSEZ · PETRONET LNG LIMITED

**ऑयल एंड नेचुरल गैस कॉरपोरेशन लिमिटेड,** जीवन भारती बिल्डिंग, टॉवर–II, 8वाँ तल, 124, इंदिरा चौक, नई दिल्ली-110001
फोन: 011-23301000, 23310156, 23721756 • फैक्स: 011-23316413 • www.ongcindia.com • facebook.com/ONGCLimited

# फायदा मोदींना, की राहुलला?

**न्यायालयाच्या खांद्यावर बंदूक ठेवून राहुल गांधींची बडतर्फी झाली खरी; पण भाजपने आता राहुल गांधींना मोकळे केलेले आहे. भाजपच्या या कृतीने काँग्रेससाठी मोठी संधी चालून आलेली आहे. वर्षभरात लोकसभेची निवडणूक होणार आहे, त्याआधी कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढ या राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकांमध्ये काँग्रेसला यश मिळाले, तर राहुल गांधींनी बाजी मारल्याचे सिद्ध होईल. अन्यथा आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला २०१९ च्या निवडणुकीतील यशाची पुनरावृत्ती करण्याची संधी मिळेल.**

**विचक्षण बोधे**

राजा शक्तिशाली होत जातो, तो एकहाती सत्ता राबवतो. मग, त्याला जगाचा कर्ताधर्ता आपणच असल्याची स्वप्ने पडू लागतात. मग, राजाला वाटू लागते, की आपल्याला सगळ्यांनी विधाता म्हटले पाहिजे. प्रजेला तसे वाटत असेल, असे नाही. पण राजाच्या भोवती असणारे खुशमस्करी विदुषक त्याला विधाता म्हणू लागतात. राजाला ते आवडू लागतात. हे खुशमस्करे सांगतील तेच राजाला खरे वाटू लागते. आपण राजाच्या कानात कुजबूज केली नाही तर आपले काय होईल, याची जाणीव खुशमस्कऱ्यांनाही असते. हा सत्तेचा खेळ वर्षानुवर्षे खेळला गेला आहे. पण प्रत्येक वेळी राजाच्या नाकर्तेपणामुळे त्याचा पराभव झालेला आहे. जगभरात जितकी मोठी साम्राज्ये होती, त्यांचा अंत अन्य कुठल्या मार्गाने झालेला नाही. मग भारतात तर साम्राज्य उभेही राहिले नसताना, राजाला विधाता झाल्याची स्वप्ने का पडू लागली आहेत? ही स्वप्ने भंग करू पाहणाऱ्या प्रत्येकाला त्याने शिक्षा देण्याचे ठरवलेले दिसते आहे.



**कुठल्याही मंत्र्यांची नावे घेतली तरी त्यांचे अस्तित्व काय!**

भारतात आधी खुशमस्करे झाले नाहीत, असे नव्हे. इंदिरा गांधींच्या काळात काँग्रेस पक्ष खुशमस्कऱ्यांनी भरलेला होता. 'इंदिरा इज इंडिया' असे म्हणणारे देवकांत बरुआ होतेच. आत्ताही मोदी जगातील लोकप्रिय नेते असून अवघे जग त्यांच्या प्रेमात पडल्याचे पियुष गोयल यांच्यासारखे मोदीभक्त वारंवार म्हणतात. इंदिरा गांधींच्या काळात होते तसे खुशमस्करे आता मोदींच्या भाजपमध्ये पाहायला मिळू लागले आहेत. गोयल यांच्यासारखे माळेतील होयबा दिल्लीत अनेक दिसतील. स्वतःचे कर्तृत्व असलेले वा स्वतंत्र अस्तित्व असलेले मंत्री मोदींच्या मंत्रिमंडळात शोधून सापडत नाहीत. मोदींना आव्हान देण्याची क्षमता फक्त नितीन गडकरींकडे आहे. राजनाथ सिंह स्वतःची आब राखून आहेत. हे दोघेही शांत बसलेले आहेत. बाकी, अश्विनी वैष्णव, स्मृती इराणी, निर्मला सीतारामन, भूपेंद्र यादव, मनसुख मांडविया, प्रल्हाद जोशी अशा कुठल्याही मंत्र्यांची नावे घेतली तरी त्यांचे अस्तित्व काय, असा प्रश्न पडावा. मराठी मंत्र्यांची तर नावेही घेऊ नयेत अशी स्थिती. नारायण राणे, रावसाहेब दानवे, भारती पवार, कपिल पाटील, भागवत कराड हे मंत्री मोदींच्या मंत्रिमंडळात काय करतात, हे त्यांनाही माहीती नसेल.

**राजापेक्षा राजनिष्ठ कोण हे दाखवून देण्याची चढाओढ**

राजाच्या या अवतीभोवतीच्या खुशमस्कऱ्यांनी राजाला देव बनवून टाकले असल्याने त्याच्यावर टीका केलेली सहन केली जात नाही. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधींनी राजाला आव्हान दिले. ते म्हणाले, मोदी तुमचा अदानींशी संबंध काय? तुम्ही त्यांच्या विमानात आरामात बसलेले दिसता. तुमची मैत्री घट्ट दिसते. तुम्ही, अदानी, स्टेट बँकेच्या तत्कालीन अध्यक्ष एकत्रित काय चर्चा करत होतात? ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, इस्त्रायल अशा

वेगवेगळ्या देशांतील कंत्राटे अदानींना कशी मिळाली?... राहुल गांधींनी खुशमस्कऱ्यांच्या देवाला प्रश्न विचारल्यामुळे ते इतके संतप्त झाले, की राजापेक्षा राजनिष्ठ कोण हे दाखवून देण्याची चढाओढ लागली. निशिकांत दुबे यांनी राहुल गांधींविरोधात हक्कभंग आणला. मग भाजपमधील मोदीभक्तांनी एकामागून एक हल्लाबोल सुरू केला. आपले भक्त विरोधकांवर तुटून पडल्यावर राजाला बरे वाटले असावे!



**...तर मोदींनी स्वतःच्या पायावर दगड मारून घेतला असता**

पण प्रत्यक्षात झाले असे, की काँग्रेसने मोदींना अचूक कैचीत पकडले आहे. त्यातून मोदीभक्त त्यांची सुटका करू शकत नाहीत. त्यातून वैफल्यग्रस्त होऊन भाजपने राहुल गांधींची खासदारकी रद्द करून टाकली. हे वागणे आततायी म्हणायला हवे. लोकसभेत मोदींना प्रश्न विचारून राहुल गांधी लंडनला निघून गेले. अदानी समूहाच्या आर्थिक गैरव्यवहारासंदर्भात 'हिंडेनबर्ग रिसर्च' संस्थेने अहवाल प्रसिद्ध केल्यावर विरोधकांनी संसदेच्या दोन्ही सदनांमध्ये गदारोळ घातला. या संपूर्ण प्रकरणाची संयुक्त संसदीय समितीकडून चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी ते करू लागले. सभागृहात चर्चा झाली पाहिजे, असे म्हणत त्यांनी सभागृहांचे कामकाज बंद पाडले. चर्चेला परवानगी दिली तर मोदींनी स्वतःच्या पायावर दगड मारून घेतला असता. त्यामुळे केंद्र सरकार सभागृहात चर्चा करणार नाही, हे स्पष्ट होते. मग विरोधकांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत अदानींच्या कथित गैरकामांचा हिशोब मांडला. त्यात मोदींना अडचणींचे प्रश्न विचारले. मोदींना भ्रष्ट म्हणण्याचे धाडस राहुल गांधींनी केले कसे, या विचाराने भाजपच्या खुशमस्कऱ्यांचा तिळपापड झालेला होता. या सगळ्या गोंधळात संसदेच्या अर्थसंकल्पाचा पहिला टप्पा संपला. मग मधल्या महिन्याभराच्या काळात भाजपने राहुल गांधींवर डाव उलटवण्याची रणनिती आखली असे दिसते. राहुल गांधींना अद्दल घडवली, की आव्हान देऊ पाहणाऱ्या इतर विरोधकांनाही धडा मिळेल, असे भाजपला वाटले होते. पण झाले भलतेच.

**...तर राहुल गांधींनी बाजी मारल्याचे सिद्ध होईल**

राहुल गांधी परदेशात जाऊन देशातील लोकशाहीवर बोलले. त्याचे भांडवल करून संसदेच्या अर्थसंकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात भाजपने आगपाखड केली. राहुल गांधींनी माफी मागावी यासाठी आकांडतांडव केले. पण त्याचा काहीच फायदा झाला नाही. भाजपच्या खासदारांनी केलेल्या गोंधळामुळे संसदेचे कामकाज ठप्प झाले इतकेच. भाजपच्या दबावाचा राहुल गांधींवर वा काँग्रेसवर काहीही परिणाम झाला नाही. तोपर्यंत राहुल गांधींच्या विरोधातील हक्कभंगाच्या प्रकरणावर सुनावणी झाली होती. भाजपपुढे दोन पर्याय होते. राहुल गांधींचे निलंबन करणे वा त्यांची खासदारकी रद्द करणे. राहुल गांधी आणि काँग्रेसने केलेला अदानीविरोधातील वार इतका वर्मी लागला होता, की राहुल गांधींना शिक्षा द्यायचीच असे भाजपने ठरवलेले होते. अन्यथा दररोज संसद भवनातील पंतप्रधानांच्या दालनात वरिष्ठ मंत्र्यांच्या बैठका झाल्या नसत्या. राहुल गांधींना बडतर्फ करायचे, तर न्यायालयाचा आधार घ्यावा लागणार होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभेत झालेल्या राहुल गांधींच्या भाषणाचा आधार घेतला गेला. मोदी आडनावावरून अब्रुनुकसानीचा खटला सुरत न्यायालयात तेव्हाच दाखल करण्यात आला होता. पण याचिकाकर्त्याने स्वतःच्या याचिकेवर उच्च न्यायालयातून स्थगिती मिळवली होती. अचानक मार्चमध्ये ही स्थगिती उठवून सुरत न्यायालयात खटला चालवून राहुल गांधींना दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. हा न्यायालयीन प्रकार अजब म्हटला पाहिजे. न्यायालयाच्या खांद्यावर बंदूक ठेवून राहुल गांधींची बडतर्फी झाली खरी; पण भाजपने आता राहुल गांधींना मोकळे केलेले आहे. भाजपच्या या कृतीने काँग्रेससाठी मोठी संधी चालून आलेली आहे. वर्षभरात लोकसभेची निवडणूक होणार आहे, त्याआधी कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढ या राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकांमध्ये काँग्रेसला यश मिळाले, तर राहुल गांधींनी बाजी मारल्याचे सिद्ध होईल. अन्यथा आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला २०१९ च्या निवडणुकीतील यशाची पुनरावृत्ती करण्याची संधी मिळेल.

**बेरोजगारी, महागाई, आरक्षण हे मुद्दे लोकांशी जोडलेले**

राहुल गांधींच्या बडतर्फीमागे भाजपची प्रमुख दोन कारणे दिसतात. थेट मोदी अडचणीत येतील अशी आर्थिक गैरव्यवहारांची, उद्योजकांच्या नातेसंबंधांची, मोदींच्या विश्वासार्हतेला धक्का लागेल अशी प्रकरणे लोकांच्या नजरेआड करणे. आगामी लोकसभा निवडणुकीत मोदींचा चेहरा हेच भाजपचे प्रमुख भांडवल आहे. सत्ता मिळवून देणाऱ्या हुकमी एक्क्याला कुठल्याही परिस्थितीत

जपले पाहिजे, ही उघड रणनिती दिसते. अदानी-मोदींच्या नातेसंबंधांवर राहुल गांधींनी संसदेत बोलण्यापेक्षा संसदेबाहेर बोलत राहावे. त्यांच्या बोलण्याचा लोकांवर फारसा परिणाम होणार नाही, असे भाजपला वाटते. 'चौकीदार चोर है'सारख्या काँग्रेसच्या मोहिमेतून मोदींचा फायदा झाला, तसा आताही होऊ शकेल. बेनामी कंपन्यांमार्फत शेअर बाजारात पैसे गुंतवून अदानी समूहातील कंपन्यांच्या समभागांच्या किमती अवाच्या सव्वा वाढवल्या गेल्या. हा गैरव्यवहार असला तरी त्याचा थेट लोकांच्या जगण्याशी काहीही संबंध नाही. बेरोजगारी, महागाई, आरक्षण हे मुद्दे लोकांशी जोडलेले आहेत. काँग्रेसला हे मुद्दे पकडता आले, तर भाजपविरोधात वातावरण कदाचित निर्माण होऊ शकेल. त्यामुळे राहुल गांधी आणि काँग्रेस अदानींवर बोलत राहतील तोपर्यंत भाजपला चिंता करण्याजोगे काही नाही, असा विचार करून भाजप पुढील पावले टाकत असल्याचे दिसते.

**मोदी आडनावाचा अपमान म्हणजे ओबीसींचा अपमान**

स्वच्छ प्रतिमेला तडा गेला, तर अदानी प्रकरण भाजपसाठी त्रासदायक ठरू शकते. पण काँग्रेसला तिकडे वळू न देता ओबीसींच्या मुद्यावर त्यांची कोंडी करता येऊ शकेल का, याची चाचपणी भाजप करताना दिसतो. राहुल गांधींना धडा शिकवण्यासाठी मोदी आडनावाचा वापर केला गेला. पण ओबीसी राजकारणाचे भांडवल करण्याचे भाजपला न्यायालयाच्या निकालानंतर सुचले असे दिसते. सगळ्या चोरांची आडनावे मोदी कशी, हे राहुल गांधींचे विधान पंतप्रधानांना उद्देशून असल्याचे भाजप मानत होता. पंतप्रधान आमचे सर्वस्व असतील, तर त्यांच्यावर लांच्छन लावणाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे, या उद्देशाने न्यायालयीन लढाई लढली गेली. पण राहुल गांधींच्या बडतर्फीला नैतिकता जोडायची असेल, तर ओबीसींचा मुद्दा योग्य ठरेल हे चाणाक्षपणे ओळखून भाजपने राहुल गांधींचे वक्तव्य ओबीसी समाजाच्या अपमानाशी जोडले. अदानीच्या प्रकरणापेक्षा ओबीसीचा मुद्दा लोकांमध्ये अधिक चर्चिला गेला, काँग्रेस ओबीसीविरोधी पक्ष असल्याची भावना लोकांमध्ये पुन्हा निर्माण झाली, तर विधानसभा निवडणुका आणि लोकसभा निवडणुकीत ओबीसी मतदार खुंटी हलवून बळकट करता येतील, असे भाजपच्या रणनितीकारांचे म्हणणे आहे. मोदी आडनावाचा अपमान म्हणजे ओबीसींचा अपमान. याचाच अर्थ पंतप्रधान मोदींचा अपमान. मोदी हे जगातील लोकप्रिय नेते असल्याचे पीयुष गोयलसारखे खुशमस्करे म्हणतात. ओबीसी समाज जागतिक स्तरावर घेऊन जाण्याचे काम मोदींनी केले असेल, तर त्या समाजाचा आणि पंतप्रधानांना अपमान करणाऱ्यांना लोकांनी मते देऊ नयेत, अशी भाजपच्या प्रचाराची दिशा दिसते. मोदी आडनावावर बोलताना राहुल गांधींचा उद्देश ओबीसींचा अपमान करण्याचा हेतू नव्हता. खरे तर, अपमान झाल्याचे दोन वर्षे भाजपलाही माहीत नव्हते. पण एखाद्या मुद्याला राजकीय वळण देण्यात भाजप माहीर आहे. ओबीसीच्या मुद्यावरून काँग्रेसविरोधात राजकारण करण्याचे भाजपने ठरवलेले आहे. गेल्या दोन्ही लोकसभा निवडणुकीत भाजपच्या यशामध्ये ओबीसी मतदारांचा वाटा मोठा आहे. भाजपनेही आठ वर्षांमध्ये ओबीसी समाजाला पक्षामध्ये तसेच, केंद्रीय मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व




देऊन त्यांच्या आशा-आकांशा जपण्याचा प्रयत्न केलेला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही भाजपसाठी ओबीसी मतदारच महत्त्वाचे आहेत. उत्तर प्रदेशामध्ये भाजपची पक्की मांड असेल; पण अन्य राज्यांमध्ये भाजपला ओबीसी मतदारांना गृहीत धरून चालणार नाही. जातीनिहाय जनगणना आदी मुद्यांवरून ओबीसी मतांमध्ये फाटाफूट होण्याची भाजपला भीती आहे. हा संभाव्य धोका टाळायचा असेल, तर राहुल गांधींनी ओबीसी समाजाचा अपमान केल्याची राळ उडवून देणे भाजपला अधिक सोपे आहे. काँग्रेस ओबीसीविरोधी असल्याचा प्रचार कदाचित भाजपसाठी थेट लढतींमध्ये अधिक उपयुक्त ठरेल.

**काँग्रेसने स्वबळावर भाजपला हरवणे महत्त्वाचे**

भाजपने राहुल गांधींना बडतर्फ करून काँग्रेसला 'ॲडव्हान्टेज' मिळवून दिला आहे. पण विरोधकांचे नेतृत्व न करता काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना भाजपविरोधात लढण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे काम राहुल गांधींनी करण्याची गरज आहे. राज्या-राज्यांमध्ये अनेक वादाचे मुद्दे असू शकतात. पण प्रसारमाध्यमांच्या नजरेत भरतील वा वादग्रस्त होतील, अशी विधाने न करता मोदी सरकारविरोधी लक्ष्यकेंद्रीत प्रचार गावागावांमध्ये जाऊन केला, तर वर्षभराच्या काळात काँग्रेसला राजकीय फायदा होईल. लोकसभेची निवडणूक पुढील एप्रिल-मेमध्ये होईल. पण त्यापूर्वी काँग्रेससाठी कर्नाटक, राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ ही चार राज्ये जिंकणे महत्त्वाचे असेल. ही राज्ये काँग्रेसच्या ताब्यात आली, तर भाजपचा थेट लढाईत पराभव करण्याची क्षमता असल्याचे सिद्ध होईल. विरोधकांची एकजूट वा अन्य कोणत्याही राजकीय निर्णयांपेक्षा काँग्रेसने स्वबळावर भाजपला हरवणे महत्त्वाचे असेल. बडतर्फीनंतर राहुल गांधींचा विधिचमू न्यायालयीन लढाई लढेल, काँग्रेससाठी मात्र राजकीय लढाई भाजपविरोधात ताकद देणारी असेल. 'भारत जोडो' यात्रेमुळे काँग्रेसमधील मरगळ कमी झाल्याचे पाहायला मिळाले. रायपूर महाअधिवेशनानंतर काँग्रेसमध्ये संघटनात्मक बदल अपेक्षित आहेत. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर कदाचित त्या दृष्टीने प्रयत्न केले जाऊ शकतील. काँग्रेसला आता पुढच्या टप्प्याची तयारी करावी लागेल. ●●●

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# राहुल गांधी एकटे थोडेच आहेत?



सुरेश भटेवरा

**देशातली जनता मोदी सरकारने चालवलेला हा सारा तमाशा खिन्नपणे पाहते आहे. आपल्याविरुद्धचा निकाल ऐकल्यानंतरही राहुल गांधी मात्र जरासेही विचलित झालेले नाहीत. ते म्हणतात, डरो मत, माझ्याकडे पहा, मी अजिबात निराश नाही. देशात लोकशाही शिल्लक राहावी यासाठी माझा संघर्ष सुरू आहे. महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने ही लढाई मी लढणार आहे. मला अपात्र ठरवा, निवडणूक लढवण्यापासून वंचित ठेवा, मला फरक पडत नाही. मला कितीही रोखण्याचा प्रयत्न केला, तरी प्रश्न विचारणे मी थांबवणार नाही. हा आत्मविश्वासच अंततः त्यांना यश प्राप्त करून देईल.**

कर्नाटकच्या निवडणूक प्रचारात, कोलारच्या सभेत, राहुल गांधींनी २०१९ साली उपहासगर्भ शैलीत मोदी आडनावाचा उल्लेख केला. ललित मोदी, नीरव मोदी अशा साऱ्या चोरांचे आडनाव मोदी कसे, असा सवाल विचारला. या शेरेबाजीत नरेंद्र मोदींचाही उल्लेख त्यांनी केला. राहुलच्या या टिप्पणीवरून गुजरातच्या पूर्णेश मोदी नामक एका माजी मंत्र्याने सुरतच्या महानगर दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात मानहानीचा (अदखलपात्र) खटला दाखल केला. राहुल गांधींच्या शेरेबाजीमुळे समस्त मोदी जमातीची बदनामी झाली, असा फिर्यादीचा दावा होता. या खटल्यात २३ मार्च रोजी न्यायदंडाधिकाऱ्यांच्या कनिष्ठ न्यायालयाने राहुल गांधींना दोन वर्षांची शिक्षा व आर्थिक दंड ठोठावला. निकाल जाहीर झाल्यानंतर २४ तासांच्या आत २४ मार्च रोजी लोकसभा सचिवालयाने राहुल गांधींना अपात्र ठरवले. तडकाफडकी अधिसूचना जारी करून त्यांचे संसद सदस्यत्व रद्द करून टाकले. लोकसभा सचिवालयाच्या अधिसूचनेमुळे राहुल गांधी आता केरळच्या वायनाड मतदारसंघाचे खासदार नाहीत. अपात्रतेमुळे पुढली ६ वर्षे त्यांना लोकसभेची निवडणूक लढवता येणार नाही, असा हा धक्कादायक निकाल आहे. या कारवाईमुळे देशभर संतापाची लाट उसळली आहे. विरोधकांचा आवाज दडपण्यासाठी भाजप आणि मोदी सरकारने हे कारस्थान घडवून आणले आहे, या निकालाशी आम्ही अजिबात सहमत नाही, अशी प्रतिक्रिया केवळ काँग्रेसच नव्हे, तर तमाम विरोधी पक्षांनी अगदी काँग्रेसपासून एरव्ही काहीशा दूर अंतरावर असलेल्या तृणमूल, आप, भारत राष्ट्र समितीसह सर्वांनी विनाविलंब व्यक्त केली. देशभर खळबळ माजविणाऱ्या या निकालाचे मुद्देसूद विच्छेदन करण्यापूर्वी त्याचा सविस्तर घटनाक्रम समजावून घेणे आवश्यक आहे.

पूर्णेश मोदींनी दाखल केलेला हा खटला तब्बल चार वर्षांपूर्वीचा. महानगर न्यायदंडाधिकाऱ्यांच्या कनिष्ठ न्यायालयातील या खटल्याची सुनावणी थांबवावी, यासाठी फिर्यादी पूर्णेश मोदींनी वर्षभरापूर्वी स्वतःच उच्च न्यायालयात एक अर्ज दाखल केला. त्यानुसार सुनावणीला स्थगितीही मिळाली. दरम्यान, अचानक कनिष्ठ न्यायालयाचे पूर्वीचे न्यायाधीश बदलले. त्यांच्या जागी नवे न्यायाधीश आले. मग ही स्थगिती उठवून हा खटला आता चालला पाहिजे, असा साक्षात्कार फिर्यादीला झाला. उच्च न्यायालयात ९ फेब्रुवारी रोजी त्यासाठी पुन्हा एक अर्ज केला गेला. या साऱ्या प्रयोगामागची कारणे शोधायची झाली, तर एक अजब क्रोनोलॉजीचे विचित्र तर्कट सामोरे येते. त्याचा सविस्तर खुलासा काँग्रेस पक्षाच्या अधिकृत पत्रपरिषदेत जयराम रमेश यांनी केला आहे.

**या घटनेनंतरच 'ऑपरेशन राहुल' कारवाईला प्रारंभ झाला!**

सलग साडेचार महिने चाललेल्या कन्याकुमारी ते काश्मीर 'भारत जोडो यात्रे'ला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतर राहुल गांधी फेब्रुवारीच्या पहिल्या सप्ताहात लोकसभेत आले. ७ फेब्रुवारी रोजी लोकसभेत त्यांनी ५२ मिनिटांचे घणाघाती भाषण केले. मोदी आणि अदानींचे नेमके संबंध काय? देश-परदेशातली सारी कंत्राटे अदानींनाच कशी मिळतात? पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यात किती वेळा अदानी त्यांच्यासोबत होते? किती वेळा अशा दौऱ्यात ते नंतर सामील झाले? अशा दौऱ्यानंतर परदेशातील किती व कोणती कंत्राटे अदानींना मिळाली? इत्यादी प्रश्नांचा भडिमार राहुलनी केला. अदानी आणि पंतप्रधानांचे संबंध किती निकटवर्ती आहेत, याची विमानातील छायाचित्रेही राहुलनी लोकसभेत दाखवली. एकप्रकारे पंतप्रधानांच्या तथाकथित स्वच्छ प्रतिमेचे मूर्तिभंजनच राहुलनी आपल्या भाषणातून चालवले होते. सत्ताधारी बाकांवरील एक दोन मंत्र्यांनी व काही सदस्यांनी भाषणात अडथळे आणण्याचा निष्फळ प्रयत्न करून पहिला. पण इतक्या हताशेने त्या सर्वांना ग्रासले होते, की ते फार काही करू शकले नाहीत. साऱ्या मोदी मंत्रिमंडळाची देशभर नाचक्की सुरू झाली. त्याचा अनावर संताप सत्ताधारी गोटात उमटणे साहजिकच होते. या घटनेनंतरच 'ऑपरेशन राहुल' कारवाईला बहुदा प्रारंभ झाला असावा.

जयराम रमेश म्हणतात, राहुल गांधींचे लोकसभेतील घणाघाती भाषण ७ फेब्रुवारी रोजी झाले. त्यानंतर ९ दिवसांनी सुरतच्या

न्यायदंडाधिकाऱ्यांपुढील मानहानीच्या खटल्याची स्थगिती उठवली गेली. पाठोपाठ २७ फेब्रुवारीला खटल्याची सुनावणी सुरू झाली. सुनावणी संपल्यावर १७ मार्चला खटल्याचा निकाल राखून ठेवला गेला. २३ तारखेला जाहीर झालेल्या निकालात न्यायदंडाधिकाऱ्यांच्या कनिष्ठ न्यायालयाने राहुल गांधींना दोन वर्षांची शिक्षा व आर्थिक दंड ठोठावला. निकाल जाहीर झाल्यानंतर २४ तासांच्या आत, २४ मार्च रोजी लोकसभा सचिवालयाने राहुल गांधींना अपात्र ठरवले. तडकाफडकी अधिसूचना जारी करून त्यांचे संसद सदस्यत्व रद्द करून टाकले.

अभिषेक मनू संघवी यांनी सदर खटल्याच्या कायदेशीर बाबींचे केलेले विश्लेषण आता पाहू या! संघवी म्हणतात, इंडियन पिनल कोडच्या कलम ४९९ व ५०० नुसार, मानहानी नेमकी कोणाची, कधी आणि कशी होते, याचे तपशील स्पष्ट आहेत. १) मानहानी ज्या कोणाची झाली, त्या व्यक्तीबाबत फिर्यादीत स्पष्टता हवी. त्यानेच त्याबाबत न्यायालयात दाद मागायला हवी. विशिष्ट समुदायाबाबतचे मोघम स्वरूपाचे आरोप, कायदा अजिबात ग्राह्य धरीत नाही. २) आपल्या भाषणात राहुल गांधींनी ज्या मोदींची नावे घेतली, त्या ललित मोदी, नीरव मोदी अथवा नरेंद्र मोदी यापैकी कोणाचीही तक्रार नाही अथवा त्यांनी हा खटला दाखल केलेला नाही. ३) राहुल गांधींचे भाषण मूलतः उपहासगर्भ (सटायर) स्वरूपाचे आणि निवडणूक प्रचारातले होते. जाणीवपूर्वक कोणाची बदनामी करण्याच्या हेतूने अथवा द्वेषभावनेतून त्यांनी हे वक्तव्य केले नव्हते. ४) आपल्या खटल्याच्या सुनावणीला फिर्यादी पूर्णेश मोदींनी उच्च न्यायालयाकडून अगोदर स्थगिती का मिळवली? न्यायाधीश बदलल्यानंतर अचानक खटला चालवण्याचा साक्षात्कार त्यांना का आणि कोणाच्या सांगण्यावरून झाला, याचे तपशील नक्कीच चव्हाट्यावर येतील. सुरतच्या निकालानंतर केरळच्या आभा मुरलीधरन यांनी तर रिप्रझेंटेशन ऑफ पीपल्स कायद्याचे कलम ८ (३)च असंवैधानिक ठरवावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे.

**तो कांगावा केवळ जनसामान्यांना मूर्खात काढणारा संधीसाधू आक्रोश**

देशात आणखी एका महत्त्वाच्या मुद्यानेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मोदी हे आडनाव मुळात कोणत्याही जातीचे अथवा विशिष्ट समुदायाचे नाही. केवळ ओबीसी समाजापुरते तर हे आडनाव अजिबातच मर्यादित नाही. उदाहरणेच द्यायची झाली, तर विख्यात संसदपटू पिलू मोदी आणि टाटा समूहाचे रुसी मोदी पारशी समाजाचे होते. प्रख्यात बॅडमिंटनपटू सय्यद मोदी मुस्लिम होते. ललित मोदी मारवाडी, नीरव मोदी गुजराती, तर नरेंद्र मोदी तेली समाजातले आहेत. मग निकालानंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्यासह सत्ताधारी पक्षाच्या तमाम लहान-मोठ्या नेत्यांनी, राहुलनी आपल्या भाषणात ओबीसी समाजाचा अपमान केल्याचा जो कांगावा चालवला आहे, तो केवळ जनसामान्यांना मूर्खात काढणारा संधीसाधू आक्रोश आहे.

**राहुल गांधींना वेळेच्या आत न्याय मिळेल का?**

इथे न्यायालयाच्या २३ तारखेला जाहीर झालेल्या निकालावर आक्षेप अथवा शंका घेण्याचा हेतू अथवा प्रयोजन नाही. तरीही जर राहुलच्या हातून कोणताही जघन्य अपराध घडला नव्हता, तर मग एका अदखलपात्र खटल्याचा, २ वर्षांची अधिकतम शिक्षा देणारा असा निकाल कनिष्ठ न्यायालयाने का ठोठावला, ज्यामुळे राहुलचे लोकसभेचे सदस्यत्व तडकाफडकी रद्द होईल? (महिन्याभराच्या अवधित) सारे योगायोग राहुल गांधींच्या बाबतीतच का घडावेत? असे प्रश्न आज साऱ्या देशाच्या मनात आहेत. देशभर संतापाची लाट उठण्याचे खरे कारणही तेच आहे. या तमाम कायदेशीर मुद्यांचे यथायोग्य विच्छेदन वरिष्ठ न्यायालयात होईलच. तथापि, या न्यायालयीन प्रक्रियेत आणखी किती वेळ दवडला जाईल? राहुल गांधींना वेळेच्या आत न्याय मिळेल का? हे प्रश्न तूर्त अनुत्तरित आहेत.

**गोंधळ आणि गदारोळात ४५ लाख कोटींचा अर्थसंकल्प मंजूर**

राहुल गांधींनी संसदेतल्या भाषणात अदानींच्या संदर्भात थेट पंतप्रधान मोदींना उद्देशून काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले होते. त्यापैकी एकाही प्रश्नाचे उत्तर संसदेत अथवा संसदेबाहेर पंतप्रधानांनी आजतागायत दिलेले नाही. लंडनच्या केंब्रिज विद्यापीठात राहुल गांधींनी जे भाषण केले, तिथल्या पत्रकारांसमोर जे विचार व्यक्त केले, त्यात भारतातल्या लोकशाही व्यवस्थेच्या खालावलेल्या स्थितीबाबत परदेशांनी हस्तक्षेप करावा असे मत कुठेही व्यक्त केले नव्हते. तरीही राहुलनी परदेशात जाऊन भारताची बदनामी केली, त्याबद्दल साऱ्या देशाची राहुलनी माफी मागितली पाहिजे, असा कांगावा मोदी सरकारच्या चार मंत्र्यांनी केला. त्यांची री ओढत सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज हाणून पाडले. माझ्यावर संसदेत खोटे आरोप करण्यात आले आहेत, मला बोलू द्या, अशी लेखी विनंती करणारी तीन पत्रे राहुलनी लोकसभा अध्यक्षांना पाठवली. स्वतः समक्ष जाऊन त्यांची भेट घेतली. लोकसभा अध्यक्षांनी त्यावेळी आपली असमर्थता व्यक्त केली, असे राहुल गांधी पत्रपरिषदेत म्हणाले. त्याचे कोणीही खंडन केलेले नाही. गोंधळ आणि गदारोळात ४५ लाख कोटींचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. देशाच्या संसदेत केवळ राहुल गांधी या एका व्यक्तीला रोखण्यासाठी हा सारा तमाशा घडवण्यात आला. कामकाजातून त्यांचे भाषण काढून टाकण्यात आले. इतकेच नव्हे, तर त्यांच्याविरोधात हक्कभंगाची प्रक्रियाही सुरू करण्यात आली.

**'गोली मारो सालोंको'**

पंतप्रधान मोदींनी आपल्या पूर्वीच्या भाषणांमध्ये सोनिया गांधींचा उल्लेख काँग्रेसची विधवा, पन्नास कोटींची गर्लफ्रेंड, जर्सी गाय अशा शेलक्या शब्दांचा वापर करीत केला होता. भर संसदेत काँग्रेस खासदार रेणुका चौधरी यांना थेट शूर्पणखा संबोधले होते. इतकेच नव्हे, तर आपल्या भाषणात विशिष्ट समुदायाच्या वस्त्र परिधानांकडे लक्ष वेधून पंतप्रधानांनी त्यांना कसे लक्ष्य बनवले होते, याची सर्वांनाच कल्पना आहे. शबरीमाला खटल्याच्या निकालावर भाष्य करताना अमित शाह म्हणाले, न्यायालयांनी असेच निकाल द्यावेत, ज्याची अंमलबजावणी करता येणे शक्य आहे. मोदी सरकारचे मंत्री अनुराग ठाकूर आणि भाजप खासदार प्रवेश वर्मा यांनी नागरिकता कायद्याला

विरोध करणाऱ्या एका विशिष्ट समुदायाला उद्देशून 'गोली मारो सालोंको' अशा आक्षेपार्ह शब्दात व्यासपीठावरून घोषणा दिल्लीत दिल्या होत्या. वृन्दा करात यांनी दिल्ली उच्च न्यायालयात दाद मागणारी याचिका दाखल केली, तेव्हा याचिका निकाली काढताना न्यायमूर्ती म्हणाले, निवडणुकीच्या मंचावर अनेक नेते अनेक गोष्टी बोलतात, त्यांच्या प्रत्येक भाषणावर जर एफआयआर करायची ठरवली, तर देशभर लाखो खटले चालवावे लागतील. हसत हसत कोणी एखादा उल्लेख केला असेल, तर तो मानहानीकारक मानता येणार नाही. मात्र, आक्रमकपणे कोणी काही बोलले, तर त्याची गांभीर्याने दखल घ्यावी लागेल. यापैकी एकाही नेत्याच्या विरोधात न्यायालयांनी कोणतीही शिक्षा ठोठावल्याचे ऐकिवात नाही. उत्तर प्रदेशात कनिष्ठ न्यायालये कशा प्रकारे निकाल देतात, अनेकांना विनाकारण कसे तुरुंगात पाठवतात, याची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाचे तीन न्यायमूर्ती न्या. संजय किशन कौल, न्या. असनुद्दीन अमानुल्ला आणि न्या. अरविंदकुमार यांच्या खंडपीठाने एका याचिकेत कडक ताशेरे ओढणारा निकाल मध्यंतरी दिला होता. निकालपत्रात त्यांनी म्हटले होते, की जर कनिष्ठ न्यायालयातले मॅजिस्ट्रेट विनाकारण कोणाला तुरुंगात डांबत असतील, तर त्यांच्या हातातले न्यायिक कामकाज त्वरित काढून घ्यावे आणि कायद्याच्या प्रशिक्षणासाठी त्यांना प्रशिक्षण केंद्रात पाठवावे. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांच्या विविध निकालातील अशा विरोधाभासाच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधींची ऐतिहासिक केस, प्रथम सुरतच्या सेशन्स कोर्टात, तिथे न्याय मिळाला नाही, तर हायकोर्टात आणि नंतर सुप्रिम कोर्टात चालणार आहे.

भाजपच्या नेत्या खुशबू सुंदर यांना मोदी सरकारने राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्यपद बहाल केले आहे. याच खुशबू सुंदर पूर्वी काँग्रेस पक्षात होत्या, त्यावेळी मोदींच्या विरोधात त्यांनी जे ट्विट केले होते, ते मोदींना चोर ठरवणारे होते. कालांतराने त्या भाजपमध्ये सामील झाल्यामुळे त्यांच्याविषयी आता पंतप्रधान अथवा सत्ताधारी खासदारांची कोणतीही तक्रार नाही. मग कायद्याचा सारा अंमल फक्त राहुल गांधींपुरता अथवा विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधींपुरताच मर्यादित आहे काय, असा साधा प्रश्न जनतेच्या मनात आहे.

**राहुल गांधींचा गुन्हा काय?**

राहुल गांधींचा गुन्हा काय? तर संसदेत मला बोलू का दिले जात नाही? संसदेत विरोधकांचे माईक बंद का करता? विरोधकांची भाषणे कामकाजातून काढून का टाकता? सत्ताधारी पक्ष संसदेचे कामकाज हाणून का पाडतो, असे मुद्दे त्यांनी उपस्थित केले. मोदी आणि अदानींच्या घनिष्ट मैत्रीबाबत पंतप्रधानांना त्यांनी थेट प्रश्न विचारले. आयपीएलमध्ये आर्थिक घोटाळा करून ललित मोदी आणि पंजाब नॅशनल बँकेचे १४ हजार कोटी रुपये बुडवून नीरव मोदी परदेशात पळून गेले, त्यांना राहुल चोर म्हणाले. राहुल गांधींना ८ वर्षे लोकसभेची निवडणूक लढवता येणार नाही, इतके गंभीर जर हे सारे विषय असतील, त्यांना शिक्षेस पात्र ठरवणार असतील, तर भारतात लोकशाहीचा खरोखर अंत झाला आहे, हा विरोधकांचा आरोप मान्य करावा लागेल.



**ही घटना 'विनाशकाले विपरीत बुद्धी'चा प्रत्यय देणारीच**

सुरतच्या कनिष्ठ न्यायालयाने २ वर्षांची शिक्षा ठोठावल्यानंतर, लोकसभा सचिवालयाने ज्या वेगाने राहुल गांधींचे सदस्यत्व रद्द केले, त्याचा एक चांगला परिणाम पाहायला मिळाला. देशातले तमाम विरोधक (मायावतींचा बहुजन समाज पक्ष आणि असाउद्दीन ओवेसींचा एमआयएम हे दोन पक्ष वगळता) एका झटक्यात एकत्र झाले. त्यांच्या आक्रमक प्रतिक्रियांचे सुखद चित्र देशात सर्वांना पाहायला मिळाले. एकही विरोधी पक्ष शिल्लकच ठेवायचा नाही, हा भाजपचा विकृत मनसुबा या घटनेने उधळून लावला. राहुलच्या निकालापासून मोदी सरकार आणि भाजप कितीही नामानिराळे राहण्याचा प्रयत्न करीत असले, तरी कोणाचाही त्यावर विश्वास नाही. 'विनाशकाले विपरीत बुद्धी'चा प्रत्यय देणारीच ही घटना आहे. एरव्ही भाजपचे जोरदार समर्थन करणाऱ्यांमध्येही सध्या निराशेचा माहोल आहे. राहुलच्या निकालानंतर त्यांचीही चलबिचल वाढली आहे.

देशातली जनता मोदी सरकारने चालवलेला हा सारा तमाशा खिन्नपणे पाहते आहे. आपल्याविरुद्धचा निकाल ऐकल्यानंतरही राहुल गांधी मात्र जरासेही विचलित झालेले नाहीत. ते म्हणतात, डरो मत, माझ्याकडे पहा, मी अजिबात निराश नाही. देशात लोकशाही शिल्लक राहावी यासाठी माझा संघर्ष सुरू आहे. महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने ही लढाई मी लढणार आहे. मला अपात्र ठरवा, निवडणूक लढवण्यापासून वंचित ठेवा, मला फरक पडत नाही. मला कितीही रोखण्याचा प्रयत्न केला, तरी प्रश्न विचारणे मी थांबवणार नाही. हा आत्मविश्वासच अंततः त्यांना यश प्राप्त करून देईल.

अर्थात, हा संघर्ष राहुल गांधींचा एकट्याचा नाही. सत्तेच्या भस्मासुरांच्या विरोधात जनता ठामपणे एकवटली, साऱ्या अपकृत्यांना कसोशीने विरोध झाला, तर सध्याचे चित्र बदलल्याशिवाय राहणार नाही. जर्मनीला बर्बाद करायला हिटलरला दहा वर्षे लागली. श्रीलंकेला बर्बाद करायला राजपक्षेंनाही दहा वर्षे लागली. तथाकथित अमृतकालाची दहा वर्षेही २०२४ च्या मध्यावर संपणारच आहेत. भारतातल्या सामान्य जनतेचे राजकीय शहाणपण (पॉलिटिकल विस्डम) असामान्य आहे. त्यावर आपण सारे विश्वास ठेवू या!

●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व लेखक आहेत.)**


एस सी आई
SCI
Navratna Company
ISO 9001 - 2008 Company
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
ONE COMPANY - MANY INTERESTS
PROPELLING INDIA ON
ITS VOYAGE OF GROWTH
The Shipping Corporation of India (SCI) is India's pride. Especially when it comes to the movement of energy or other critical goods that propel the economy. At every level, the company has devoted itself diligently to professionalism and excellence. Today, SCI specialises in bringing door – to – door services in various sectors through carefully charted out routes in the US, UK and Far East. Growth in these areas are further complemented by SCI's effective networking and active partnerships with some best shipping companies around the world. Thus ensuring a high degree of punctuality and safety in pick – ups and deliveries. Little wonder then that SCI virtually moves India as its number one shipping company and commands respect of a leader in every port worldwide.
The Shipping Corporation Of India Ltd.
(A GOVERNMENT OF INDIA ENTERPRISE)
Regd. Office: Shipping House, 245, Madame Cama Road, Mumbai – 400 021. Tel. No: 022 – 2202 6666, Fax No: 022 – 2202 6905 Website: www.shipindia.com
Transporting Goods. Transforming Lives.

A Moments of Best Built



Bridges | Roads | B.O.T. Projects | Dams | Canals | Tunnels

RAJ INFRASTRUCTURE

**RAJ INFRASTRUCTURE DEVELOPMENT (INDIA) PVT. LTD.**

409/410/411, Pride Silicon Plaza, Senapati Bapat Road, Next to Chatushringi Temple, Pune-411016

T. + 91 20 2563 5050 F. + 91 20 2563 3030 E. info@rajinfra.com

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

BLOOM
COMPANIES, LLC
*Infrastructure Innovation and Ingenuity*

OUR SERVICES

BRIDGE ENGINEERING
TRANSPORTATION ENGINEERING
CONSTRUCTION MANAGEMENT
ENVIRONMENTAL ENGINEERING
STRUCTURAL ENGINEERING
RAILROAD ENGINEERING
ARCHITECTURAL DESIGN
AIRPORT ENGINEERING

*With Best Compliments*



1105, B&C, Welldone Tech Park,
Gurgaon, Haryana, India-122018

0124-4292015
+91-9560076497

https://www.bloomcos.com/

info@bloom-india.com

https://www.linkedin.com/company/bloom-companies-llc/